महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकाशन

मासिक

# उद्योजक

उद्योजकीय मन घडविणारा तत्त्वज्ञ मित्र

वर्ष ३४ वे

फेब्रुवारी 2024

₹ 75/-



देशातील सर्वाधिक लांबीच्या सागरी पुलाचे पंतप्रधान मोदींच्या हस्ते उद्घाटन

## अटल सेतूमुळे वेळेची बचत, कनेक्टिव्हिटी वाढणार



पंतप्रधान मोदी यांचे सोलापूरमध्ये प्रतिपादन

## आत्मनिर्भर भारतासाठी सूक्ष्म, लघु व कुटीर उद्योगांची भूमिका मोठी



जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्राचा डंका, 2 लाख रोजगार निर्मिती

## राज्यात येणार ३ लाख ५३ हजार कोटीची परदेशी गुंतवणूक

# सर्वोत्कृष्टतेसाठी प्रशिक्षण

**उद्योजकता विकास क्षेत्रात ३४ वर्षापासून कार्यरत संस्था**

**ध्येय (Mission)**

**जागतिक पातळीवर उद्योजकीय चैतन्य निर्मिती**

**दृष्टिकोन (Vission)**

ग्राहकांचे समाधान केंद्रस्थानी ठेवून, संघटना व व्यक्ती यांच्या उद्योजकीय व व्यवस्थापकीय क्षमतेत वृद्धी होण्यासाठी, नविनतम तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे नैतिक मूल्यांची जोपासना करत साह्यभूत ठरणे. कर्मचाऱ्यांचे हित व आकांक्षा जोपासत संस्था आत्मनिर्भर व विश्वात उत्कृष्ट संस्था म्हणून संबोधली जावी.

## • ध्येय धोरणे •

१) होतकरू व नवउद्योजकांचा शोध घेवून त्यांना प्रोत्साहन देणे तसेच प्रशिक्षणाद्वारे यशस्वी उद्योजक घडविणे.
२) राज्यात उद्योजकतेचा प्रचार व प्रसार करणे. ३) उद्योजकतेच्या क्षेत्रात संशोधन करणे.
४) उद्योजकतेशी निगडीत सल्ला सेवा, ट्रेनिंग सेंटर, तांत्रिक वर्कशॉप, इंडस्ट्रियल क्लिनिक, निर्मिती केंद्र सुरू करणे.
५) उद्योजकतेच्या क्षेत्रातील माहिती / ज्ञानाचे आदान-प्रदान. ६) संस्थाना प्रशिक्षण गरजांविषयी सहकार्य करणे.
७) उद्योजकतेशी निगडीत नियतकालिके/प्रकाशने प्रकाशित करणे.

### संस्थेचे प्रमुख उपक्रम

१) उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (EDP)
२) स्वयंरोजगार विकास प्रशिक्षण कार्यक्रम (DPSE)
३) व्यवसाय प्रशिक्षण मार्गदर्शन कार्यक्रम (VTP)
४) उद्योजकता परिचय कार्यक्रम (EAP)
५) व्याख्याते प्रशिक्षण कार्यक्रम (FDP)
६) प्रेरक प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम (TTP)
७) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमा अंर्तगत व्यवसाय व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम (PMEG)
८) व्यवस्थापन विकास कार्यक्रम/संस्था विकास कार्यक्रम
९) उद्योजक मासिक
१०) माहिती तंत्रज्ञानावर आधारित उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम

### उपलब्ध प्रशिक्षणाच्या पायाभूत सुविधा

१) सुसज्ज प्रशिक्षण हॉल
२) प्रशिक्षणाच्या अत्याधुनिक सुविधा.
३) सुसज्ज असे निवासी वस्तीगृह.
४) माहितीने परिपूर्ण असे ग्रंथालय.
५) उपहारागृहाची सुविधा.
६) इंटरनेट, व्हिडोओ कॉन्फरन्सींग सारख्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध.
७) स्वत:चे वेब पोर्टल कार्यान्वीत.
८) तज्ज्ञ मनुष्यबळ व प्रशिक्षीत प्रेरक प्रशिक्षकांचा समूह.
९) ११ विशेष कक्ष (सेंटर), ८ विभागीय कार्यालये व प्रत्येक जिल्ह्यात प्रेरक प्रशिक्षकाची उपलब्धता.
१०) उद्योजकतेच्या क्षेत्रांतील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थांशी समन्वय.

प्रशिक्षणाच्या गरज पूर्तीसाठी संपर्क साधा.

MCED

मा. कार्यकारी संचालक
**महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र**
अ-३८, एम.आय.डी.सी. रेल्वे स्टेशन औरंगाबाद-४३१ ००५.

Email : executivedirectormced3@gmail.com
udyojakmagazine2@gmail.com
Portal : www.mced.co.in

उद्योजकीय मन घडविणारे मासिक
**उद्योजक**

**Visit us @ http://www.mced.co.in**

**उद्योजक**

*February-2024, VOL.XXXIV, ISSUE II*

मुख्य संपादक
**बी. टी. यशवंते**

व्यवस्थापकीय संपादक
**संतोष बोर्डे**

विभाग प्रमुख, उद्योजक मासिक
**संतोष बोर्डे**

मुखपृष्ठ
**संतुक गोलेगावकर**

**पत्रव्यवहार**
मुख्य संपादक, उद्योजक,
अ-38, एम.आय.डी.सी.,
रेल्वे स्टेशन परिसर,
छत्रपती संभाजीनगर - 431 005.
☎ 2321223, 2321224
फॅक्स : (0240) 2341719

**सल्लागार मंडळ**
**डॉ. भा. र. साबडे**
संचालक, आयएसबीआय, पुणे
**डॉ. यु. म. पठाण**
ज्येष्ठ साहित्यिक, छत्रपती संभाजीनगर.
**श्री. राम भोगले**
उद्योजक, छत्रपती संभाजीनगर
**श्री. रा. रं. बोराडे**
साहित्यिक, छत्रपती संभाजीनगर.
**संपादक**
दै. लोकमत, छत्रपती संभाजीनगर
**श्री. विवेक देशपांडे**
उद्योजक, छत्रपती संभाजीनगर
**श्री. सुधीर सेवेकर**
साहित्यिक, छत्रपती संभाजीनगर
**अध्यक्ष,** मसिआ, छत्रपती संभाजीनगर
**विभागप्रमुख,** जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
**श्री. सुरेश वाघ,** नाशिक

**उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन**
**अंतर्गत कार्यरत संस्था**
MCED
**महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र**
**यांचे प्रकाशन**

**E-mail :**
udyojakmagazine1@gmail.com
udyojakadvt@gmail.com

**Portal :**
www.mced.co.in

**कोणत्याही महिन्यापासून 'उद्योजक'चे वर्गणीदार होता येईल.**


# दावोसमध्ये महाराष्ट्राचा डंका



राज्याच्या उद्योग जगतासाठी यंदाच्या नवीन वर्षाची सुरुवात मोठी सकारात्मक ठरली. स्वित्झरलँडच्या दावोस येथे आयोजित करण्यात आलेल्या जागतिक आर्थिक परिषदेत सलग दुसऱ्या वर्षी महाराष्ट्राने लक्षणीय कामगिरी केली. राज्याने ३ लाख ५३ हजार कोटी रुपयांच्या परदेशी गुंतवणुकीचे सामंजस्य करार केले. यातून २ लाखाहून अधिक रोजगार निर्माण होणार आहेत. विशेष म्हणजे आर्सेलर मित्तल, जिंदाल, गोदरेज आणि अदानी उद्योग समूहांनी राज्यात गुंतवणुकीची इच्छा व्यक्त केली.

हा जगभरातील गुंतवणूकदारांनी राज्यातील उद्योगस्नेही वातावरण, भक्कम पायाभूत सुविधा, उत्तम कनेक्टिव्हिटी आणि कुशल मनुष्यबळावर दाखविलेला विश्वास आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्योगमंत्री उदय सामंत यंदा सलग दुसऱ्या वर्षी दावोसला उपस्थित होते. गेल्या वर्षीच्या परिषदेत १ लाख ३७ हजार कोटींचे गुंतवणूक करार झाले होते. त्यापैकी ७६ टक्के करार प्रत्यक्षात आले आहेत. यंदाचे करारही १०० टक्के प्रत्यक्षात उतरतील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी दिला आहे.

दावोसमध्ये जागतिक गुंतवणूकदार महाराष्ट्रात येण्यासाठी करार करत असताना जागतिक कीर्तीची आयटी कंपनी इन्फोसिस विदर्भात दाखल झाली. मुंबई, पुण्यानंतर कंपनीने राज्याची उपराजधानी नागपूरमध्ये तिसरे विकास केंद्र सुरू केले आहे. इन्फोसिसने २३० कोटी रुपयांची गुंतवणूक केली असून यातून ३००० हून अधिक रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. सुरजागड इस्पात प्रा. लि. नेही गडचिरोली येथे ग्रीनफिल्ड इंटिग्रेटेड स्टील प्रकल्प स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून, १०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. यातून ८००० प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील.

कोणत्याही राज्याचा विकास तेथील पायाभूत सुविधांवर अवलंबून असतो. रस्ते, महामार्ग, समुद्री मार्ग, रेल्वे मार्ग, हवाई मार्ग, उड्डाणपुले, भुयारी मार्ग यातून राज्याचा विकास अधोरेखित होतो. चांगल्या पायाभूत सुविधांची उपलब्धता सर्व क्षेत्रांतील आर्थिक विकासास सहाय्य करते. अशा सुविधांच्या बाबतीत महाराष्ट्र नेहमीच आघाडीवर राहिला आहे. राज्यात देशातील सर्वाधिक तब्बल ८ लाख ३५ हजार कोटीची पायाभूत सुविधा प्रकल्पांची कामे सुरू आहेत. यात आता अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतू' म्हणजेच एमटीएचएल अटल सेतूचा समावेश झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या प्रकल्पाचे उद्घाटन झाले. मुंबईसाठी हा समुद्री सेतू गेमचेंजर ठरणार आहे. तो मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यांना जलद कनेक्टिव्हिटी प्रदान करेल. मुंबई ते पुणे, गोवा आणि दक्षिण भारतादरम्यानचा प्रवासाचा वेळ कमी करेल. तसेच मुंबई बंदर आणि जवाहरलाल नेहरू बंदरातील कनेक्टिव्हिटी सुधारेल.

बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाच्या दोन टप्प्यांना सुरुवात झाली असून तिसरा व अंतिम टप्पा लवकरच सुरू होणार आहे. नवी मुंबई विमानतळ आणि कोस्टल रोड प्रकल्पाची कामे प्रगतीपथावर आहेत. मुंबईतील इस्टर्न फ्री-वे च्या ऑरेंज गेट ते मरिन ड्राइव्हला जोडणाऱ्या भूमिगत रस्त्यात बोगदा तयार करण्यात येत आहे. लवकरच, मुंबई-अहमदाबाद अशी देशातील पहिली बुलेट ट्रेन धावेल. दिल्ली-मुंबई इकॉनॉमिक कॉरिडॉर महाराष्ट्राला मध्य आणि उत्तर भारताशी जोडेल. या प्रकल्पांमुळे महाराष्ट्र देशाच्या आर्थिक विकासाचे ग्रोथ इंजिन ठरणार आहे.

तमाम भारतवासियांचे श्रद्धास्थान असणाऱ्या प्रभू रामचंद्रांच्या मंदिराचे नुकतेच उद्घाटन झाले. मंदिरात रामलल्लांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. गेली अनेक वर्षे देशवासी राममंदिर निर्माणाची वाट बघत होते. मोठ्या न्यायालयीन लढाईनंतर मंदिर निर्माणाचा मार्ग खुला झाला आणि अवघ्या ३.५ वर्षात भव्य मंदिर उभे राहिले. मंदिराच्या उद्घाटनानिमित्त उभा देश राममय झाला होता. यानिमित्ताने देशात १ लाख कोटी रुपयांची उलाढाल होण्याचा अंदाज कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सने व्यक्त केला आहे. एकीकडे दावोसमधील नेत्रदीपक कामगिरी तर दुसरीकडे राम मंदिराच्या उद्घाटनाचा नेत्रदीपक सोहळा. वर्षाची सुरुवातच मोठ्या उत्साहात झाल्याने पुढील वर्षीही उद्योग जगताची भरभराट करणारे ठरेल याचा विश्वास वाटतो.

**दीपेंद्र सिंह कुशवाह, भा.प्र.से.**
**विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन तथा**
**अध्यक्ष, सुकाणू समिती, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी)**


Edited & Published by Santosh Borde printed at M/s. Printwell International Pvt. Ltd., G-12, MIDC Chikalthana, Chhatrapati Sambhajinagar for Maharashtra Centre for Entrepreneurship Development (MCED), A-38, MIDC Area, Near Railway Station, Chhatrapati Sambhajinagar. Not responsible for unprinted articles. Chief Editor : B. T. Yeshwante

# उद्योजक

# फेब्रुवारी 2024

## अंतरंग




- राम वर्तमान नाही, अनंतकाल आहेत / प्रतिनिधी.........................................................०५
- राज्यात येणार ३ लाख ५३ हजार कोटींची परदेशी गुंतवणूक / डॉ. आरतीश्यामल जोशी.........०७
- सुरजागड इस्पातची १० हजार कोटींची गुंतवणूक / प्रतिनिधी ...................................१०
- आत्मनिर्भर भारतासाठी सूक्ष्म, लघु व कुटीर उद्योगांची भूमिका मोठी / प्रतिनिधी ................११
- युवकांच्या बळावर भारत मॅन्युफॅक्चरिंग हब / डॉ. आरतीश्यामल जोशी...............................१३
- अटल सेतूमुळे वेळेची बचत, कनेक्टिव्हिटी वाढणार / प्रतिनिधी ................................१५





- पाच ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीसाठी महाराष्ट्र प्रवेशद्वार / प्रतिनिधी..............................१७
- हायटेक महाराष्ट्रासाठी नवीन आयटी धोरण / संतोष बोर्डे...............................................१९
- इन्फोसिस नागपुरातही, २३० कोटी गुंतवणूक, ३ हजार रोजगार / प्रतिनिधी.................२२
- धोरण रोजगार निर्मितीचे, उद्दिष्ट प्रगत महाराष्ट्राचे / संतोष बोर्डे..............................२३
- भारत २०४७ पर्यंत होणार विकसित राष्ट्र / प्रतिनिधी.......................................२६
- स्थिर सरकार, राम मंदिरामुळे बाजारात उत्साह / हेमंत देसाई................................२७





- खेड्याकडे चला! पण कसे? / डॉ. भगवान हणमंत मोहिते.......................................२९
- २५ हजार युवक-युवतींना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण / प्रतिनिधी................................३२
- उद्योजक व्हायचे, मग पुस्तके वाचाच! / जीवन मुळे............................................३३
- महाराष्ट्र ठरतंय देशाच्या विकासाचे इंजिन / डॉ. अभिराम डबीर.................................३६
- हाऊसकीपिंगच्या कामाने पुसला अपयशाचा डाग! / निशिगंधा कणकवलीकर .................३९
- घर खरेदी-विक्रीच्या व्यवसायातून समृद्धीकडे / सुधीर साबळे.................................४१





- विद्यादानातून स्वयंविकास / समीरा पारवे.....................................................४३
- लाकडी घाण्याच्या तेलातून ३० लाखांची उलाढाल / प्रतिनिधी................................४५
- शिल्पकलेतून समृद्धीकडे / प्रतिनिधी..........................................................४७
- इलेक्ट्रिकल व्यवसायाने उजळले जीवन / डॉ. उमेश कणकवलीकर ............................४९
- एमआयडीसी करणार एस.टी.स्टँडचा कायापालट / प्रतिनिधी.................................५१
- युवकांनो उद्योजक बना... / प्रतिनिधी.........................................................५२
- नमुना प्रकल्प अहवाल / संजय सिधये ........................................................५४

आरटीई स्नॅक्स उत्पादने तयार करणे, कंपोझिट मॅनहोल कव्हर उत्पादित करणे व हेअर शॅम्पू उत्पादित करणे

याशिवाय संपादकीय, शीर्षासन, प्रश्नपेटी इत्यादी...





अयोध्येतील मंदिरात राम विराजमान, १ लाख कोटीची उलाढाल

# राम वर्तमान नाही, अनंतकाल आहेत

**अयोध्येत नव्याने बांधण्यात आलेल्या मंदिरात २२ जानेवारी रोजी रामलल्लांची मूर्ती विराजमान झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. पंतप्रधानांनी रामलल्लांच्या डोळ्यावरील पट्टी काढली आणि कमळाच्या फुलाने पूजन केले. त्यांनी सर्वांत आधी रामलल्लांचे दर्शन घेतले आणि नंतर उभ्या जगाने प्रभू रामाचे भव्यदिव्य बालरूप डोळ्यात साठवून घेतले. याप्रसंगी बोलताना मोदी म्हणाले, राम आग नाही, ऊर्जा आहे. राम वाद नाही, तोडगा आहे. राम केवळ आमचे नाहीत, राम सर्वांचेच आहेत. राम वर्तमान नाही, राम अनंतकाल आहेत. मंदिराच्या उद्घाटनानिमित्त देशभरात उत्साहाचे वातावरण दिसले. अवघ्या तिसऱ्या महिन्यात पुन्हा दिवाळी साजरी झाली. यानिमित्ताने १ लाख कोटीची उलाढाल झाल्याचा अंदाज आहे. - प्रतिनिधी**

अनेक वर्षांची प्रतिक्षा संपवून २२ जानेवारीला दुपारी १२.२९ मिनिटांनी अयोध्येत प्रभू रामांच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडला. रामलल्ला गर्भगृहात विराजमान झाले. भगवान श्रीरामांच्या डोक्यावर सोन्याचा मुकुट, गळ्यात मोत्याचा हार, कानात झुमके आणि हातात सोन्याचे धनुष्य-बाण आहे. रामलल्ला यांना पितांबर नेसवले आहे. प्राणप्रतिष्ठेनंतर पंतप्रधान मोदी यांनी आरती केली. भगवान रामासमोर ते नतमस्तक झाले. 'याची देही याची डोळा, ऐसा देखिला सोहळा' अशा भावना रामभक्तांच्या झाल्या. मोदी यांनी पूजा झाल्यानंतर संपूर्ण मंदिर परिसराची पाहणी केली. याप्रसंगी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, राज्यपाल आनंदीबेन पटेल आणि राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत उपस्थित होते.

### राम सर्वांचेच

पंतप्रधान मोदींनी उपस्थितांशी संवाद साधताना प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला 'अलौकिक' म्हटले. ते म्हणाले, न्यायाचं प्रतीक असलेल्या प्रभू रामांचे मंदिरही न्यायबद्ध पद्धतीने बनले आहे. काही लोक म्हणायचे की, राम मंदिर बनले तर आग लागेल. या लोकांना भारताच्या सामाजिक विवेकाची



जाण नाही. राम आग नाही, राम ऊर्जा आहे. राम वाद नाही, तोडगा आहे. राम केवळ आमचे नाही, राम सर्वांचेच आहेत. राम वर्तमान नाही, राम अनंतकाल आहेत. मंदिराच्या बांधकामाला परवानगी दिल्याबद्दल त्यांनी न्यायालयाचे आभार मानले.

### ही राष्ट्रनिर्माणाची पायरी

मोदी पुढे म्हणाले, राम मंदिर समाजातील प्रत्येक वर्गाला एका उज्ज्वल मार्गावरून मार्गक्रमण करण्याची प्रेरणा देणारे आहे. हे मंदिर केवळ एका देवाचे मंदिर नाही, हे भारताच्या दृष्टीचे, भारत दर्शनाचे मंदिर आहे. राम भारताची आस्था आहे, राम भारताचा आधार आहे. राम भारताचा विचार आहे, राम भारताचं विधान आहे. राम भारताची चेतना आणि चिंतन आहे. हीच वेळ आहे, या पवित्र घडीपासून आपल्याला पुढच्या एक हजार वर्षांसाठी भारताचा पाया घालायचा आहे. मंदिर निर्मितीच्या कार्यापासून पुढे जात आता समर्थ, सक्षम, दिव्य भारताच्या निर्मितीची शपथ घेण्याची वेळ आहे. रामाचे विचार जनमानसात असणे, हीच राष्ट्रनिर्माणाची पायरी आहे.

### अरुण योगीराज यांनी केली मूर्ती

मंदिराच्या गर्भगृहात विराजमान झालेली मूर्ती कर्नाटकातील मूर्तीकार अरुण योगीराज यांनी साकारली आहे. शालिग्राम शिळेपासून त्यांनी ही मूर्ती तयार केली. शास्त्र आणि धर्मग्रंथात शालिग्राम शिळेचे महत्त्व आहे. धर्मग्रंथ आणि धार्मिक ग्रंथांमध्ये शालिग्राम शिळा भगवान विष्णूचे रूप मानले गेले आहे. मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम हे भगवान विष्णूचे सातवे अवतार मानले आहेत. शालिग्राम शिळा हजारो वर्षे जुनी शिळा आहे. त्यावर चंदन किंवा इतर पूजा साहित्याचा काही परिणाम होणार नाही. मूर्तीच्या चकाकीवर काही परिणाम होत नाही.

### १ लाख कोटींची उलाढाल

राम मंदिराचा उत्साह शिगेला पोहोचला असताना यानिमित्ताने बाजारातही मोठा उत्साह दिसून आला. व्यावसायिकांची राष्ट्रीय संघटना कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सने (कॅट) या निमित्ताने देशभरात १ लाख कोटीच्या उलाढालीचा अंदाज वर्तवला. देशातील ३० शहरांमधून मिळालेला प्रतिसादावरून त्यांनी हा अंदाज बांधलाय. यापूर्वी हा अंदाज ५० हजार कोटी रुपये होता. मात्र दिल्लीसह देशभरातील लोकांमध्ये ज्या प्रकारे राम मंदिराबाबत प्रचंड उत्साह आणि काहीतरी करण्याचे वातावरण निर्माण झाले, त्यामुळे कॅटने अंदाज सुधारित केला.

### ही दुर्मिळातील दुर्मिळ घटना

कॅटचे राष्ट्रीय सरचिटणीस प्रवीण खंडेलवाल यांनी देशाच्या व्यवसाय इतिहासातील ही दुर्मीळ घटना असल्याचे सांगितले. १ लाख कोटी रुपयांच्या अंदाजाबाबत खंडेलवाल म्हणाले, प्राणप्रतिष्ठेनिमित्त देशभरात शोभा यात्रा, श्रीराम पेड यात्रा, श्रीराम रॅली, श्रीराम फेरी, स्कूटर आणि कार रॅली, श्रीराम चौकी यासह अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. बाजारपेठा सजवण्यासाठी श्रीराम झेंडे, पताका, टोप्या, टी-शर्ट, राम मंदिराचे आकृतिबंध असलेले छापलेले कुर्ते इत्यादींना बाजारात मोठी मागणी होती.

### ५ कोटींहून अधिक मॉडेल्सची विक्री

श्रीराम मंदिर मॉडेलच्या मागणीत झपाट्याने होणारी वाढ लक्षात घेता देशभरात ५ कोटींहून अधिक मॉडेल्सची विक्री झाली. मॉडेल तयार करण्यासाठी देशातील विविध शहरांमध्ये रात्रंदिवस काम सुरू होते. मोठ्या प्रमाणावर संगीत समूह, ढोल, ताशा, बँड, शहनाई, नफिरी आदी वादन करणाऱ्या कलाकारांचे बुकिंग करण्यात आले. शोभा यात्रेसाठी ढोल ताशा बनवणाऱ्या कारागिरांना आणि कलाकारांनाही मोठे काम मिळाले. देशभरात मातीपासून बनवलेल्या कोट्यवधी दिव्यांना आणि इतर वस्तूंना मागणी आली, बाजारपेठांमध्ये रंगीबेरंगी दिवे, फुलांची सजावट आदींची व्यवस्थाही मोठ्या प्रमाणावर करण्यात आली. या सर्वांसह भंडारा आदींचे आयोजन करून वस्तू आणि सेवांना मागणी आली. हा व्यवसाय लाख कोटी रुपयांचा झाला असा अंदाज आहे.



### दिल्लीत २०० हून अधिक कार्यक्रम

एकट्या दिल्लीतील बाजारपेठांमध्ये २०० हून अधिक श्रीराम संवाद कार्यक्रम झाले, तर १००० हून अधिक श्रीराम चौकी, श्रीराम कीर्तन, श्रीसुंदरकांड पठण, २४ तास अखंड रामायण पठण, २४ तास अखंड दीपप्रज्वलन, भजन संध्या यासह धार्मिक कार्यक्रम झाले. काही पुढेही होणार आहेत. दिल्लीतील २०० हून अधिक प्रमुख बाजारपेठा आणि मोठ्या संख्येने लहान बाजारपेठ श्रीराम ध्वज आणि तारांनी सजल्या आणि प्रत्येक बाजारपेठेत विद्युत रोषणाई करण्यात आली. दिल्लीच्या विविध बाजारपेठांमध्ये ३०० हून अधिक श्रीराम फेरी आणि श्रीराम पदयात्रेचे कार्यक्रम पार पडले. विविध संघटना त्यांच्या सदस्यांना ५ किंवा ११ दिवे देत आहेत. ५०० हून अधिक एलईडी आणि साऊंड सिस्टीम बसवण्यात आले. लोकनर्तक आणि लोकगायकांचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. देशभरात हीच स्थिती होती.




## जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्राचा डंका, २ लाख रोजगार निर्मिती

# राज्यात येणार ३ लाख ५३ हजार कोटींची परदेशी गुंतवणूक

**दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्राने जोरदार कामगिरी केली असून यंदा ३ लाख ५३ हजार कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या परदेशी गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले. यात प्रामुख्याने अमेरिका, स्वित्झरलँड, सिंगापूर आणि दक्षिण कोरियातील गुंतवणूकदारांचा समावेश आहे. आर्सेलर मित्तल, जिंदाल, गोदरेज आणि अदानी उद्योग समूहांनी राज्यात गुंतवणुकीची इच्छा व्यक्त केली. यातून २ लाखाहून अधिक रोजगार निर्माण होणार आहेत. गुंतवणूकदारांच्या विश्वासामुळे राज्यातील भक्कम पायाभूत सुविधा, उत्तम कनेक्टिव्हिटी, कुशल मनुष्यबळ आणि उद्योगस्नेही वातावरणावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले.**

**- डॉ. आरतीश्यामल जोशी**

स्वित्झरलँडमधील दावोस येथे यंदा १५ ते १९ जानेवारी दरम्यान जागतिक आर्थिक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उद्योगमंत्री उदय सामंत, उद्योग विभाग, एमआयडीसी, मुख्यमंत्री सचिवालयातील वरिष्ठ अधिकारी असे १० जणांचे शिष्टमंडळ दावोसला गेले होते. केंद्र सरकारकडून ८ जणांच्या शिष्टमंडळाचा यात समावेश होता. पहिल्या दिवशी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते महाराष्ट्राच्या दालनाचे (महाराष्ट्र पॅव्हेलियन) उद्घाटन करण्यात आले. भारताच्या दालनाच्या जवळ महाराष्ट्राचे अद्ययावत असे दालन उभारण्यात आले होते. पुढे मुख्यमंत्र्यांनी याच दालनातून सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. तसेच प्रमुख विदेशी उद्योगाच्या प्रमुखांशी चर्चा केली. यासाठी या दालनात बैठक कक्ष बनविण्यात आले होते. येथे महाराष्ट्राच्या घोडदौडीविषयी माहिती देणारे दृकश्राव्य प्रदर्शन देखील आयोजित करण्यात आले होते.



### रोजगाराच्या संधी, सर्व घटकांना फायदा - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

जागतिक आर्थिक परिषदेसाठी दावोस येथे यावर्षी दुसऱ्यांदा येण्याची संधी मिळाली. गेल्या वर्षी केलेल्या करारांची अंमलबजावणी जोरात सुरू आहे. महाराष्ट्राला गुंतवणुकीचे सर्वोच्च राज्य बनविणे आणि ते टिकवून ठेवणे याला सरकारचे सर्वोच्च प्राधान्य आहे. यंदा जेम्स आणि ज्वेलरी, माहिती तंत्रज्ञान, हरित हायड्रोजन, उत्पादन, अन्न प्रक्रिया, हरित ऊर्जा, पेपर आणि पल्प, खाण उद्योग, डेटा सेंटर, इन्फ्रास्ट्रक्चर अशा विविध सेक्टरमध्ये गुंतवणुकीला पसंती मिळाली. यातून राज्यात रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील. शेतकरी, महिला, तरुण आणि सर्वच घटकांना फायदा होईल.






**पहिल्या दिवशी १ लाख २ हजार कोटीचे करार :** परिषदेच्या पहिल्या दिवशी म्हणजे १६ तारखेस ६ उद्योगांसमवेत १ लाख २ हजार कोटी रुपयांच्या सामंजस्य करारावर 'मॅग्नेटिक महाराष्ट्र'च्या अद्ययावत अशा दालनात स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. त्यातून २६ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. यात आयनॉक्स एअर प्रोडक्ट २५ हजार कोटी (५ हजार रोजगार), बीसी जिंदाल ४१ हजार कोटी (५ हजार रोजगार), जेएसडब्ल्यू स्टील २५ हजार कोटी (१५ हजार रोजगार), एबी इन बेव्ह ६०० कोटी (१५० रोजगार), गोदरेज एग्रोव्हेट १००० कोटी (६५० रोजगार) अमेरिका स्थित डेटा कंपनी १० हजार कोटी (२०० रोजगार) यांचा समावेश आहे. प्रमुख गुंतवणूकदारांचा तपशील पुढीलप्रमाणे-

**१) ग्रीन हायड्रोजन प्रकल्पासाठी आयनॉक्स एअरसमवेत २५ हजार कोटींचा करार :** आयनॉक्स एअर प्रोडक्शनबरोबर २५ हजार कोटींच्या सामंजस्य करारावर शिंदे आणि उद्योगमंत्री सामंत यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आली. यावेळी कंपनीचे सिद्धार्थ जैन यांच्याबरोबर मुख्यमंत्र्यांनी चर्चा केली. आयनॉक्स ही कंपनी अमेरिकेतील एक मोठी औद्योगिक वायू उत्पादित करणारी कंपनी असून महाराष्ट्रामध्ये ग्रीन हायड्रोजन प्रकल्प सुरू करण्यात त्यांना रुची आहे. या संदर्भात महाराष्ट्रामध्ये ग्रीन हायड्रोजन आणि अमोनिया प्रकल्प सुरू करण्यासंदर्भातही मुख्यमंत्र्यांशी जैन यांची चर्चा झाली.

**२) जिंदाल यांच्यासमवेत ४१ हजार कोटींच्या करारावर स्वाक्षऱ्या**

देशातील एक मोठा उद्योग समूह असलेल्या बीसी जिंदाल यांच्याशी ४१ हजार कोटींच्या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यामुळे ५००० नोकऱ्या इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम डिझाईन आणि मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात महाराष्ट्रात निर्माण होतील.

**दुसऱ्या दिवशी २ लाख ८ हजार ८५० कोटींचे करार :** परिषदेच्या दुसऱ्या दिवशी १७ जानेवारी रोजी ८ उद्योगांशी २ लाख ८ हजार ८५० कोटींचे गुंतवणूक करार करण्यात आले. त्यातून १ लाख ५१ हजार ९०० रोजगार निर्मिती होईल. यात प्रामुख्याने अदानी ग्रुप ५० हजार कोटी (५०० रोजगार), स्विस इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स ११५८ कोटी (५०० रोजगार), इंडियन ज्वेलरी पार्क ५० हजार कोटी (१ लाख रोजगार), वेब वर्क्स ५ हजार कोटी (१०० रोजगार), लॉजिस्टिकमधील इंडोस्पेस, इएसआर, केएसएच, प्रगती, यांची मिळून ३५०० कोटी (१५ हजार रोजगार), नसर्गिक संसाधानातील कॉन्गलोमिरेट कंपनी २० हजार कोटी (४ हजार रोजगार) यांचा समावेश आहे.




**तिसऱ्या दिवशी ४२ हजार ८२५ कोटींचे करार :** परिषदेत १८ जानेवारी रोजी ६ उद्योगांशी ४२ हजार ८२५ कोटींचे सामंजस्य करार करण्यात आले. यातू १३ हजार रोजगार निर्माण होतील. यात सुरजागड इस्पात १० हजार कोटी (५ हजार रोजगार), कालिका स्टील ९०० कोटी (८०० रोजगार), मिलियन स्टील २५० कोटी (३०० रोजगार), ह्युंदाई मोटर्स ७ हजार कोटी (४ हजार रोजगार), कतारची एएलयू टेक समवेत २०७५ कोटी (४०० रोजगार), सीटीआरएल एस ८६०० कोटी (२५०० रोजगार) यांचा समावेश आहे.

**हरित ऊर्जेसाठी ५६ हजार कोटींचे करार :**परिषदेत महाप्रीतने हरित ऊर्जा प्रकल्पांसाठी ५६ हजार कोटींचे करार केले. यात अमेरिकास्थित प्रेडिक्शन्स समवेत ४ हजार कोटी, युरोपमधील हिरो फ्युचर एनर्जी मध्ये ८ हजार कोटी, जर्मनीच्या ग्रीन एनर्जी ३००० मध्ये ४० हजार कोटी, व्हीएचएम ओमान समवेत ४ हजार कोटी यांचा समावेश आहे. याशिवाय विविध उद्योगांनी १ लाख कोटींचे गुंतवणूक स्वारस्य दाखविले असून यात अर्सेलर निपॉन मित्तल तसेच सौदी अरब, ओमान येथील उद्योगांचा समावेश आहे.

**विविध देशांच्या शिष्टमंडळांशी चर्चा :**परिषदे दरम्यान विविध देशांच्या शिष्टमंडळांनी मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेऊन महाराष्ट्रात गुंतवणुकीच्या संधीबाबत चर्चा केली.

-अदानी समूहाचे संस्थापक आणि अध्यक्ष गौतम अदानी यांनी शिंदे यांची महाराष्ट्र दालनात भेट घेतली. यावेळी त्यांच्यात महाराष्ट्रातील पायाभूत सुविधा क्षेत्र, गुंतवणुकीच्या संधी आदी विषयांवर सविस्तर चर्चा केली.

-ज्येष्ठ उद्योगपती लक्ष्मी मित्तल यांच्यासोबत बैठक झाली. यावेळी भविष्यातील गुंतवणकीच्या सहकार्याबाबत चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर लिंकस्टाईनचे युवराज यांच्याशी देखील औद्योगिक गुंतवणुकीबाबत संवाद साधण्यात आला.

-फ्रेंच वाणिज्य कंपनी असलेल्या लुईस ड्रेफसचे मुख्य धोरणकर्ते अधिकारी थॉमस कौटॉडियर आणि मुख्य वित्त अधिकारी पॅट्रीक टुअर यांच्या समवेत मुख्यमंत्री शिंदे यांची बैठक झाली. महाराष्ट्रामध्ये औद्योगिक विस्ताराबाबत



यावेळी चर्चा झाली.

-दक्षिण कोरीयाच्या ग्योग्नी प्रांताचे गव्हर्नर किम डाँग यिओन यांची मुख्यमंत्र्यांसमवेत भेट झाली. उत्पादन आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील दक्षिण कोरियाचे कौशल्य आणि कुशल मनुष्यबळाच्या क्षेत्रातील भारताची ताकद यांच्यात समन्वय करून या क्षेत्रात महाराष्ट्रात मजबूत पायाभरणी करण्यावर यावेळी भर देण्यात आला.

-चेक प्रजासत्ताक स्थित विटकोविट्झ ॲटोमिका कंपनीचे चेअरमन डेव्हिड क्रोबोक यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. यावेळी त्यांच्यामध्ये छोटे मॉड्युलर अणुभट्टी तंत्रज्ञान क्षेत्रातील गुंतवणुकीच्या संधीबाबत चर्चा झाली. या करारांच्या वेळी उद्योगमंत्री उदय सामंत देखील मुख्यमंत्र्यांसमवेत उपस्थित होते.

-संयुक्त अरब अमिरातीचे वाणिज्यमंत्री अब्दुला बिन टौक आणि लुलू हायपरमार्केटचे कार्यकारी संचालक एम.ए. युसुफ अली यांनी शिंदे यांची भेट घेतली. यावेळी या दोघांसमवेत झालेल्या चर्चेत महाराष्ट्रात असलेल्या गुंतवणुकीच्या संधी आणि त्या क्षेत्रात दीर्घकालीन संबंध वाढविण्यावर भर देण्यात आला.

-शिंडलर इलेक्ट्रिकचे आंतरराष्ट्रीय कार्यान्वयन कार्यकारी तथा उपाध्यक्ष मनीष पंत यांच्याशी महाराष्ट्रातील औद्योगिक गुंतवणुकीच्या क्षेत्राबाबत संवाद साधतानाच औद्योगिक संबंध दृढ करण्याबाबत शिष्टमंडळासोबत चर्चा झाली.

-बेल्जियम येथील एबीआयएन बेव्ह या बहुराष्ट्रीय पेय आणि मद्यनिर्मिती कंपनीसोबत महाराष्ट्रातील गुंतवणुकीच्या ६०० कोटी रुपयांच्या सामंजस्य करारावर शिंदे यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आली. यामुळे राज्यात शेकडो रोजगार निर्माण होण्यास मदत होणार असून ग्राहकांची मागणी पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्रात उत्पादन क्षमता वाढवण्यावर भर दिला जाणार आहे.

-ओमानचे उद्योगमंत्री एच.ई. कैर यांच्याशी गुंतवणूक संधींबद्दल सविस्तर चर्चा झाली. यावेळी विविध विषयांवर संवाद साधतानाच ओमानच्या डिजिटल परिवर्तनाच्या 'व्हिजन २०४०' साठी महाराष्ट्र कशाप्रकारे सहकार्य करू शकतो यासंदर्भात यावेळी चर्चा करण्यात आली.

शिंदे यांनी दावोसमधील सीआयआयच्या इंडिया बिझिनेस हबला भेट दिली. याप्रसंगी मुख्यमंत्री आणि उद्योगमंत्र्यांसह मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव भूषण गगराणी, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी विपिन शर्मा, 'महाप्रित'चे व्यवस्थापकीय संचालक अमोल शिंदे यांची उपस्थिती होती.

**हिताची एमजीआरएम नेटशी भागीदारी :** राज्यातील १२ कोटी जनतेला अत्याधुनिक डिजिटल सेवेद्वारे गुणवत्तापूर्ण, जलद आणि सुलभ आरोग्य सेवा मिळणार आहे. या संदर्भात स्वित्झरलँडमधील दावोस येथे हिताची एमजीआरएम नेटशी भागीदारी करण्यात आली. एमएसटीएआर या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून आरोग्य सेवा देण्यासाठी कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत मुख्यमंत्र्यांनी विविध मुद्द्यांवर चर्चा केली. एमएसटीएआर हा एक नावीन्यपूर्ण प्लॅटफॉर्म असून आयुष्मान भारत डिजिटल मिशन अनुरूप डिजिटल आरोग्य सेवा राज्यातील जनतेला देण्याची सुविधा यामध्ये आहे. या भागीदारीमुळे राज्यातील आरोग्याच्या पायाभूत सुविधांमध्ये क्रांती होईल. नागरिकांना कोणत्याही अडथळ्याशिवाय दर्जेदार आणि आधुनिक आरोग्य सेवा मिळेल. शिवाय प्रत्येकाचे आरोग्य रेकॉर्ड अद्ययावत ठेवण्यात येईल. रिमोट पद्धतीने वैद्यकीय चाचण्या व तपासणी करण्यात येतील.

**दावोसमध्ये शिंदे दुसऱ्यांदा उपस्थित :** मुख्यमंत्री शिंदे यांच्या नेतृत्वाखाली दावोस येथे महाराष्ट्राचे शिष्टमंडळ सहभागी होण्याची ही दुसरी वेळ होती. गेल्या वर्षी या परिषदेत १ लाख ३७ हजार कोटींचे गुंतवणूक करार झाले होते. त्यापैकी ७६ टक्के करार प्रत्यक्षात आले आहेत. त्यातून २ लाखांपेक्षा जास्तीचे रोजगार निर्माण होणार आहेत.

**मराठी बांधवाकडून उत्साही स्वागत :** स्वित्झरलँडमध्ये विविध भागात राहणाऱ्या भारतीय विशेषतः मराठी भाषिकांनी मुख्यमंत्री शिंदे यांचे मोठ्या जल्लोषात स्वागत केले. या निमित्ताने स्वित्झरलँडमध्ये नोकरी, व्यवसायानिमित्त स्थायीक झालेल्या मराठीजनांनी मुख्यमंत्र्यांच्या दावोस दौऱ्यासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी बृहन्महाराष्ट्र स्वित्झरलँडचे (जीनिव्हा) अध्यक्ष अमोल सावरकर म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी अत्यंत व्यस्त कार्यक्रमातून मराठी जनसमुदायाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे निमंत्रण स्वीकारले. याचा आम्हाला आनंद झाला. मूळचे लातूरचे महेश बिराजदार म्हणाले शिंदे यांचे नेतृत्व आम्हा मराठी जनांसाठी खूप प्रेरणादायी आहे. महाराष्ट्र मंडळ, स्वित्झरलँडच्या पदाधिकारी कीर्तीमालिनी गद्रे म्हणाल्या, मी मूळची ठाण्याची आहे. त्यामुळे आमच्या ठाण्यातील शिंदे हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले याचा मोठा आनंद आहे.

*(या लेखाच्या लेखिकेला मराठी आणि इंग्रजी प्रसारमाध्यमात कामाचा १७ वर्षांचा अनुभव आहे. सध्या मुक्त पत्रकार म्हणून अनेक संकेतस्थळे, मासिके, साप्ताहिकात लिखाण करत आहेत. लेखिका छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे केंद्र तसेच महात्मा गांधी मिशन संस्थेच्या पत्रकारिता आणि जनसंवाद विभागात अध्यापन करतात.)*



## गडचिरोलीत ग्रीनफिल्ड इंटिग्रेटेड स्टील प्लॉट, ८ हजार रोजगार

# सुरजागड इस्पातची १० हजार कोटींची गुंतवणूक

**सुरजागड इस्पात प्रा. लि. ने गडचिरोली येथे ग्रीनफिल्ड इंटिग्रेटेड स्टील प्रकल्प स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी सुरजागड इस्पात १०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहेत. यातून तब्बल ८ हजार प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहेत. या प्रकल्पामुळे विदर्भाचा विशेषतः गडचिरोली जिल्ह्याचे मागासपण दूर होण्याचा मार्ग सहज शक्य होईल. प्रकल्पासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सातत्याने पाठपुरावा करत होते. त्यास यश मिळाले आहे. - प्रतिनिधी**

सुरजागड इस्पात प्रा. लि.चे अध्यक्ष सुनील जोशी यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईतील त्यांच्या शासकीय निवासस्थानी भेट घेतली. यावेळी फडणवीस आणि जोशी यांच्यात राज्यातील विविध विषयांवर अत्यंत सकारात्मक चर्चा झाली. यात ग्रीनफिल्ड इंटिग्रेटेड स्टील प्रकल्प स्थापन करण्याचा निर्णय झाला. या प्रकल्पाच्या माध्यमातून ८००० प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहेत. या प्रकल्पात जागतिक दर्जाचे उत्पादनविषयक तंत्रज्ञान राहणार असून, पर्यावरण रक्षण हा त्याचा मुख्य गाभा असेल. त्यामुळे हा संपूर्णतः पर्यावरणपूरक स्टील प्रकल्प राहणार आहे, अशी माहिती यावेळी सुनील जोशी यांनी दिली.

### गडचिरोलीच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, गडचिरोलीच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. या भागात रोजगार निर्मितीसाठी सुद्धा सातत्याने प्रयत्न होत आहेत. गडचिरोलीमध्ये देशाचे पोलाद हब होण्याची क्षमता आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठी राज्य सरकारतर्फे सर्वतोपरी मदत करण्यात येईल, अशी हमी यावेळी फडणवीस यांनी दिली. सुनील जोशी हे दावोस परिषदेत सुद्धा सहभागी झाले आणि तेथे राज्य सरकारसोबत सामंजस्य करार सुद्धा केला.

### पहिल्या टप्प्याचे भूमिपूजन

गडचिरोलीत विविध पायाभूत सुविधा प्रकल्प आणि मोठ्या प्रमाणात गुंतवणूक यावी, यासाठी नेहमीच देवेंद्र फडणवीस यांचा पुढाकार राहिला आहे. कोनसरी येथे एका प्रकल्पाचे उदघाटन आणि दुसऱ्या टप्प्याचे भूमिपूजन सुद्धा लवकरच होणार आहे. फडणवीस मुख्यमंत्री असताना या कोनसरी प्रकल्पाची पायाभरणी झाली होती. आता या नव्या गुंतवणुकीतून गडचिरोली आणि पर्यायाने विदर्भाच्या विकासाला मोठी चालना मिळणार आहे. ■■




## पंतप्रधान मोदी यांचे सोलापूरमध्ये प्रतिपादन

# आत्मनिर्भर भारतासाठी सूक्ष्म, लघु व कुटीर उद्योगांची भूमिका मोठी

**जागतिक स्तरावर भारताचे महत्त्व वाढत असून त्यात छोट्या उद्योगांची भूमिका खूप महत्त्वाची आहे. विकसित भारत होण्यास आत्मनिर्भर भारत बनणे गरजेचे आहे. त्यासाठी सूक्ष्म, लघु व कुटीर उद्योगांची भूमिका खूप मोठी आहे. त्याकरीता अशा उद्योगांना केंद्र शासन प्रोत्साहन देत आहे. त्यातून मेड इन इंडिया उत्पादकांसाठी मोठ्या आशा वाढल्या आहेत. अशा प्रयत्नातूनच आगामी काळात भारताची अर्थव्यवस्था जगातील टॉप ३ अर्थव्यवस्थांमध्ये आणण्यासाठी प्रयत्नशील असल्याची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली.**

**- प्रतिनिधी**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील रे नगर येथे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत निर्माण होत असलेल्या ३० हजार घरकुलांपैकी पहिल्या टप्प्यातील १५ हजार घरकुलांच्या वितरणाचा कार्यक्रम १९ जानेवारी रोजी पार पडला. यावेळी मोदी बोलत होते. मोदी म्हणाले, केंद्र शासनाने गरिबांसाठी सर्वोच्च प्राधान्य देऊन विविध योजना राबवल्या. त्या योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांना देऊन मध्यस्थांची साखळी बंद केली. गेल्या १० वर्षात ३० लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम गरीब, शेतकरी, महिला आणि युवकांच्या खात्यावर थेट पाठविले. जनधन योजना, आधार आदीद्वारे १० कोटी बनावट लाभार्थ्यांना हटविण्याचे काम केले. याशिवाय गरिबांना साधन, संसाधने उपलब्ध करून दिल्यास ते गरिबीचा पराभव करून आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील हे लक्षात घेऊन मागील ९ वर्षात गरिबांच्या कल्याणासाठी राबविलेल्या अनेक योजनांमुळे २५ कोटी नागरिक गरिबीतून बाहेर आले.

### विश्वकर्मा योजनेचा लाभ घ्यावा

मोदी म्हणाले, सोलापूर हे व्यापारी उद्योगांचे शहर असून येथील कापड व चादर उद्योग देशभरात प्रसिद्ध आहे. येथे कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने शासनाने सुरू केलेल्या विश्वकर्मा योजनेचा लाभ येथील कामगारांनी घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. विकसित भारत होण्यास आत्मनिर्भर भारत बनणे गरजेचे आहे. त्यासाठी सूक्ष्म, लघु व कुटीर उद्योगांची भूमिका खूप मोठी आहे. त्याकरीता अशा उद्योगांना केंद्र शासन प्रोत्साहन देत आहे. त्यातून मेड इन इंडिया उत्पादकांसाठी मोठ्या आशा वाढल्या आहेत. संत ज्ञानेश्वर पालखी मार्ग, संत तुकाराम पालखी मार्ग तसेच विविध महामार्गाचे जाळे सोलापूर जिल्ह्यात निर्माण होत असून त्यातून विकासाची गती वाढणार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### 'एक देश एक रेशन कार्ड' योजना

मोदी म्हणाले, हे शासन गरिबांसाठी समर्पित असेल असे २०१४ मध्येच घोषित केले होते. त्यानुसार गरिबांच्या समस्या कमी






### महाराष्ट्रात येण्यास परकीय गुंतवणूदार उत्सुक - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे


मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, नुकत्याच दावोस येथे पार पडलेल्या जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्रामध्ये परकीय गुंतवणूक करण्याचा कल मोठ्या प्रमाणात दिसून आला आहे. महाराष्ट्र राज्यावर विश्वास असल्याने अनेक देश राज्यात गुंतवणूक करण्यास उत्सुक आहेत. त्यामुळे या वर्षी ३ लाख ५३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त परकीय गुंतवणुकीच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. अजून १ ते १.५० लाख कोटी रुपयांचे करार होणे अपेक्षित आहेत. राज्यात अनेक पायाभूत विकासाचे प्रकल्प येत आहेत. दावोस येथे अनेक देशांचे राजकीय नेते, प्रशासक, उद्योजक व गुंतवणूकदार यांच्या भेटी झाल्या त्यावेळी त्यांनी प्रधानमंत्री मोदी यांच्यावर विश्वास व्यक्त केला. मोदी हे संपूर्ण जगात देशाचे महत्त्व वाढवत असल्याचा अनुभव त्यांनी सांगितला.

होण्यासह त्यांचे जीवन सुलभ व्हावे म्हणून अनेक योजना राबविल्या. संपूर्ण देशात ४ कोटी लोकांना पक्की घरे, १० कोटी शौचालये देऊन त्यांचा आत्मसन्मान वाढविण्याचे काम केले. देशातील गोरगरिबांना मोफत अन्नधान्य योजना कोरोना काळापासून लागू केलेली होती. त्या योजनेला पुढील ५ वर्षे मुदतवाढ दिली आहे. 'एक देश एक रेशन कार्ड' योजना राबविल्यामुळे देशभरात कोठेही गेल्यास संबंधित गरीब कुटुंबाला मोफत अन्नधान्य मिळण्याची सोय केली जात आहे. आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत आरोग्यावरील उपचारासाठी ५ लाखापर्यंतचे मोफत उपचार, जन औषधी केंद्राद्वारे ८० टक्के पर्यंत सवलतीच्या दराने औषधे, हर घर जल योजना, शौचालय आदी योजना सामाजिक न्यायाच्या योजना आहेत. संत रविदास, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पाहिलेले सामाजिक न्यायाचे स्वप्न याद्वारे पूर्ण केले जात आहे.

### अमृत योजनेंतर्गत १२०१ कोटीच्या कामाचा शुभारंभ

केंद्र शासनाच्या अमृत २ योजनेअंतर्गत भिवंडी, निजामपूर, सांगली, उल्हासनगर व कल्याण डोंबिवली या महापालिका तर शेगाव, सातारा व भद्रावती या नगरपालिका यांच्या मंजूर असलेल्या एकूण १२०१ कोटी रुपयांच्या पाणी पुरवठा व मलनिसारण व्यवस्थापन विकास कामांचे भूमिपूजन मोदी यांच्या हस्ते ऑनलाइन करण्यात आले. रे नगर गृह प्रकल्पातील ३ लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात मोदी यांच्या हस्ते घराच्या चावीचे वितरण करण्यात आले. सोलापूर महापालिका अंतर्गत पीएम स्वनिधी योजनेच्या ३ लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात १०,००० रुपये कर्ज मंजुरीची पत्रंही यावेळी वितरित करण्यात आले.

प्रारंभी रे नगर फेडरेशन व गृह प्रकल्पाचे मुख्य प्रवर्तक नरसय्या आडम यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाला राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, खासदार डॉ. जय सिद्धेश्वर महास्वामी, खासदार रणजितसिंह निंबाळकर, आमदार सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, सुभाष देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, विजयकुमार देशमुख इत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. ■■




### नाशिकमध्ये राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या उद्घाटनात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे उद्गार

# युवकांच्या बळावर भारत मॅन्युफॅक्चरिंग हब

**भारतीय युवकांचे परिश्रम आणि सामर्थ्यामुळे भारताची अर्थव्यवस्था जगात पाचव्या क्रमांकावर पोहोचली आहे. याच शक्तीच्या सामर्थ्यावर भारताची आर्थिक महासत्तेकडे वाटचाल सुरू आहे. युवकांच्या बळावर भारत जगातील प्रमुख मॅन्युफॅक्चरिंगचे हब होत असून यातून तरुणांना इतिहास घडविण्याची संधी मिळणार असल्याचे उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केले. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतकाळातील पुढील २५ वर्षांच्या कालावधीत परिश्रम घेत तरुणांनी २०४७ पर्यंत विकसित भारत घडवित इतिहास निर्माण करावा, असे आवाहनही त्यांनी केले.**

**- डॉ. आरतीश्यामल जोशी**

केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा विभाग व राज्य शासनातर्फे नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या २७ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवाचे उदघाटन १२ जानेवारी रोजी मोदी यांच्या हस्ते तपोवन मैदानावर झाले. याप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय माहिती व प्रसारण, युवक कल्याण मंत्री अनुराग ठाकूर, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आदींची उपस्थिती होती. सुरुवातीला मोदी यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ यांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. त्यांनी उपस्थितांशी मराठीतून संवाद साधला. भारतीय नारीशक्तीचे प्रतीक राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त वंदन करण्यासाठी महाराष्ट्राच्या वीरभूमीत येण्याची संधी मिळाल्याचा अतिशय आनंद झाल्याचे त्यांनी सांगितले.

### विकसित भारताच्या निर्मितीचा काळ

प्रधानमंत्री मोदी म्हणाले, स्वामी विवेकानंद, योगी अरविंद यांनी युवकांची ताकद ओळखली होती. ते युवकांचे प्रेरणास्थान आहेत. भारतीय युवकांचे परिश्रम, सामर्थ्यामुळे भारताची अर्थव्यवस्था जगात पाचव्या क्रमांकावर पोहोचली आहे. याच शक्तीच्या सामर्थ्यावर भारताची आर्थिक महासत्तेकडे वाटचाल सुरू आहे. याच युवकांच्या बळावर भारत मॅन्युफॅक्चरिंगचे हब तयार होत आहे. यातूनच तरुणांना इतिहास घडविण्याची संधी मिळणार आहे. स्वातंत्र्यापूर्वीच्या पिढीने देशासाठी जीवन अर्पण केले. आताच्या पिढीने पुढील २५ वर्षांचा काळ कर्तव्य काळ मानत विकसित भारताच्या निर्मितीसाठी द्यावा, त्यासाठी युवकांनी संकल्प करावा. जेणेकरून भारत जगात नव्या उंचीपर्यंत पोहोचू शकेल. त्यासाठी 'मेरा भारत - युवा भारत' संघटन सुरू करण्यात आले आहे. त्यावर आतापर्यंत एक कोटीपेक्षा जास्त युवक-युवतींनी नोंदणी केल्याची माहिती त्यांनी दिली.

### रोजगार, उच्च शिक्षणाला चालना

मोदी म्हणाले, आधुनिक भारत घडविण्यासाठी तरुणांच्या मार्गात येणारे विविध अडथळे दूर करण्यात येत आहे. कौशल्य विकासावर आधारित राष्ट्रीय शिक्षण धोरण अंमलात येत आहे. त्यातून रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे. आयआयटी, एनआयटी महाविद्यालये सुरू करण्यात येत आहेत. युवकांमधील कौशल्य विकासासाठी पाश्चात्य देशांबरोबर सामंजस्य करार करण्यात आले असून त्यांचाही लाभ होत आहे. महामार्गांची निर्मिती, वंदे



भारत रेल्वे, विमानतळांचाही विकास करण्यात येत आहे. चंद्रयान, आदित्य एल १ च्या यशाने जगाला भुरळ पडली आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी १८ वर्षांवरील तरुणांनी मतदार यादीत नाव नोंदणी करून मतदान करावे. युवकांनी अद्वितीय कामगिरी बजवावी. या कामगिरीची समाज नेहमीच दखल घेतो. एवढेच नव्हे, तर इतिहासात या कामगिरीची सुवर्णाक्षरांनी नोंद होते. तरुणांनी महिलेचा सन्मान करीत व्यसनांपासून तरुणांनी दूर राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

### हा युवकांचा कुंभमेळा - मुख्यमंत्री शिंदे

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, प्रभू श्रीरामाच्या पदस्पर्शाने नाशिकची भूमी पावन झाली आहे. कुंभमेळ्याकरीता नाशिक प्रसिद्ध आहे. अशा भूमीत स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीच्या दिवशी राष्ट्रीय युवा महोत्सवानिमित्त देशभरातील युवक शक्ती एकत्र आली आहे. येथे युवकांचा कुंभमेळाच भरला आहे. ही राज्यासाठी आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. भारताची वाटचाल महासत्तेकडे सुरू आहे. त्यामुळे भारताचे भवितव्य उज्ज्वल आहे. स्टार्टअप, स्टँड अप इंडिया यासारख्या उपक्रमांमुळे भारताची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल सुरू आहे. राज्यातील तरुणांच्या सबलीकरणासाठी आणि त्यांचे कौशल्य विकसित करून त्यांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. युवकांच्या सक्रिय सहभागामुळे २०४७ पर्यंत मोदी यांच्या स्वप्नातील विकसित भारत घडेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### भारतात ऑलिम्पिकची तयारी

केंद्रीय क्रीडा मंत्री अनुराग ठाकूर म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत सर्वच क्षेत्रात यशस्वी होत आहे. क्रीडा, संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर भारताकडे वाटचाल सुरू आहे. वीज, लोखंड उत्पादनात आघाडी घेतली आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने प्रथमच शंभरावर पदके पटकावली आहेत. भारताने आता ऑलिम्पिक स्पर्धेच्या आयोजनाची तयारी सुरू केली आहे. भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र आणि वैभवशाली, समृद्ध भारत घडविण्याचे स्वप्न मोदी यांनी पाहिले. त्यासाठी युवकांनी सहकार्याचा संकल्प सोडावा, असेही आवाहन त्यांनी केले.

### बहारदार सादरीकरणानं जिंकली मने

युवा महोत्सवात तरुणाईच्या कला-कौशल्याने उपस्थितांची मने जिंकली. 'विकसित भारत' २०४७ - युवा के लिए-युवा द्वारा' या संकल्पनेवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमात जिम्नॅस्टिक, मल्लखांब, योगासने आणि साहसी प्रात्यक्षिकांचे युवक-युवतींनी बहारदार सादरीकरण केले. देशभक्तीपर गीतांमुळे सांस्कृत?क कार्यक्रमात रंगत आली. एकाहून एक सरस, कला-कौशल्य दाखविताना तरुणाईची चपळता पाहायला मिळाली. ढोल, झांज, लेझीम, कथकली, भरतनाट्यम, भांगडा या विविध राज्यातील लोकनृत्यालाही दाद मिळाली. नाशिकच्या सहस्त्रनाद ढोलपथकाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. तत्पूर्वी फुलांनी सजवलेल्या खुल्या जीपमधून मोदी यांनी हॉटेल मिर्ची ते तपोवन दरम्यान 'रोड शो' केला. हजारो नाशिककरांनी रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. उपस्थितांच्या दिशेने हात उंचावत त्यांचा ताफा तपोवनला पोहोचला.

*(या लेखाच्या लेखिकेला मराठी आणि इंग्रजी प्रसारमाध्यमात कामाचा १७ वर्षांचा अनुभव आहे. सध्या मुक्त पत्रकार म्हणून अनेक संकेतस्थळे, मासिके, साप्ताहिकात लिखाण करत आहेत. लेखिका छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे केंद्र तसेच महात्मा गांधी मिशन संस्थेच्या पत्रकारिता आणि जनसंवाद विभागात अध्यापन करतात.)* ■■



## देशातील सर्वाधिक लांबीच्या सागरी पुलाचे पंतप्रधान मोदींच्या हस्ते उद्घाटन

# अटल सेतूमुळे वेळेची बचत, कनेक्टिव्हिटी वाढणार

**मुंबई आणि नवी मुंबईला जोडणारा भारतातील सर्वाधिक लांबीचा सागरी पूल 'अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतू' म्हणजेच एमटीएचएल अटल सेतू मुंबईसाठी गेमचेंजर ठरणार आहे. १७,८४० कोटी रुपयांच्या खर्चातून तयार झालेला ६ पदरी पूल सुमारे २१.८ किलोमीटर लांबीचा आहे. पैकी सुमारे १६.५ किमी भाग समुद्रावर तर उर्वरित ५.५ किमी जमिनीवर आहे. हा सेतू मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यांना जलद कनेक्टिव्हिटी प्रदान करेल. मुंबई ते पुणे, गोवा आणि दक्षिण भारतादरम्यानचा प्रवासाचा वेळ कमी होईल. तसेच मुंबई बंदर आणि जवाहरलाल नेहरू बंदरातील कनेक्टिव्हिटी सुधारेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुलाचे उद्घाटन आणि ३५ हजार कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचा शुभारंभ करण्यात आला. - प्रतिनिधी**



### लवकरच बुलेट ट्रेन

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

मोदी पुढे म्हणाले, बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग, नवी मुंबई विमानतळ आणि कोस्टल रोड प्रकल्पाची कामे सुरू आहेत. त्यामुळे मुंबईतील कनेक्टिव्हिटीचा चेहरामोहरा बदलेल. प्रवासाची सोय आणखी वाढविण्यासाठी इस्टर्न फ्री-वे च्या ऑरेंज गेट ते मरिन ड्राइव्हला जोडणाऱ्या भूमिगत रस्त्यात बोगदा तयार करण्यात येत आहे. लवकरच, मुंबईला पहिली बुलेट ट्रेन मिळेल. दिल्ली-मुंबई इकॉनॉमिक कॉरिडॉर महाराष्ट्राला मध्य आणि उत्तर भारताशी जोडेल. महाराष्ट्राला तेलंगणा, छत्तीसगड आणि इतर शेजारील राज्यांशी जोडण्यासाठी ट्रान्समिशन लाइनचे जाळेही टाकले जात आहे. तेल आणि वायू पाईपलाइन, नवी मुंबई विमानतळ आणि शेंद्रा-बिडकीन इंडस्ट्रियल पार्कचे मोठे प्रकल्प महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला नवी गती देणार असल्याचे मोदी यांनी यावेळी सांगितले.

शहरी वाहतूक पायाभूत सुविधा आणि कनेक्टिव्हिटी बळकट करून नागरिकांची 'प्रवास सुलभता' सुधारणे ही काळाची गरज आहे. या संकल्पनेनुसार, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (एमटीएचएल) म्हणजेच आता 'अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतू' नामकरण झालेला पूल बांधण्यात आला आहे. डिसेंबर २०१६ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुलाची पायाभरणी करण्यात आली होती, तर १२ जानेवारी २०२४ रोजी मोदींच्या हस्तेच याचे उद्घाटन झाले. याप्रसंगी राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. १३ जानेवारीपासून पूल सार्वजनिक वाहतुकीसाठी खुला झाला.

### ३५ हजार कोटीच्या विकास कामांचा शुभारंभ

याप्रसंगी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या मैदानावर आयोजित कार्यक्रमात मोदी यांच्या हस्ते ३५ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या विविध विकास प्रकल्पांचे उदघाटन, राष्ट्राला समर्पण आणि पायभरणी करण्यात आली. यात अटल सेतु (२२ कि.मी.), खारकोपर-उरण रेल्वे लाइन प्रकल्प (१४.६० कि.मी.), ठाणे आणि ऐरोली दरम्यान 'दिघा गाव रेल्वे स्थानक' भारतरत्नम नेस्ट-१ भवन, महानगर प्रदेशाच्या पश्चिम उप-प्रदेशासाठी सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना (क्षमता ४०३ द.ल.लि.), नवी मुंबई मेट्रो मार्ग-१ बेलापूर ते पेंढार (११.१० कि.मी., ११ स्थानके) खाररोड आणि गोरेगाव दरम्यान नवीन ६ वी रेल्वे लाइन (८.८० कि.मी.) उरण, खारकोपर दरम्यान उपनगरीय ईएमयू ट्रेनची सुरुवात आणि नमो अभियान-मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान, नारीशक्ती दूत ॲप लेक





### देशाच्या प्रगतीत महाराष्ट्राचे योगदान
### - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, देशाच्या प्रगतीत आणि विकासात महाराष्ट्राचे मोठे योगदान आहे. उद्योगाबरोबरच, पायाभूत प्रकल्पांच्या बांधकामातही महाराष्ट्र आघाडीचे राज्य आहे. मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राच्या विकासाचा हा प्रवास निरंतर सुरूच राहील. यासाठी केंद्र शासनाचा नियमित पाठिंबा मिळेल, असा विश्वास यांनी व्यक्त केला. देशातील पायाभूत सुविधांची सर्वाधिक कामे महाराष्ट्रात सुरू आहेत. राज्यात सुमारे ८ लाख ३५ हजार कोटी रुपयांची विकासकामे सुरू आहेत. गुंतवणूकदार राज्यात गुंतवणूक करण्यासाठी स्पर्धा करीत आहेत. महत्त्वाकांक्षी मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पातील अडथळेही दूर झाले असून या मार्गासाठी आवश्यक भूसंपादनाची प्रक्रिया जवळपास पूर्ण झाली आहे. जगातील अनेक देश आर्थिक आघाडीवर अनेक समस्यांशी लढत असताना भारत मजबूत आणि संतुलित नेतृत्वामुळे आर्थिक महासत्ता बनण्याच्या मार्गावर आहे, असे शिंदे म्हणाले.



### एक ट्रिलियन डॉलरचे उद्दिष्ट गाठणार
### - उपमुख्यमंत्री अजित पवार

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, अटल सेतूच्या उद्घाटनाचा दिवस महत्त्वपूर्ण आहे. सर्वसामान्यांचे जीवन सुखकर करण्यासाठी मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध योजना, प्रकल्प राबविण्यात येत आहेत. भारतीय रेल्वेमध्ये मोठ्या प्रमाणावर झालेल्या सुधारणामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर दिलासा मिळत आहे. मोदी यांनी सुरुवातीपासून महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर विशेष लक्ष दिले आहे. उज्ज्वला योजना ही महिलांसाठी अतिशय उपयुक्त ठरली आहे. यामुळे महिलांचे जीवन सुखकर झाले आहे. देशाच्या विकासासाठी आणि सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी प्रधानमंत्री यांच्या नेतृत्वात कटिबद्ध असल्याचे सांगून राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलर करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.



### चार वर्षांत मेट्रो आणि रस्त्यांचं नेटवर्क
### - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, १९७३ मध्ये या सागरी सेतूची संकल्पना मांडली होती. मात्र ४० वर्षात हे काम झाले नाही, ते आज मोदी यांच्या विकासाच्या दूरदृष्टीमुळे शक्य झाले. अटल सेतूसाठी मोदी यांनी थेट एमएमआरडीएला कर्ज उपलब्ध करून देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. गेल्या ५० वर्षांत महाराष्ट्राला आणि देशाला मुंबईने ताकद दिली. येत्या २५ वर्षांत देशाला, महाराष्ट्राला आणि मुंबईला रायगडचा परिसर ताकद देईल. रायगडमध्ये नवा इकॉनॉमिक हब तयार होणार आहे. ६५ टक्के डेटा सेंटर कॅपॅसिटी तयार झाली आहे. या सेतूने या विभागाला कनेक्टिव्हिटी दिली आहे. मुंबईत कुठूनही ५९ मिनिटात पोहोचता आले पाहिजे. मेट्रो आणि रस्त्यांचं नेटवर्क त्या पद्धतीने तयार होत आहे. यापुढे रायगड, नवी मुंबई हे नवे इंडस्ट्रियल हब असेल. येथे नवीन विमानतळ लवकरच पूर्ण होईल.

लाडकी योजनेतील लाभार्थ्यांना धनादेशाचे वाटप यांचा समावेश होता.

#### महाराष्ट्र विकसित भारताचा आधारस्तंभ

मोदी म्हणाले, भारतातील सर्वात लांब असलेल्या अटल सागरी सेतूचे लोकार्पण हा भारताचा विकासाप्रती असलेल्या वचनबद्धतेचा पुरावा आहे. २०१४ च्या निवडणुकीआधी रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घेऊन काही संकल्प केले होते. आज ते पूर्ण होताना दिसत आहेत. अटल सेतू त्याचाच एक भाग आहे. अटल सेतू ही विकसित भारताची एक झलक आहे. यामुळे गोवा देखील मुंबईच्या जवळ येणार आहे. अटल सेतू प्रकल्प पूर्ण करण्याचा संकल्प जपानचे माजी पंतप्रधान शिंझो ॲबे यांच्या समवेत केला होता. सागरी सेतूचं काम पूर्ण होणं, हे मोठे यश आहे. देशासाठी गेल्या १० वर्षात पायाभूत सुविधांसाठी ४४ लाख कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी महाराष्ट्रात केंद्र सरकारने सुमारे ८ लाख कोटी रुपयांचे पायाभूत सुविधा प्रकल्प पूर्ण केले आहेत आणि आणखी काम सुरू आहे. ही रक्कम प्रत्येक क्षेत्रात रोजगाराच्या नवीन संधी वाढवित आहे.




## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

# पाच ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीसाठी महाराष्ट्र प्रवेशद्वार

**२०१४ मध्ये भारत जगातील अर्थव्यवस्थांमध्ये १० व्या स्थानावर होता. आता देश ५ व्या स्थानावर आला आहे. २०२८ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर्ससह भारत जगातील टॉप ३ अर्थव्यवस्थांमध्ये सामील करण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मानस आहे. पंतप्रधानांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र १ ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेचा वाटा देणार आहे. राज्याचा विकास वृद्धी दर ८.५० टक्के आहे. राज्याला १ ट्रिलियन डॉलर्सचे उद्दिष्ट गाठण्यासाठी ११ टक्के वृद्धी दर गाठावा लागेल. त्या दिशेने महाराष्ट्राची वाटचाल सुरू आहे. पाच ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीचे उद्दिष्ट गाठण्यासाठी महाराष्ट्र प्रवेशद्वार ठरेल असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.**

**- प्रतिनिधी**

नागपूरच्या मिहानमधील भारतीय व्यवस्थापन संस्थेतर्फे 'झिरो माईल संवाद' कार्यक्रमात 'भारताचे ५ ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीचे उद्दिष्ट' हा विषय केंद्रस्थानी ठेवून विविध चर्चासत्रे आणि व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. यात उपमुख्यमंत्री बोलत होते. फडणवीस म्हणाले, देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात महाराष्ट्राचा वाटा सुमारे १५ टक्के आहे. महाराष्ट्राची राजधानी मुंबई असून हे शहर देशाची आर्थिक, करमणूक आणि व्यावसायिक राजधानी आहे. देशाच्या एकूण निर्यातीमध्ये महाराष्ट्राचा वाटा २५ टक्क्यांपर्यंत आहे. २९ टक्क्यांपर्यंत एफडीआयची गुंतवणूक राज्यात आहे. राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ५७ टक्के लोकसंख्या ही २७ वर्षाआतील आहे. देशातील सर्वाधिक विद्यापीठे राज्यात आहेत. सर्वाधिक विजेची निर्मिती आणि वापर हा आपल्या राज्यात होतो. देशाच्या एकूणच अर्थव्यवस्थेमध्ये महाराष्ट्राची ही बलस्थाने लक्षात घेता देशाच्या ५ ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीच्या स्वप्नपूर्तीमध्ये महाराष्ट्राचा मोलाचा वाटा राहणार असल्याचे उपमुख्यमंत्री म्हणाले.

### भौगोलिक असमतोलतेचे आव्हान

देवेंद्र फडणवीस म्हणाले, कुठल्याही देशाच्या विकासामध्ये तंत्रज्ञानाचा वाटा महत्त्वपूर्ण असतो. त्याचप्रमाणे अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणामध्ये तंत्रज्ञानाचा वाटा मोलाचा असणार आहे. पारदर्शकता आणि गतिमानता तंत्रज्ञानाच्या माध्यमातून येण्यास मदत होत असून अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी तंत्रज्ञान महत्त्वपूर्ण ठरेल. ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीचे स्वप्न साकार करण्यात असमतोलता हे एक मोठे आव्हान आहे. राज्यातील ३६ जिल्ह्यांपैकी ७ जिल्ह्यांचे योगदान जीडीपीमध्ये ५५ टक्के असून उर्वरित ८० टक्के जिल्ह्यांचे योगदान हे २० टक्क्यांपेक्षा कमी आहे. त्यामुळे या जिल्ह्याच्या विकासाकडे नियोजनबद्ध लक्ष दिल्यास निश्चितच आर्थिक विकास साधून अर्थव्यवस्थेला गती मिळणार आहे. नागपूरच्या भारतीय व्यवस्थापन संस्थेचे कॅम्पस पुणे येथे सुरू करण्याचे संस्थेचे नियोजन असल्यास निश्चितपणे शासनातर्फे सहकार्य करण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री म्हणाले. याप्रसंगी नागपूरच्या भारतीय व्यवस्थापन संस्थेच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष सी. पी. गुरनानी, संचालक






भिमराया मैत्री आदींची उपस्थिती होती.

**फडणवीस यांना मानद डॉक्टरेट**

मुंबईत झालेल्या एका अन्य कार्यक्रमात उपमुख्यमंत्री फडणवीस यांना जपानच्या कोयासन विद्यापीठाची मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. फडणवीस यांनी पायाभूत सुविधा, औद्योगिक विकास, जलयुक्त शिवारच्या माध्यमातून जलसंधारणाच्या तसेच महाराष्ट्रात सामाजिक समानतेसाठी केलेल्या कार्यासाठी कोयासन विद्यापीठाने १२० वर्षांच्या इतिहासात प्रथमच देशाबाहेर मानद डॉक्टरेट पदवी बहाल करण्याचा निर्णय घेतला. याप्रसंगी उपमुख्यमंत्र्यांनी भारत-जपानच्या मैत्री संबंधांचा आढावा घेताना महाराष्ट्राच्या विकासाचा रोडमॅप मांडला. ते म्हणाले, कोयासन विद्यापीठ हे कू काई यांनी सुरू केले. त्यांनी बुद्धिझम जपानमध्ये रुजवला. जगातील महत्त्वाचे केंद्र म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते. त्यांनी हा सन्मान दिल्याबद्दल या विद्यापीठाचा मी ऋणी आहे. मी दीक्षाभूमीच्या शहरातून येतो. त्यामुळे बुद्धधम्माच्या प्रसारात असलेल्या या सर्वांत जुन्या विद्यापीठाकडून सन्मान हा भावोत्कट क्षण आहे. या क्षणी भावना व्यक्त करण्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत.

**जपान सर्वांत जवळचा मित्र**

देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र-कोयासन मैत्रीची सुरुवात तत्कालीन पर्यटनमंत्री छगन भुजबळ यांच्या काळात झाली. त्यानंतर मुख्यमंत्री असताना मी तिथे गेलो. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा तेथे आपण उभारला. आताही ही मैत्री निरंतर सुरू आहे. जपानने सातत्याने भारताला आणि महाराष्ट्राला मदत केली. जपान हा आपला अतिशय जवळचा आणि विश्वासू मित्र आहे. त्यामुळेच हा केवळ मैत्रीचा नव्हे, तर सांस्कृतिकदृष्ट्या जोडणारा अध्याय आहे. कोयासन विद्यापीठाने डॉक्टरेट देताना पायाभूत विकास, औद्योगिक विकास, जलसंधारण, सामाजिक समता या गोष्टीचा विचार केला आहे. राज्यातील जनतेचे आशीर्वाद, वरिष्ठ नेत्यांचे सहकार्य आणि सहकाऱ्यांची साथ यांच्यामुळे ही पदवी मला मिळाली. ती महाराष्ट्रातील जनतेला समर्पित करतो. राज्यासाठी आणि देशासाठी जे चांगले करता येईल ते मी करेल, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

**पायाभूत सुविधांमध्ये सहकार्य**

उपमुख्यमंत्री म्हणाले, महाराष्ट्राने पायाभूत क्षेत्र विकासासाठी २०१४ मध्ये काम सुरू केले. मुंबईच्या पायाभूत क्षेत्र विकासात जपानचा मोठा वाटा आहे. आपली भुयारी रेल्वे, ट्रान्स हार्बर लिंक, समुद्र सेतू यासह अनेक प्रकल्पासाठी मोठी मदत जपान सरकारने केली आहे. याशिवाय शिक्षण, कौशल्य विकास या क्षेत्रात मदत जपानने केली आहे. आगामी काळात वर्सोवा ते विरार सी-लिंक तयार करण्याची चर्चा झाली आहे. पूरनियंत्रण क्षेत्रात जपानची मदत घेऊन काम केले जाणार आहे. आता आपण या क्षेत्रात अशा ठिकाणी आहोत की इतर राज्यांना आपल्यापर्यंत पोहोचायला खूप वेळ लागेल, असे त्यांनी नमूद केले.

**महाराष्ट्र स्टार्टअप्स कॅपिटल**

पायाभूत सुविधा ही विकासाची गुरुकिल्ली आहे. आज महाराष्ट्र परकीय गुंतवणुकीत क्रमांक एकचे राज्य आहे. महाराष्ट्र हे स्टार्टअप कॅपिटल झाले आहे. कोणतेही राज्य पुढे न्यायचे असेल, तर चांगल्या प्रशासनाची गरज असते आणि महाराष्ट्र हे त्यासाठी ओळखले जाते. आपण २०१४ ते २०१९ मध्ये जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून जलसंधारणाचे मोठे काम केले. त्यामुळे देशाच्या तुलनेत राज्यातील जमिनीची पाणी पातळी उंचावण्यास मदत झाली आहे. महाराष्ट्र हे असीमित शक्ती असणारे राज्य आहे. नवभारत निर्माणासाठीचा रस्ता महाराष्ट्रातून जातो. सामाजिक समतेचा मोठा इतिहास आहे. डॉ. बाबासाहेबांनी संविधानाद्वारे संधीची समानता दिली. त्यामुळे आपण सर्व समाजघटकांना पुढे कसे नेता येईल, त्यांना शिक्षणाची संधी, शिष्यवृत्ती याद्वारे पुढे नेण्याचा प्रयत्न करत आहोत. या राज्यासाठी आणि देशासाठी जे चांगले करता येईल ते मी करेल, असे फडणवीस म्हणाले.

**व्यक्ती म्हणून फडणवीस चांगले**

जपानचे मुंबईतील कौन्सिल जनरल डॉ. फुकाहोरी यासुकाता म्हणाले, कोयासन विद्यापीठाला १२०० वर्षांचा इतिहास आहे. फडणवीस यांनी जपानचा दौरा केला. अनेक उद्योजकांना भेटले. त्यानंतर अनेक कंपन्यांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. एक व्यक्ती म्हणून ते खूप चांगले असल्याचे त्यांनी नमूद केले. वाकायामा प्रांताचे आंतरराष्ट्रीय व्यवहार विभागाचे संचालक यामाशिता योशियो यांनी यावेळी मानद डॉक्टरेट पदवीच्या मानपत्राचे वाचन केले. मुंबई विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात मंगळवारी झालेल्या कार्यक्रमास उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी, कोयासन विद्यापीठाचे प्रो. इन्युई रुनिन, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, एमएमआरडीएचे आयुक्त डॉ. संजय मुखर्जी व्यासपीठावर उपस्थित होते. ■■




**९५ हजार कोटींची गुंतवणूक, ३.५ लाख रोजगार, १० लाख कोटी निर्यातीचे उद्दिष्ट**

# हायटेक महाराष्ट्रासाठी नवीन आयटी धोरण

**महाराष्ट्र राज्य हे देशाचे ग्रोथ इंजिन आहे. देशात सर्वाधिक परकीय गुंतवणूक राज्यात येते, निर्यातीतही राज्य अग्रेसर आहे. उद्योगासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा आणि कुशल मनुष्यबळ यांची उपलब्धता यामुळे जागतिक गुंतवणूकदारांचे महाराष्ट्र हे नेहमीच पसंतीचे ठिकाण राहिले आहे. स्टार्टअप व इनोव्हेशन या क्षेत्रांतही राज्याने आघाडी घेतली आहे. सर्वांत जास्त स्टार्टअप व इनोव्हेशन प्रकल्प राज्यात आहेत. या नव्या संकल्पना आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानातील नावीन्यतेला चालना देऊन महाराष्ट्र राज्याला 'ज्ञान नेतृत्व अर्थव्यवस्था' म्हणून स्थापित करण्यासाठी आता राज्याने नवे माहिती आणि तंत्रज्ञान धोरण जाहीर केले आहे.**

**- संतोष बोर्डे**



मा.श्री.उदय सामंत
उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य

नव्या माहिती तंत्रज्ञान धोरणामुळे ९५ हजार कोटींची नवीन गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट असून याद्वारे साडेतीन लाख एवढ्या रोजगाराची संधी निर्माण होणार आहे. तसेच १० लाख कोटी एवढ्या निर्यातीचे लक्ष्य साध्य करण्याचे लक्षांक ठेवण्यात आले आहे. सर्वंकष धोरण तयार व्हावे आणि आयटी क्षेत्रातील उद्योजकांच्या आवश्यकतेनुसार नवे आयटी धोरण तयार व्हावे म्हणून मागील काही वर्षांत ३२ बैठका, २ चर्चासत्रे व ५ सादरीकरण झाले. त्याचप्रमाणे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील विविध भागधारकांशी वेळोवेळी चर्चा करण्यात आली.

झालेली चर्चा तसेच यापूर्वीची माहिती तंत्रज्ञान धोरणे राबविताना विभागाला आलेल्या अनुभवाच्या आधारे, महाराष्ट्र राज्याचे नवीन माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा - २०२३ चे प्रारूप तयार करण्यात आले. दोन वर्षे रखडलेल्या धोरणाला उद्योगमंत्री उदय सामंत यांनी अंतिम स्वरूप दिले.

## इज ऑफ डुईंग बिझिनेसला मिळेल प्रोत्साहन

**सिंगल टेक्नॉलॉजी इंटरफेस :** राज्यात व्यवसाय करताना व्यवसायिकांना कोणतीही अडचण येऊ नये आणि व्यवसायवाढीत सुलभता असावी यासाठी माहिती तंत्रज्ञानामध्ये इज ऑफ डुईंग बिझिनेसला प्रोत्साहन देण्यात येत आहे. राज्य शासन माहिती तंत्रज्ञान इंटरफेस (MAHITI) सुरू करणार आहे. त्याद्वारे कालबद्ध मंजुरी, घटक नोंदणी, प्रोत्साहन आणि इतर विस्तार सेवा आणि मैत्रीद्वारे सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील.

**स्टार्टअप व इनोव्हेशन :** उदयोन्मुख तंत्रज्ञानातील नावीन्येतला चालना देण्यासाठी आणि महाराष्ट्र राज्याला 'ज्ञान नेतृत्व अर्थव्यवस्था' म्हणून स्थापित करण्याकरीता महाराष्ट्र हब (M-Hub) उपक्रम आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम, नवउद्यमशील घटक, उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रातील उबवण केंद्र (incubation center) यांना आर्थिक सहाय्य देण्याकरीता ५०० कोटी एवढा निधी उभारण्यात येणार आहे.



मा.डॉ.हर्षदीप कांबळे, भा.प्र.से
प्रधान सचिव, उद्योग

**वॉक टू वर्क :** राज्यातील माहिती तंत्रज्ञान उद्याने व माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान



मा.श्री.दीपेंद्र सिंह कुशवाह, भा.प्र.से
विकास आयुक्त (उद्योग)

सहाय्यभूत सेवा धोरण विकसित करण्याकरीता पात्रता निकष आणि क्षेत्र वापरविषयक निकष शिथिल करण्यात येणार आहेत. भविष्यामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी निवाऱ्याची सोय उपलब्ध करून देण्यात येईल. म्हणजेच अगदी (वॉक टू वर्क) चालत जाऊन कार्यालयात पोहोचता येणार आहे, प्रवासाची दगदग वाचेल, वेळ वाया जाणार नाही. त्यामुळे कुटुंबाला अधिक वेळ देता येणार आहे.

**भविष्यातील कौशल्ये :** भविष्यातील रोजगारक्षमता आणि कौशल्यांना प्रोत्साहन देण्यावर या धोरणात भर देण्यात आला आहे. भविष्यात आयटी क्षेत्रात काम करण्यासाठी वेगळ्या प्रकारची कौशल्ये लागणार आहेत. (एआय जॉब) कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील संशोधन वैज्ञानिक, सोल्यूशन आर्किटेक्ट, डेटा वैज्ञानिक, ऑप्टिकल वैज्ञानिक, एम्बेडेड सोल्यूशन्स अभियंता यासारखे सुपर स्पेशलाइज्ड नोकरीच्या भूमिकेत मान्यताप्राप्त कर्मचारी असलेल्या कंपन्यांना यासाठी प्रोत्साहन दिले जाईल.

**टॅलेंट लॉंच पॅड :** राज्यभरातील माहिती तंत्रज्ञान व माहिती क्षेत्रासाठी 'टॅलेंट लॉंचपॅड' विकसित करण्यासाठी उद्योग विभाग, कौशल्य विकास विभाग आणि उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग एकत्रितरीत्या काम करतील. सध्याची महाविद्यालये, कौशल्य संस्था व कौशल्य अभ्यासक्रम उपलब्ध करून देणारी प्रशिक्षण केंद्रे यांच्यासाठी स्पर्धा आयोजित केल्या जातील आणि हेकेथॉनद्वारे मदत केली जाईल.

**प्रादेशिक विकास :** झोन-१ वगळता इतर प्रादेशिक क्षेत्रांमध्ये गुंतवणूक आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी या क्षेत्राच्या शाश्वत व संतुलित प्रादेशिक विकासाला प्रोत्साहन देण्यात येईल. तसेच मोठ्या माहिती तंत्रज्ञान घटकांसह सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांच्या वाढीस सहाय्य करण्यासाठी हस्तक्षेप करण्यात येईल.

**उद्योगाधारित कार्यप्रणाली / संरचना :** महाराष्ट्र हब (M-Hub) अंतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी (Chief Operating Officer) यांची महाराष्ट्राचे तंत्रज्ञान राजदूत (Technology Ambassador) म्हणून नियुक्ती करण्यात येईल. त्यांच्याद्वारे खाजगी क्षेत्राच्या दृष्टिकोनातून धोरण आणि कार्यप्रदर्शन आदेशाचे (Performance Mandate) प्रतिनिधित्व आणि व्यवस्थापन करणे व राज्याच्या माहिती तंत्रज्ञान उद्योगामध्ये जागतिक सर्वोत्तम पद्धती राबविण्यात येतील.

**कामगिरीचे सनियंत्रण :** जागतिक बाजारपेठेच्या गतिशीलतेशी जुळवून घेण्यासाठी या धोरणाच्या कामगिरीचा शक्तीप्रदान समितीमार्फत वेळोवेळी आढावा घेण्यात येईल. समितीमार्फत जागतिक मागणी तसेच महाराष्ट्राची भविष्यातील गरज ओळखून धोरणामध्ये आवश्यक त्या सुधारणा वेळोवेळी करण्यात येतील.

**एव्हीजीसी आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रास सहाय्य :** राज्याच्या एव्हीजीसी आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रास (AL-ML, Big Data, Robotics etc.) विशिष्टपणे सहाय्य करण्यासाठी धोरणामध्ये आर्थिक व बिगर आर्थिक प्रोत्साहनांचा अंतर्भाव करून गुणवत्ता, जागा, निधी व भरती प्रक्रिया इत्यादी करीता सहाय्य करण्यात येईल.

**हायब्रिड वर्किंग :** राज्य शासनाद्वारे कामगारांच्या सहकार्याने कामकाज पार पाडण्यासाठी सक्रियपणे प्रोत्साहन दिले जाईल. शहरी केंद्रांमधील गर्दी कमी करणे, माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा क्षेत्रासाठी २४ x ७ काम करण्याची परवानगी देणे आणि कार्यालयातील नॉन-क्रिटिकल कर्मचाऱ्यांसाठी घरबसल्या कामांना मदत करणे हा यामागील उद्देश आहे.

**माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटकांना प्रोत्साहने :**

राज्यभरात माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटकांच्या विकासाला चालना देण्यासाठी या धोरणाद्वारे मुद्रांक शुल्क सवलत, भाडेखर्च, विद्युत खर्च, मालमत्ता कर व वीज दर इत्यादीमध्ये सवलती दिल्या जातील. रोजगारनिर्मिती होण्यासाठी उदयोन्मुख तंत्रज्ञान घटकांना विशिष्ट प्रोत्साहने दिली जाणार आहेत.

डेटा सेंटरचे विकसन करण्यासाठी या क्षेत्राला मानक वाहनतळ निकषांपासून (standard parking norms) सूट, उद्योग आणि पायाभूत सुविधाविषयक दर्जा तसेच पात्र घटकांना खुल्या प्रवेशासाठी (Open Access) अपारंपरिक ऊर्जा मिळवण्याची आणि डेटा सेंटर पार्कसाठी कॅप्टिव्ह पॉवर प्लॅंट विकसित करण्याची परवानगी देण्यात आली आहे. तसेच वित्तीय व बिगर वित्तीय प्रोत्साहने अनुज्ञेय करण्यात आली आहेत.

उदयोन्मुख तंत्रज्ञान यामध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स, ३डी प्रिंटिंग, इंटरनेट ऑफ थिंग्स आणि रोबोटिक्स, नॅनो-टेक्नोलॉजी इत्यादींचा समावेश असलेल्या उद्योग - ४.० यांच्या वाढीसाठी या धोरणांतर्गत थेट सहकार्य करणे, राज्यात माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटकांमध्ये उच्च रोजगारक्षम आणि गुणवत्तापूर्ण मनुष्यबळाची निर्मिती सुनिश्चित करण्याकरीता या धोरणांतर्गत कौशल्य विकासाच्या अभ्यासक्रमावर (Super Specialized Job Roll) लक्ष केंद्रित करण्यात आले असून त्याकरीता कौशल्य विकास विभाग व उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचेशी समन्वय ठेवून कार्य करण्यात येणार आहे.



मा.श्री.संजय देगांवकर
उद्योग सहसचिव

**डिजिटल अर्थव्यवस्थेच्या अंमलबजावणीला प्रोत्साहन :** भारताकडे अध्यक्षपद असलेल्या जी-२० राष्ट्रगटाच्या बैठका देशाच्या विविध शहरांमध्ये आयोजित करण्यात येत आहेत. यात 'डिजिटल अर्थव्यवस्था कार्यगट' हा स्वतंत्र गट असून या बैठकांत डिजिटल सुरक्षितता आणि डिजिटल अर्थव्यवस्थेला चालना देण्यासंबंधी धोरणांवर चर्चा व त्यासंबंधी धोरणे तयार करण्यासबंबंधी चर्चा करण्यात आली. हा गट पूर्वी डिजिटल अर्थव्यवस्था कृती गट म्हणून ओळखला जात होता. सुरक्षित, परस्परांशी जोडलेली आणि सर्वसमावेशक अशा डिजिटल अर्थव्यवस्थेच्या अंमलबजावणीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने या गटाची स्थापना २०१७ मध्ये जर्मनीच्या जी-२० अध्यक्षपदाचा एक भाग म्हणून करण्यात आली. जागतिक डिजिटल अर्थव्यवस्थेचे मूल्य ११ ट्रिलियन डॉलर्स असेल असा अंदाज आहे. २०२५ पर्यंत ते २३ ट्रिलियन डॉलर्स पर्यंत पोहोचण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

डिजिटल क्षेत्रात जागतिक धोरणाला आकार देण्यात डिजिटल अर्थव्यवस्था कार्यगट महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो. भारताच्या जी-२० अध्यक्षतेचा एक भाग म्हणून, केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे उत्तर प्रदेशातील लखनौ येथे १३ ते १५ फेब्रुवारी २०२३ दरम्यान या कार्यगटाची पहिली आणि तेलंगणातील हैदराबाद येथे १७ ते १८ एप्रिल २०२३ या कालावधीत दुसरी बैठक आयोजित करण्यात आली होती. तिसरी बैठक पुणे येथे १२ ते १४ जून २०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे.

पुणे येथे झालेल्या बैठकीस जी-२० सदस्य देशांव्यतिरिक्त, भारताने बांगलादेश, इजिप्त, मॉरिशस, नेदरलँड्स, नायजेरिया, ओमान, सिंगापूर, स्पेन आणि संयुक्त अरब अमिराती या अतिथी देशांना आणि आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघटना, ओईसीडी, जागतिक बँक, युनेस्को आणि यूएनडीपी या संघटनांना डिजिटल अर्थव्यवस्था कार्यगट बैठकीत सहभागी होण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते.

डिजिटल अर्थव्यवस्था कार्यगट बैठकीमध्ये अनेक कार्यशाळा, चर्चा आणि अनुभवांचे आदानप्रदान होते. लखनौमधील पहिल्या डिजिटल अर्थव्यवस्था कार्यगट बैठकीच्या निमित्ताने इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने अनेक द्विपक्षीय बैठका घेतल्या आणि अनेक उपक्रम सुरू केले. यामध्ये 'स्टे सेफ ऑनलाइन' मोहीम, जी-२० डिजिटल इनोव्हेशन अलायन्स, 'डिजिटल पेमेंट' मोहीम, इमर्सिव्ह डिजिटल मोबाइल व्हॅन या उपक्रमांचा समावेश होता. एकूणच डिजिटल अर्थव्यवस्था कार्यगट अजेंड्याला पूरक संकल्पनेवर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून डिजिटल इंडियाने भारतातील अब्जावधी लोकसंख्येचे जीवन कसे बदलले आहे, हे दाखवण्यासाठी व्हर्च्युअल रिॲलिटी अनुभव केंद्रासह एक प्रदर्शनही लखनौ येथील बैठकीच्या वेळी उभारण्यात आले होते.

भारताच्या अध्यक्षपदाच्या काळात डिजिटल अर्थव्यवस्था कार्यगट बैठकांमधे डिजिटल परिवर्तन आणि जागतिक डिजिटल अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून नवोन्मेषला चालना देण्यासाठी आणि डिजिटल कुशल मनुष्यबळाद्वारे सुरक्षित सायबर वातावरणात सार्वजनिक सेवा प्रदान करण्यासाठी काम करण्यावर भर देण्यात येणार आहे.

पुणे येथे १२ ते १४ जून दरम्यान आयोजित 'डिजिटल इकॉनॉमी वर्किंग ग्रुप' बैठकीत डिजिटल इकॉनॉमी संदर्भातील पायाभूत सुविधांचा दैनंदिन व्यवहार, प्रशासन आणि उद्योग व व्यापार क्षेत्रावर होणाऱ्या परिणामांबाबत चर्चा झाली. विविध देशांमधील चांगल्या संकल्पनादेखील बैठकीत मांडण्यात आल्या.

**जी-२० राष्ट्रगटाचे महत्त्व :** जी-२० हा जगातल्या प्रमुख विकसित आणि विकसनशील देशांचा राष्ट्रगट आहे. पूर्व आशिया आणि आग्नेय आशियात १९९७ साली आलेल्या आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर जी-२० गट उदयास आला. जागतिक अर्थव्यवस्थेच्या संदर्भात महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी औद्योगिकदृष्ट्या प्रगत आणि विकसनशील देशांना एकत्र आणण्याच्या हेतूने जी-२० संघटनेची स्थापना करण्यात आली. यात भारताशिवाय अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, कॅनडा, चीन, फ्रान्स, जर्मनी, इंडोनेशिया, इटली, जपान, दक्षिण कोरिया, मेक्सिको, रशिया, सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका, तुर्की, ब्रिटन, अमेरिका अशा १९ देशांचा समावेश आहे.

जगातली ६० टक्के लोकसंख्या जी-२० सदस्य राष्ट्रांमध्ये राहते. जागतिक जीडीपीच्या ८५ टक्के जीडीपी या देशांतून येतो. जागतिक व्यापारातील ७५ टक्क्यांहून अधिक व्यापार जी-२० सदस्य देशांत एकवटला आहे. जगाच्या एकूण लोकसंख्येच्या दोन-तृतीयांश लोकसंख्या या देशांत आढळते. या पार्श्वभूमीवर साहजिकच या राष्ट्रगटाचे काम अतिशय महत्त्वाचे आणि प्रभावी आहे. विकसनशील आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांना सामावून घेऊन जगाच्या अर्थव्यवस्थेला स्थिरता देणे, हा या गटाचा उद्देश आहे.

*(या लेखाचे लेखक 'उद्योजक' मासिकाचे व्यवस्थापकीय संपादक व 'उद्योजक' विभाग प्रमुख म्हणून एमसीईडी मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत आहेत. त्यांचा ई-मेल udyojakmagazine2@gmail.com असून भ्रमणध्वनी ९४०३०७८७७९ आहे.)*




मुंबई-पुण्यानंतर राज्यातील तिसरे केंद्र, 2 लाख 65 हजार चौरस फुटावर विस्तार

# इन्फोसिस नागपुरातही, 230 कोटी गुंतवणूक, 3 हजार रोजगार

**जागतिक कीर्तीची आयटी कंपनी इन्फोसिसने आता विदर्भात पाऊल ठेवले आहे. मुंबई-पुण्यानंतर कंपनीने राज्याची उपराजधानी नागपूरमध्ये तिसरे विकास केंद्र सुरू केले आहे. या माध्यमातून इन्फोसिसने २३० कोटी रुपयांची गुंतवणूक केली असून या माध्यमातून ३ हजारांहून अधिक रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. विशेष म्हणजे आपल्याच शहरात चांगल्या संधी मिळाल्याने तरुण वर्गाचे मोठ्या शहरातील स्थलांतर थांबून शहराच्या विकासात त्यांचा हातभार लागेल. - प्रतिनिधी**

जगातील आघाडीची माहिती तंत्रज्ञान कंपनी इन्फोसिसच्या नागपूर विकास केंद्राचे उद्घाटन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी बोलताना फडणवीस म्हणाले, मिहान नागपूरचा ड्रिम प्रोजेक्ट आहे. येथे उत्तम दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण केल्याने उद्योजकांचे पसंतीचे ठिकाण ठरले आहे. इन्फोसिससारख्या जागतिक कीर्तीच्या अनेक कंपन्या येथे उभ्या राहत आहेत. त्यामुळे नागपूर हे वेगाने वाढणारे 'बिझिनेस सेंटर' असून शहराची हळूहळू आयटी हबच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. नागपूर येथे उभे राहिलेले इन्फोसिसचे हे मी आतापर्यंत पाहिलेल्या केंद्रांपैकी अतिशय चांगले केंद्र आहे. या ठिकाणी ३ हजार रोजगार उपलब्ध होणार आहे. केंद्राने आपला विस्तार करून अधिक रोजगाराच्या संधी निर्माण केल्या पाहिजे. नागपूर, विदर्भातील युवकांना संधी दिल्यास केंद्राचा व्याप गतीने वाढेल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

**देशाच्या विकासात तंत्रज्ञानाचे महत्त्व :** देशाने ५ ट्रिलीयन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी महाराष्ट्राचा प्रमुख पुढाकार राहणार आहे. डिजिटल वापरात भारत जगाचे नेतृत्व करतो आहे. आज भाजीपाला विक्रेते देखील डिजिटल व्यवहार करताना आपण पाहतो. माहिती तंत्रज्ञानाच्या यशस्वी वापरात भारताने ३० वर्षाचा टप्पा गाठला. या तंत्रज्ञानाचे महत्त्व नागरिकांना समजले आहे. विकासात तंत्रज्ञानाचे महत्त्वाचे योगदान आहे. भारतासारख्या देशात केवळ तंत्रज्ञानामुळे विकास शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला आहे, असे फडणवीस म्हणाले.

**३ वर्षात १ लाख रोजगार :** गडकरी म्हणाले, देशाचा आर्थिक विकास वेगाने होत आहे. आत्मनिर्भर भारताचे स्वप्न आपण बाळगले आहे. त्यासाठी इन्फोसिस सारख्या कंपन्यांचे योगदान महत्त्वाचे असणार आहे. मिहानमध्ये उत्तम दर्जाच्या पायाभूत सुविधा आपण निर्माण केल्या. पाणी, रस्ते, पुल, मेट्रोचे चांगले नेटवर्क तयार केले आहे. नागपुरात उत्तम दर्जाचे नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ आपण लवकरच उभे करू. पुढील तीन वर्षात नागपुरात अतिरिक्त १ लाख रोजगार निर्माण होतील. इन्फोसिसला भविष्यात लागणाऱ्या बाबींसाठी सहकार्य करू असेही त्यांनी सांगितले.

**विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधी :** पुणे व मुंबईनंतर नागपूर येथे सुरू झालेले इन्फोसिसचे हे महाराष्ट्रातील तिसरे केंद्र आहे. २३० कोटींची गुंतवणूक या केंद्रासाठी करण्यात आली असून येथे ३००० रोजगार निर्माण होणार आहेत. २ लाख ६५ हजार चौरस फूट जागेवर केंद्राचे बांधकाम करण्यात आले. बांधकामात कला व विज्ञानाचा संयोग करण्यात आला आहे. या केंद्रात युवकांना क्लाउड, एआय आदी अत्याधुनिक तंत्रज्ञानासह दूरसंचार, बँकींग, रिटेल, एअरोस्पेस, वाहन, लॉजिस्टिक, उत्पादन आदी विविध क्षेत्रातील डिजिटल तंत्रज्ञानावर काम करण्याची संधी मिळणार आहे.

याप्रसंगी खासदार कृपाल तुमाने, इन्फोसिसचे मुख्य वित्तीय अधिकारी नीलांजन रॉय, कार्यकारी उपाध्यक्ष सुनीलकुमार धानेश्वर, वरिष्ठ उपाध्यक्ष तरंग पुराणिक, उपाध्यक्ष नीलाद्री प्रसाद मिश्रा यावेळी उपस्थित होते. सुरुवातीला फडणवीस व गडकरी यांनी फित कापून केंद्राचे उद्घाटन केले. केंद्राच्या परिसरात वृक्षारोपन केले. प्रास्ताविकात इन्फोसिसचे मुख्य वित्तीय अधिकारी नीलांजन रॉय यांनी केंद्राच्या स्थापनेची माहिती दिली. आभार वरिष्ठ उपाध्यक्ष तरंग पुराणिक यांनी मानले.

**इन्फोसिसचा जगभरात विस्तार :** इन्फोसिस ही आउटसोर्सिंग, तंत्रज्ञान आणि सल्लागार सेवांमध्ये जगभरातील अग्रणी कंपनी आहे. एन.आर. नारायणमूर्ती यांनी ५ भागीदारांसह १९८१ मध्ये याची स्थापना केली. १९८३ मध्ये कंपनीचे कार्यालय पुण्याहून बंगळुरू येथे स्थलांतरित करण्यात आले. १९९१ मध्ये उदारीकरणानंतर इन्फोसिसने वेगवान वाढ अनुभवली. सद्या जगातील ४५ हून अधिक देशांमध्ये कंपनीचा विस्तार आहे. येथे २,५०,००० हून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. कंपनी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील सेवा पुरविते. नारायण मूर्ती यांनी १९८१ ते २००२ या काळात कंपनीच्या सीईओ पदावर काम केले. मूर्ती यांनी त्यांच्या काळात इन्फोसिसला एक सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय ब्रँड आणि एक आघाडीची तंत्रज्ञान कंपनी बनवण्यात योगदान दिले. २००२ मध्ये नंदन नीलेकणी इन्फोसिसचे नवे सीईओ बनले. नीलेकणी यांनी कंपनीच्या नवीन क्षेत्रांमध्ये विस्तार आणि वाढ करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. ते २००९ ते २०१४ पर्यंत भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाचे अध्यक्ष होते. या काळात त्यांनी संपूर्णपणे भारतीय तंत्रज्ञान क्षेत्राच्या वाढीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. ■■



## मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमातून उद्योजक बनण्याची संधी

# धोरण रोजगार निर्मितीचे, उद्दिष्ट प्रगत महाराष्ट्राचे

**''नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे व्हा'', असे नेहमी सांगितले जाते. मात्र, मार्गदर्शन व गुंतवणुकीसाठी पैशांचा अभाव असल्याने अनेकांचे उद्योजक होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरत नाही. ते सत्यात उतरविण्यासाठी मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम म्हणजेच सीएमईजीपी मोलाची भूमिका बजावत आहे. मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी) या योजनेस मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेजी व मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी यांच्या नेतृत्वाखालील युती सरकारने या योजनेत सुधारणा करण्याबाबतचा निर्णय नुकताच घेतलेला आहे. या योजनेअंतर्गत निर्मिती व उत्पादन क्षेत्रासाठी ५० लाख, तर सेवा व कृषिपूरक प्रकल्पांसाठी २० लाख रुपयांपर्यंतचे अर्थसहाय्य केले जाते. योजनेचे लक्षांक सहापटीने वाढविण्यात आले आहेत. यावर्षी ५४१ कोटींची तरतूद करण्यात आली असून, याचा लाभ सुमारे ३०,००० घटकांना होणार आहे. या सुधारित तरतुदींचा आढावा या लेखात घेण्यात आला आहे. या योजनेस मोठ्या प्रमाणात अनुदानही उपलब्ध आहे, तर वाट कशाची बघता... आपले स्वप्न साकारण्यासाठी, स्वतःचा स्वयंरोजगार उभारण्यासाठी आजच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाचा (सीएमईजीपी) लाभ घ्या व उद्योजक बनण्याचे स्वप्न साकार करा. - संतोष बोर्डे**

राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण-२०१९ अंतर्गत अनेक नावीन्यपूर्ण योजना व कार्यक्रम महाराष्ट्र शासनाने हाती घेतले आहेत. सूक्ष्म व लघु उपक्रमांना चालना देण्यासाठी तसेच राज्यात व्यापक प्रमाणात रोजगाराच्या संधी स्थानिक ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजना जाहीर केली आहे.

राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक-युवतींची वाढती संख्या व उद्योग, व्यवसाय क्षेत्रात राज्यात विविध क्षेत्रांत उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगाराच्या व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी व सर्जनशीलतेला कालानुरूप वाव देणारी सर्वसमावेशक

'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' ही योजना दिनांक १ ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयान्वये सुरू करण्यात आली आहे.

**मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजना (CMEGP)**

**Chief Minister Employment Generation Programme**

**स्वयंरोजगारास देई आधार, हेच आपले सरकार!**

**उद्देश :** राज्यातील युवक/युवतींच्या सर्जनशीलतेला वाव मिळून राज्यात स्वयंरोजगारास पूरक वातावरण तयार करणे, त्याद्वारे राज्यात ग्रामीण तसेच शहरी क्षेत्रात सूक्ष्म, लघु उपक्रमांद्वारे व्यापक रोजगाराच्या संधी

निर्माण होण्यासाठी शासनाच्या आर्थिक सहाय्यातून प्रकल्प उभारणीस हातभार लावणे.

**दिनांक ०१/०८/२०१९ च्या शासन निर्णयामधील तरतूद :**

**पात्रता अटी :** - राज्यात स्थानिक अधिवास असलेल्या व किमान १८ ते ४५ वयोगटातील स्वयंरोजगार करू इच्छिणारे उमेदवार. विशेष प्रवर्गासाठी (अनुसूचित जाती/जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक) ५ वर्षांची अट शिथिल.

- रु.१० लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान शैक्षणिक पात्रता ७ वी पास व रु.२५ लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान १० वी पास.

- अर्जदाराने यापूर्वी अनुदान समाविष्ट असलेल्या राज्य तसेच केंद्र शासनाच्या/महामंडळांच्या योजनेतून लाभ घेतलेला नसावा.

**प्रकल्प मर्यादा किंमत :** - उत्पादन व निर्मिती प्रकल्पांसाठी कमाल रु. ५० लाख व सेवा/कृषिपूरक उद्योग प्रवर्गातील प्रकल्पांसाठी कमाल रु. १० लाख.

**योजना अंमलबजावणी यंत्रणा :** अ) शहरी भागासाठी : जिल्हा उद्योग केंद्र ब) ग्रामीण भागांसाठी : जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय एकत्रित समन्वय व सनियंत्रण, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.

**पात्र मालकी घटक :** वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले स्वयंसहाय्यता गट.

**प्रकल्प खर्च उभारणी व राज्य शासनाचे आर्थिक सहाय्य (मार्जिन मनी-अनुदान) :**

**बँक/वित्तीय संस्था यांचा सहभाग :** मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत स्वयंगुंतवणूक व राज्य शासनाचे (अनुदान स्वरूपातील) आर्थिक सहाय्य या व्यतिरिक्त आवश्यक ६० ते ७५ टक्के कर्ज पुरवठा बँकांमार्फत उपलब्ध होईल. राज्यातील राष्ट्रीयकृत बँका, शेड्युल्ड बँका, खाजगी बँका, सुधारित तरतुदींनुसार काही जिल्ह्यांतील मध्यवर्ती सहकारी बँका, इत्यादीमार्फत बँक कर्ज उपलब्ध होईल.

**लाभार्थी निवड :** मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेची संपूर्ण ऑनलाइन पद्धतीने अंमलबजावणी होईल. यासाठी विशेष सीएमईजीपी पोर्टल अर्जदारांसाठी उपलब्ध असेल. अर्जदारांनी अर्ज केल्यानंतर जिल्हा स्तरावरील स्थापित कार्यबल समितीच्या छाननीअंती मान्यता दिलेले प्रस्ताव संबंधित बँकांना शिफारस करण्यात येतील. बँकांमार्फत प्रकल्पांची आर्थिक व्यवहार्यता तपासून प्रकल्प मंजुरी व कर्ज मंजुरीबाबत बँक निर्णय घेईल. बँक मंजुरीच्या अनुषंगाने मंजुर प्रकल्प किमतीस पात्र असणारे अनुदान संबंधित कर्ज खात्यात राज्य शासनाच्या तरतुदीतून वितरित होईल. राज्य शासनाचे अनुदान ३ वर्षे कालावधीसाठी लॉक इन राहील. प्रकल्प यशस्वीरीत्या अंमलबजावणी झाल्याची खात्री लावल्यानंतर राज्य शासनाचे अनुदान वितरित होईल. संपूर्ण प्रक्रिया ही ऑनलाइन असल्याने अर्जदारांना कार्यालयात भेटी देण्याची आवश्यकता नाही.

**प्रशिक्षण :** योजनेअंतर्गत कर्ज प्रस्ताव मंजुर झालेल्या अर्जदारांसाठी निःशुल्क निवासी स्वरूपाचे उद्योजकीय प्रशिक्षण शासनमान्य संस्थांच्या सहयोगाने आयोजित करण्यात येईल. सदर प्रशिक्षण, उत्पादन प्रवर्गातील प्रकल्पांसाठी २ आठवडे व सेवा, कृषिपूरक उद्योग, व्यवसायांसाठी १ आठवडा मुदतीचे असेल. कर्ज वितरणापूर्वी सदर प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक राहील.

सदर प्रशिक्षणात उद्योजकीय व्यक्तिमत्त्व विकसित होणारे, क्षमतावृद्धी व आत्मविश्वास वाढविणारे, विविध विषयतज्ज्ञांचे मार्गदर्शन, उद्योग भेटी, यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन इ. प्रमुख बाबींचा समावेश असेल.

**(अ) सर्वसाधारण आवश्यक कागदपत्रे :**

- जन्म दाखला/शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/वयाचा पुरावा; - शैक्षणिक पात्रतेसंबंधीची कागदपत्रे/प्रमाणपत्रे; - आधार कार्ड; - नियोजित उद्योग/व्यवसाय जागेबाबतचे दस्ताऐवज, भाडेकरार (साध्या कागदावरील प्राथमिक संमती), बँक मंजुरीनंतर नोंदणीकृत भाडेकरार बँकेस सादर करावा लागेल; - जातीचे प्रमाणपत्र (एस.सी./एस.टी.प्रवर्गासाठी); - विशेष प्रवर्गासाठीचे पूरक प्रमाणपत्र (अपंग, माजी सैनिक); - वाहतुकीसाठी परवानगी व वाहन चालविण्याचा परवाना; - स्वसाक्षांकित विहित नमुन्यातील वचनपत्र (Undertaking)

**(ब) संगणकीय प्रणालीवर (CMEGP PORTAL) आवश्यक माहिती नोंदविल्यास प्रकल्प संकीर्ण अहवाल तयार होईल. त्याची प्रत उपरोक्त कागदपत्रांसोबत अर्जासमवेत सादर करावी.**

**मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम - अर्ज व प्रकल्प उभारणींतर्गत टप्पे :**

जिल्हा स्तरावर CMEGP पोर्टलवर महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांचेकडे ऑनलाइन अर्ज सादर.

- महाव्यवस्थापकांच्या अध्यक्षतेखाली प्रस्तावांची छाननी, प्राथमिक पात्र प्रस्तावांची यादी.

- जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीमार्फत प्रस्तावांची अंतिम निवड व विविध बँकांना कार्यक्षेत्रनिहाय कर्ज प्रस्तावांची शिफारस.

- बँकस्तरावर प्रस्तावाची आवश्यक ती शहानिशा कर्ज प्रस्ताव मंजुरीबाबत बँकेकडून अंतिम निर्णय.

प्रस्तावास बँक मंजुरी असल्यास बँकेकडून सादर शासनाच्या अनुदान (मार्जिन मनी) प्रस्तावाची उद्योग संचालनालयाकडून छाननी व मंजुरी. उद्योग संचालनालयाच्या मान्यतेनंतर नोडल बँकेद्वारा संबंधित बँकेस अनुदान वितरण निर्देश.

अर्जदारांनी स्वतःची ५ ते १० टक्के रक्कम उपलब्ध केल्यावर व आवश्यक प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर मंजुर रकमेचे पूर्ण कर्ज वितरण.

- प्रकल्प उभारणी व कार्यान्वयन

- ३ वर्षे प्रकल्प यशस्वीपणे अंमलबजावणी झाल्यानंतर शासनाच्या अनुदानाचे अर्जदाराच्या कर्ज खात्यात समायोजन (Settlement of Claim).

**सुधारित शासन निर्णय ११/११/२०२२ :** मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सुकाणू समितीने केलेल्या शिफारशीनुसार, मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेबाबत दिनांक ०१/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतुदींमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आल्या आहेत.

**मुद्दा क्र.१ (ब) पात्र मालकी घटक :** उपरोक्तप्रमाणे पात्रता धारण करणारे वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट.

**सुधारित तरतूद :** उपरोक्तप्रमाणे पात्रता धारण करणारे वैयक्तिक मालकी,

भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट यांचेसह एकल मालकी कंपनी (ओपीसी) व मर्यादित दायित्व संस्था (एलएलपी).

**मुद्दा क्र. २ (२.१)** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमा'मध्ये पात्र उद्योग/व्यवसायांतर्गत प्रकल्प किंमत कमाल मर्यादा सेवा उद्योग तसेच कृषिपूरक उद्योग/व्यवसायासाठी रुपये २०.०० लाख व उत्पादन प्रकाराच्या प्रवर्गातील प्रकल्पासाठी प्रकल्प किंमत मर्यादा रुपये ५०.०० लाख राहील.

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमा'मध्ये पात्र उद्योग/व्यवसायांतर्गत प्रकल्प किंमत कमाल मर्यादा सेवा उद्योग तसेच कृषिपूरक उद्योग/व्यवसायासाठी रुपये २०.०० लाख व उत्पादन प्रकाराच्या प्रवर्गातील प्रकल्पासाठी प्रकल्प किंमत मर्यादा रुपये ५०.०० लाख राहील.

**मुद्दा क्र. २ (२.२) प्रकल्प खर्चाचे वर्गीकरण :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत प्रकल्प उभारणीचा खर्च वर्गीकरण पुढीलप्रमाणे असेल. घटकाचा प्रवर्ग/प्रभाग - अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक/इतर मागास वर्ग/विमुक्त व भटक्या जमाती/अल्पसंख्याक

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत प्रकल्प उभारणीचा खर्च वर्गीकरण पुढीलप्रमाणे असेल.

**घटकाचा प्रवर्ग/प्रभाग :**

| घटकाचा प्रवर्ग/प्रभाग | घटकाची स्वगुंत-वणूक | देय अनुदान (मार्जिन मनी) | | बँक कर्ज | |
|---|---|---|---|---|---|
| घटकाचा प्रभाग | --- | शहरी | ग्रामीण | शहरी | ग्रामीण |
| अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक/इतर मागास वर्ग/विमुक्त व भटक्या जमाती/अल्पसंख्याक | ५% | २५% | ३५% | ७०% | ६०% |
| उर्वरित प्रवर्ग | १०% | १५% | २५% | ७५% | ६५% |

**मुद्दा क्र. ३ (३.२.१) वित्तीय संस्था (बँक) :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत कर्ज प्रस्ताव जिल्हा कार्यबल समितीच्या मंजुरीने संबंधित बँकाकडे कर्ज मंजुरीसाठी शिफारस करण्यात येतील. सरकारी बँका, तसेच खाजगी क्षेत्रातील शड्युल्ड बँका - येस बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक इ. प्रमुख बँका सहयोगी संस्था म्हणून कार्यरत राहतील.

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत कर्ज प्रस्ताव जिल्हा कार्यबल समितीच्या मंजुरीने संबंधित बँकाकडे कर्ज मंजुरीसाठी शिफारस करण्यात येतील. सरकारी बँका, तसेच खाजगी क्षेत्रातील शेड्युल्ड बँका - येस बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक, सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड (शेड्युल्ड बँक) या व्यतिरिक्त ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक इ. प्रमुख बँका सहयोगी संस्था म्हणून कार्यरत राहतील.

**मुद्दा क्र. ३ (३.२.२) :** योजनेच्या अंमलबजावणीसाठी येणाऱ्या खर्चाबाबत तरतूद.

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' योजनेच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी योजनेअंतर्गत विशेष आयटी व समन्वय कक्षासाठीचा खर्च तसेच जिल्हा, विभागीय व मुख्यालय स्तरावर प्रवास खर्च, पुरस्कार, कार्यशाळा/शिबीर/प्रदर्शन, स्टेशनरी, संगणक व प्रिंटर दुरुस्ती इ. तसेच उद्योग संचालनलायच्या अधिनस्त कार्यालयात सीएमईजीपी योजनेच्या विविक्षित कामासाठी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने उपलब्ध करून घेण्याकरीता अनुषंगिक खर्च इत्यादी आवश्यक सर्व बाबींकरीता स्वतंत्र उद्दिष्टनिहाय उद्दिष्ट शिर्षांची स्वतंत्र सूची निर्माण करण्यात येईल.

**उद्योग विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या सूक्ष्म, लघु घटकांसाठी इतर महत्त्वपूर्ण योजना/उपक्रम :**

१) प्रधानमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम, २) सुधारित बीज भांडवल योजना, ३) जिल्हा उद्योग केंद्र योजना, ४) महाराष्ट्र राज्य सूक्ष्म, लघु उपक्रम समूह विकास योजना, ५) केंद्र शासनाची सूक्ष्म, लघु उपक्रम समूह विकास योजना, ६) महिला उद्योजकता प्रोत्साहन योजना, ७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुसूचित जाती/जमाती उद्योजकता प्रोत्साहन योजना, ८) निवासी/अनिवासी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम, ९) काथ्या प्रोत्साहन योजना, १०) औद्योगिक अविकसित भागातील उद्योगांना प्रोत्साहन देणारी सामूहिक प्रोत्साहन योजना -२०१९. ११) माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान पूरक सेवा तसेच उद्योगक्षेत्रनिहाय/संवर्गनिहाय इतर योजना. १२) उद्योगांच्या अडीअडचणी तसेच आवश्यक परवाने/दाखले ऑनलाइन उपलब्ध होण्यासाठी मैत्री कक्ष सुविधा उपक्रम.

मागच्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी (CMEGP) योजनेचे लक्षांक पाचपटीने वाढविण्यात आले आहेत. यावर्षी ५५० कोटींची तरतूद करण्यात आली असून याचा लाभ सुमारे २५,००० घटकांना होणार आहे.

**अधिक माहिती व संपर्कासाठी :**

**राज्यस्तरीय संनियंत्रण :**

**विकास आयुक्त (उद्योग),** उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, २रा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.

**राज्यस्तरीय समन्वय :**

**हेल्पलाइन नंबर :** २२ २२०२ ३९१२.

**महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र** (संबंधित जिल्हा)

**जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी** (संबंधित जिल्हा)

**संकेतस्थळ -** www.maha-cmegp.gov.in

www.di.maharashtra.gov.in

*(या लेखाचे लेखक 'उद्योजक' मासिकाचे व्यवस्थापकीय संपादक व 'उद्योजक' विभाग प्रमुख म्हणून एमसीईडी मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत आहेत. त्यांचा ई-मेल udyojakmagazine2@gmail.com असून भ्रमणध्वनी ९४०३०७८७७९ आहे.)*



केंद्राच्या योजनांची माहिती देणारी विकसित भारत यात्रा मुंबईत

# भारत २०४७ पर्यंत होणार विकसित राष्ट्र

**भारत सन २०४७ पर्यंत विकसित देश होणार आहे. हा टप्पा गाठताना भारतातील सर्वसामान्य नागरिकांच्या मनामध्ये विश्वास निर्माण व्हावा, लोकांमध्ये जनजागृती व्हावी, यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 'विकसित भारत संकल्प यात्रा' सुरू करण्यात आली आहे. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येकाचा सहभाग गरजेचा आहे, असे प्रतिपादन प्रधानमंत्री कार्यालयाचे प्रमुख सचिव डॉ. पी. के. मिश्रा यांनी केले. मुंबईत विविध योजनांच्या लाभार्थ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. यात्रेला मुंबईत मोठा प्रतिसाद मिळाला. शासनाच्या योजना जाणून घेण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. - प्रतिनिधी**

'विकसित भारत संकल्प यात्रे'चे देशभरात १५ नोव्हेंबर २०२३ ते २६ जानेवारी २०२४ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी केंद्र शासनाने विशेष स्वरूपाची वाहने तैनात केली आहेत. बृहन्मुंबईतील २२७ प्रभागांमध्ये विशेष ४ वाहनांद्वारे दिनांक २८ नोव्हेंबर २०२३ ते दिनांक २६ जानेवारी २०२४ पर्यंत या यात्रेचे नियोजन करण्यात आले आहे. ४ जानेवारी रोजी मुंबईतील विविध विभागात यात्रा पोहोचली. यावेळी डॉ. पी. के. मिश्रा यांची विशेष उपस्थिती होती.

**२ कोटी लोकांची आरोग्य तपासणी :** गोरेगाव (पूर्व) मध्ये यात्रेद्वारे केंद्र आणि राज्य शासन पुरस्कृत योजनांची माहिती देण्यात आली. सुरुवातीला चित्रफीतीद्वारे नरेंद्र मोदी यांचा संदेश दाखविण्यात आला. डॉ. मिश्रा म्हणाले, ही यात्रा तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत पोहोचली आहे. २०४७ पर्यंत आपण एक विकसित राष्ट्र होऊ शकतो, याबाबत नागरिकांमध्ये विश्वास आणि जनजागृती निर्माण करणे गरजेचे आहे. तेच काम आपण विकसित भारत संकल्प यात्रेद्वारे करीत आहोत. या यात्रेत आतापर्यंत ९ कोटी नागरिक जोडले गेले आहेत. २ कोटीपेक्षा जास्त नागरिकांची या यात्रेदरम्यान आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. आपल्या देशातील युवक, महिला, सुशिक्षित बेरोजगार, उद्योजक यांना याद्वारे आत्मनिर्भर बनण्याची एक सुवर्णसंधी मिळाली आहे, असे त्यांनी नमूद केले.

**पंतप्रधानांचा ८ वेळा सहभाग :** मिश्रा म्हणाले, प्रधानमंत्री स्वतः विकसित भारत संकल्प यात्रेत आतापर्यंत ८ वेळा सहभागी झाले आहेत. एकही लाभार्थी वंचित राहणार नाही अशा प्रकारे प्रत्येकापर्यंत लाभ पोहोचवण्याच्या 'संतृप्तता दृष्टिकोनासह' विकासकार्ये करणे सुनिश्चित करण्याचा आणि सर्व पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा विकसित भारत संकल्प यात्रेचा उद्देश आहे. विकसित भारत संकल्प यात्रा हे जन भागीदारीचे प्रतीक बनले आहे. लोकसहभागामुळे देशाला मागील काळात मोठी उद्दिष्टे साध्य करण्यात मदत झाली आहे. स्वच्छ भारत आणि हर घर तिरंगा यासारख्या मोहिमा आणि कोविड-१९ व्यवस्थापन हे नागरिकांच्या सहभागामुळे आणि सहकार्यामुळे यशस्वी झाले. आजपर्यंत, ९ कोटी लोकं यात्रेत सहभागी झाले आहेत. दिवसेंदिवस अधिकाधिक लोक यात सहभागी होत आहेत. यात्रा आतापर्यंत १.५ लाखांहून अधिक ग्रामपंचायती आणि नगरपालिका क्षेत्रात पोहोचली आहे असे त्यांनी नमूद केले

**चांगले आयुष्य जगण्याची संधी :** मिश्रा म्हणाले, देशातील प्रत्येक घटकापर्यंत विकासाच्या संधी पोहोचवण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. जनतेला आत्मनिर्भर, चांगले आयुष्य जगण्यासाठी आवश्यक असलेल्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विविध योजना सुरू करण्यात आल्या आहेत. त्यांची जनजागृती करून त्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात येत आहेत. आपल्यालाही योजनांचा लाभ मिळणार आहे हा विश्वास जनतेमध्ये निर्माण करण्याचा उद्देश या विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून यशस्वी होत आहे. यात्रेत देशातील २ कोटी लोकांना आयुष्मान भारत कार्ड, स्टेट बँकेच्या वतीने सीएसआरच्या माध्यमातून शिलाई मशीन्स तर पीएम स्वनिधी योजनेंतर्गत देशात ५० लाखाहून अधिक फेरीवाल्यांना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य देण्यात आले. मुंबईमध्ये २३० ठिकाणी विकसित यात्रा उपक्रम झाले आहेत. ७० हजारांहून अधिक लोकांना लाभ देण्यात येत आहेत.

**संकल्प शपथेला प्रतिसाद :** कार्यक्रमादरम्यान 'संकल्प शपथ' घेण्यात आली. तसेच 'मेरी कहानी मेरी जुबानी' या अंतर्गत प्रातिनिधिक स्वरूपात ४ लाभार्थ्यांनी मान्यवरांसमोर अनुभव मांडले. त्यानंतर मुद्रा योजना, पीएम स्वनिधी योजना, आयुष्मान कार्ड लाभार्थी, दिव्यांग लाभार्थी आदींना प्रतिनिधीक स्वरूपात प्रमाणपत्र व धनादेश वाटप करण्यात आले. तसेच ५ महिला लाभार्थ्यांना शिलाई संयंत्रांचे वितरण करण्यात आले. आरोग्य तपासणी, उज्ज्वला योजना, विविध क्रीडा योजना, आधारकार्डशी संबंधीत कामकाज आदींचे दालन कार्यक्रमस्थळी उभारण्यात आले होते. या सर्व दालनांना मिश्रा यांनी भेट दिली. तसेच दालनांवर उपस्थित अधिकाऱ्यांशी संवाद साधून कोणकोणत्या योजनांना नागरिकांचा कसा प्रतिसाद मिळतोय, याबाबत देखील त्यांनी माहिती घेतली.

**मान्यवरांची उपस्थिती :** यात्रेला राज्याचे कौशल्य विकास उद्योजकता व नावीन्यता मंत्री तथा मुंबई उपनगरे जिल्हा पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार विद्या ठाकूर, आमदार अमीत साटम, आमदार राजहंस सिंह, महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. इकबाल सिंह चहल, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) अश्विनी भिडे, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.



जगभरात मंदी,
भारतात मात्र चांदी

# स्थिर सरकार, राम मंदिरामुळे बाजारात उत्साह

**रशिया-युक्रेन युद्ध, पॅलेस्टाईनमधील संघर्ष आणि प्रगत देशांनी ठेवलेले चढे व्याजदर यामुळे २०२३ मध्ये असणारा २.७ टक्के हा जागतिक विकास दर २०२४ मध्ये २.४ टक्क्यांवर घसरण्याचा अंदाज आहे. २०२५ मध्ये देखील २.७ टक्के एवढाच जागतिक विकास दर राहील असे संयुक्त राष्ट्राचा अहवाल सांगतो. जागतिक स्तरावर मंदीचे वातावरण असताना भारतात मात्र उत्साहाचे वातावरण आहे. देशात मोठ्या प्रमाणामध्ये थेट परदेशी गुंतवणूक येत आहे. अयोध्येतील राम मंदिरामुळे अयोध्येसह देशभरातील धार्मिक पर्यटन वाढणार आहे. त्यासाठी देशभरात रस्ते, पाणी पुरवठा, आंतरराष्ट्रीय विमानतळे आणि पंचतारांकित हॉटेल्स अशा पायाभूत सुविधा उभ्या राहत आहेत. त्यातच आगामी लोकसभा निवडणुकीनंतर पुन्हा एकदा मोदी सरकारच येणार अशी दाट शक्यता निर्माण झाल्यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेत केवळ उत्साह नसून ती मजबूत स्थितीत पोहोचली आहे. - हेमंत देसाई**

जागतिक अर्थव्यवस्थेचा वेग संथ असून, जगातील उत्पादन घटले आहे. तसेच गुंतवणूकवाढीचा वेगही मंदावला आहे. अशावेळी भारत हा या संदर्भात एकमेव अपवाद ठरेल, अशी स्थिती आहे संयुक्त राष्ट्रांच्या (युनो) 'जागतिक आर्थिक परिस्थिती आणि भविष्य' हा २०२४ चा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. हा अहवाल वाचून लक्षात येते की, रशिया-युक्रेन युद्ध, पॅलेस्टाईनमधील संघर्ष आणि प्रगत देशांनी ठेवलेले चढे व्याजदर यामुळे २०२३ मध्ये जो सरासरी जागतिक विकासदर २.७% होता तो २०२४ मध्ये २.४ टक्क्यांवर जाईल, असा होरा आहे. २०२५ मध्येदेखील २.७% एवढाच जागतिक एवढा जागतिक विकासदर असेल, असा अंदाज आहे. करोनाच्या अगोदर सरासरी जागतिक विकास दर तीन टक्के होता, हे लक्षात घेतले पाहिजे. म्हणजे जगात मंदी नसली, तरी प्रगतीचा वेग अतिशय सुमार आहे. परंतु त्या तुलनेत दक्षिण आशियाई देशांमधील चित्र आशादायक असेल. गेल्या वर्षी दक्षिण आशिई देशांचाचा सरासरी प्रगतीचा वेग ५.३% होता आणि २०२४ मध्ये तो ५.२% असेल. दक्षिण आशियातील एक प्रमुख देश म्हणजे भारत आणि आपल्या देशात पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणुकीमुळे एकूण उत्पादनास चालना मिळालेली आहे. या वर्षात भारताचा विकासदर ६.२% असेल, अशी अपेक्षा आहे. २०२३ मध्ये तो ६.३% होता. म्हणजे जवळजवळ गेल्या वर्षीच इतक्याच वेगाने प्रगतीची एक्सप्रेस चालू राहणार आहे.


आता थोडे तपशिलात पाहू. गुंतवणुकीचे मोजमाप घेण्यासाठी ठोकळ स्थावर भांडवल निर्मितीची पातळी बघावी लागते. आता हे कॅपिटल फॉर्मेशन गेल्या वर्षी १.९% नी वाढले. २०२२ मध्ये जगातील भांडवल निर्मितीचा वेग ३.३% होता, तर २०११ ते २०१९ या कालावधीत तो चार टक्के होता. याचा अर्थ, जगभरात भांडवल प्रस्थापनेचा वेग कमालीचा घटला आहे. करोनाच्या अगोदरपासूनच जगामधील गुंतवणुकीचा वेग घसरणीला लागला होता. चीनच्या आर्थिक प्रगतीचा वेग किती उतरणीस लागला आहे, हे आपल्याला माहिती आहेच. चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांनीसुद्धा नुकतीच याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. उलट भारतात गुजरात, महाराष्ट्र, हरियाणा, तामिळनाडू, ओडिशा, उत्तर प्रदेश अशा राज्यांत मोठ्या प्रमाणावर परदेशी भांडवल येत आहे. अयोध्या आंतरराष्ट्रीय नकाशावर तेजाने तळपू लागली असून, तिचा पर्यटनविकास केला जात आहे. त्यामुळे भविष्यकाळात उत्तर प्रदेशात लाखोंच्या संख्येत जागतिक पर्यटक येतील. एवढेच नव्हे, तर परदेशस्थ भारतीयसुद्धा येतील, असे दिसते. त्यासाठी तेथे रस्ते, पाणीपुरवठा, आंतरराष्ट्रीय विमानतळ, पंचतारांकित हॉटेल्स अशा सर्व व्यवस्था उभ्या केल्या जात आहेत.

भारतात राजकीय स्थैर्य आहे. केंद्र सरकारला पूर्ण बहुमत आहे आणि आगामी लोकसभा निवडणुकांनंतर पुन्हा एकदा मोदी सरकार येईल, अशीच चिन्हे आहेत. ज्या ठिकाणी स्थैर्य असते, तेथे भांडवल येते. २०२२ मध्ये भारतात येणाऱ्या थेट परदेशी गुंतवणुकीत दहा टक्के वाढ झाली. जगात ग्रीनफिल्ड प्रोजेक्ट आकर्षित करण्यात जे तीन देश आघाडीवर आहेत, त्यात भारताचा समावेश आहे. शिवाय रस्ते, रेल्वे, नवीकरणीय ऊर्जा या क्षेत्रांत सरकार तुफान खर्च करत आहे. जगामधील प्रगत देशांत औद्योगिक उत्पादन कमजोर पडले असताना, भारतात मात्र कारखान्यांचा विस्तार होत आहे आणि त्यांचे उत्पादनही वाढत आहे. आर्थिक चलनवलनाचा असा एक निर्देशांक, म्हणजे मॅन्युफॅक्चरिंग पर्चेसिंग मॅनेजर इंडेक्स. जगात सर्वत्र हा निर्देशांक आकुंचन

पावत असताना, भारतात मात्र तो वाढत आहे. ऑगस्ट २०२३ मध्ये अर्थव्यवस्थेतील कामगारांच्या सहभागाचे प्रमाण आणखी वाढले. सप्टेंबरात भारतातील बेरोजगारीचा दर सगळ्यात कमी म्हणजे ७.१% होता. ग्रामीण भागातील बेरोजगारीचा दरही घसरत आहे.

मात्र संयुक्त राष्ट्रांच्या अहवालात भारतातील भाववाढीबद्दल चिंता प्रकट करण्यात आली आहे. २०२४ मध्ये महागाईचे प्रमाण ४.५% असेल. परंतु ते रिझर्व बँकेच्या किमान लक्ष्यापेक्षा अर्ध्या टक्क्याने जास्त आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. अर्थात गेल्या वर्षी महागाईचे प्रमाण ५.६% होते. जगात वस्तूंचे भाव वाढत असून, हवामान बदलामुळे अन्नधान्याच्या उत्पादन व किमतीवर विपरित परिणाम होत आहे. अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ यामुळे शेतीचे नुकसान होत आहे. येत्या काही महिन्यांत भाववाढीचे संकट कोसळू शकते, असा इशाराही युनोने दिला आहे. भारतात कच्च्या तेलाची मोठ्या प्रमाणात आयात केली जाते आणि युद्धजन्य परिस्थितीमुळे तेलाचे भाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. शिवाय अल निनोचे संकट पुन्हा उद्भवल्यास पंचाईत होऊ शकते, असा इशाराही युनोकडून देण्यात आला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांना अर्थसंकल्प तयार करताना, हवामान बदल, कमोडिटीजमधील जागतिक परिस्थिती विचारात घेऊन आखणी करावी लागेल. इतर देशांपेक्षा भारताची परिस्थिती बरी असली, तरी आत्मसुखाच्या कैफात राहणे योग्य ठरणार नाही.

*(या लेखाचे लेखक प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ व ज्येष्ठ पत्रकार आहेत. त्यांचा ई-मेल hemant.desai001@gmail.com आहे.)*



# शी र्षा स न



- पुढे पुढे करून जगणारी स्वाभिमानशून्य माणसं स्वाभिमानाचा कधीच विचार करीत नाहीत; कारण त्यांना माहीत असते की, जर त्यांचा स्वाभिमान जागृत झाला तर त्यांचे अस्तित्वच मृतवत होईल.
- कामसू कर्मचारी काम करतातच पण दाखविण्याचा प्रयत्न करीत नाहीत. याउलट कामचुकार आपले अस्तित्व टिकविण्यासाठी न केलेल्या कामाचा उदो उदो करतात.
- उगाच वेळ दवडणे म्हणजे हप्त्याहप्त्याने केलेली आत्महत्याच असते.
- पैशासाठी तगादा लावणाऱ्या धनकोपासून काही काळ सुटका मिळण्यासाठी ऋणकोने स्वतः स्वतःच्या पी.ए.ची भूमिका निभवावी.
- उद्योग तोट्यात असण्याची कारणे देताना दोन हुकमी बहाणे. खेळत्या भांडवलाची कमतरता आणि दुसरे मालाला उठाव नाही.
- उद्योग/व्यवसायामध्ये पत्नीचा हस्तक्षेप जाणीवपूर्वक टाळण्यामागे पत्नीच्या २४ तासांच्या सुरक्षा व्यवस्थेतून सुटका मिळण्याची इच्छा असते.
- मानसिक शांततेसाठी दोन आघाड्यांवर नेहमी काळजी घ्या. कार्यालयात साहेबाशी तर घरी पत्नीशी वादविवाद टाळा.
- काटकसर करण्याचा सल्ला एकाला दिला तर दुसरा ऐकतो पण तिसराच अमलात आणतो.
- मालकाने केलेली चूक हा एक प्रयोग असतो तर कर्मचाऱ्याने केलेली चूक ही घोडचूक असते.
- कार्यालयात वाहणाऱ्या वाऱ्याचे होकायंत्र साहेबाचा पी.ए. असतो.
- उद्योग चांगला सुरू असेल तर याचा जास्त गाजावाजा करू नका अन्यथा ऋणको, धनको भेटीला येतील तर मित्रांची आणि हितचिंतकांच्या संख्येत वाढ होईल.
- फार आर्थिक चणचण सुरू आहे याची इतरांना ओळख करून देण्याचे काही प्रभावी मार्ग - गाडी असूनही पायी फिरणे, पैसे असूनही बिल न भरणे, किराणावाला, पेपरवाला यांची बिले त्यांनी प्रचंड फॉलोअप केल्यानंतरच देणे.
- सामान्य, असामान्यांची तुमची आमची व्याख्या जो माणूस असामान्य काम करतो तो सामान्य तर जो माणूस सामान्य काम करतो तो असामान्य.



शेतकरी उत्पादक कंपन्यातून ग्रामीण भागात उद्योजकतेची संधी

# खेड्याकडे चला! पण कसे?

**राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी 'खेड्याकडे चला' हा संदेश दिला. मात्र, आज याच्या विपरित घडत आहे. खेड्यात हाताला काम नसल्याने एक मोठा वर्ग शहराकडे स्थलांतरित होत आहे. त्यांना गावातच चांगले उत्पन्न देणारे काम मिळाले तर निश्चितच स्थलांतर थांबू शकेल. त्यादृष्टीने शेतकरी उत्पादक कंपन्या ग्रामीण भागासाठी संजीवनी ठरत आहेत. दुष्काळी सिन्नर तालुक्यातील युवा मित्र संस्थेने शेतकऱ्यांना एकत्रित करून ८ शेतकरी उत्पादक कंपन्या सुरू केल्या. या माध्यमातून गावातील तरुण, गरीब, विधवा, परित्यक्त्यांना गवातल्या गावातच काम मिळू लागले आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी शेतकऱ्यांना पारंपरिक शेतीतून बाहेर काढणे आणि उद्योगधंद्यात समाविष्ट करणे हा उपाय ठरू शकतो.**

**- डॉ. भगवान हणमंत मोहिते**

'खेड्याकडे चला' हा महात्मा गांधीजींनी दिलेला मूलमंत्र आजही तितकाच योग्य व कालसंगत आहे; परंतु प्रत्यक्षात मात्र दररोज लोकांचे लोंढेच्या लोंढे शहराकडे वाहताना दिसतात. गांधीजीचा हा मूलमंत्र आम्ही वैचारिकदृष्ट्या किती प्रगल्भ आहोत, हे दाखविणाऱ्यांनी अगदी गुळगुळीत करून टाकला आहे; कारण या मूलमंत्राचा भाषणात, लेखनात वापर करणारे जवळजवळ सर्व तथाकथित शहरातच राहतात.

आज गावातून शहरात जाण्यासाठी ग्रामीण जनतेत चढाओढ लागली आहे. त्यामागील कारण हे शहरात जाऊन मौज-मजा करणे हे नसते, तर पोटाची खळगी भरण्यासाठी चाललेली ती धडपड असते. खेड्यामध्ये जगणे दिवसेंदिवस असह्य होत चालले आहे. मूलभूत, पायाभूत सुविधांची वानवा, सततचा दुष्काळ, त्याचबरोबर नापिकी आणि शेतमालाचे ढासळलेले भाव ही या स्थलांतराची काही कारणे आहेत; परंतु त्यापेक्षाही महत्त्वाचे कारण म्हणजे रोजगाराच्या संधींकडे बघण्याचा लोकांचा चुकीचा दृष्टिकोन. व्यवसायाच्या किवा रोजगाराच्या संधी फक्त शहरातच असतात, ग्रामीण भागात त्या मिळूच शकत नाहीत, तसेच शहरात राहणाऱ्या, सुटाबुटात फिरणाऱ्या आणि खेड्यात येऊन स्वतःला साहेब म्हणून घेणाऱ्या माणसांनाच समाजात मानसन्मान मिळतो, त्यांना हुशार समजले जाते आणि खेड्यात राहिल्यास तसे काही होत नाही असा पारंपरिक जोपासलेला दृष्टिकोन याला कारणीभूत आहे, असे मला वाटतं. खरे तर घर आणि गाव सोडून कामासाठी शहरात गेलेली तरुणाई किती वेळा आपल्या गावाकडे आणि मागे सोडून आलेल्या परिवाराकडे माघारी फिरून येते. अर्थात तो आणखी एक वेगळा सामाजिक प्रश्न आहे. त्याबद्दल आपण न बोललेलंच बरे. खेड्यातून माणसे शहतात गेल्यावर फक्त खेडीच ओसाड पडत नाहीत, तर शहरांचे स्वास्थ्यसुद्धा गर्दी, प्रदूषण आणि गोंगाटाने तणावपूर्ण होते.

आपण थोड्या उघड्या डोळ्याने आपल्या गावाकडे, इथे असलेल्या नैसर्गिक संसाधनांकडे बघितले तर आपल्या लक्षात येईल की, ग्रामीण भागात सुद्धा उद्योगाच्या, व्यवसायाच्या, स्वयंरोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत; पण, आपण कधी त्यांच्यांकडे संधी म्हणून बघितलेलेच नाही. ज्या संधी आपण खरोखर हेरल्या, तर वैयक्तिक विकासाबरोबर संपूर्ण गावाचा व गावाबरोबर परिसराचा विकास करण्याची ताकद आपण निर्माण करू शकू. तसेच शहरांवर पडणारा लोकांचा ताण कमी करून वाढत्या झोपडपट्ट्यांना आळा घालता येईल व शाश्वत विकासाचे स्वप्न साकार करता येईल.या सर्व गोष्टींचा विचार करून आम्ही युवा मित्र संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण उपजीविकेच्या नैसर्गिक संसाधनांचा अभ्यास करून त्यावर आधारित उपजीविका विकासाचे विविध प्रयोग सुरू केले. या प्रयोगातून ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासाच्या अनेक संधी समोर आल्या.त्यातील काही उदाहरणे आपल्याला बघायची झालीत, तर सिन्नर हा दुष्काळी तालुका म्हणून परिचित आहे. या तालुक्याचा अभ्यास करून युवा मित्रच्या वतीने शेतकऱ्यांना एकत्र करून आठ शेतकरी उत्पादक कंपन्यांची स्थापन केल्या. शाश्वत विकासाची प्रक्रिया सुरू झाली. या उत्पादक कंपन्यांच्या स्थापनेच्या माध्यमातून अनेक मोठ्या व्यवसाय संधींची जाणीव झाली. उत्पादक आणि ग्रामीण युवक यांच्यासाठी गावातच राहून रोजगार मिळेल व ते आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील, अशी खात्री संस्थेबरोबर ग्रामस्थांनाही झाली.

सिन्नर तालुक्याची जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देवनदी परिसरात देवनदी व्हॅली शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना करून

कंपनीमध्ये जाऊन मोलमजुरी कराणाऱ्या ग्रामीण हातांना शेती विकास, पीकपद्धती बदल, ॲग्री मॉलच्या माध्यमातून आर्थिक विकासाची नवीन संधी निर्माण करून दिली आहे. देवनदी कंपनीच्या माध्यमातून सभासद शेतकऱ्यांचा दररोज चार टन भाजीपाला विकला जातो. त्यासाठी स्वतंत्र सप्लाय चेन सुरू करण्यात आलेली आहे.

सिन्नर तालुक्यात कमी पावसावर येणारे व मोठे उत्पन्न देणारे पीक म्हणून डाळिंब पिकाची मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांनी लागवड केली. तालुक्यातील १२९ गावांपैकी १२० गावांमध्ये १२,६०० एकरावर लागवड झाली आहे. दर एकरी किमान आठ टन उत्पादन धरले, तर एक लाख टन डाळिंबाचे उत्पादन होते. डाळिंबाचा किमान भाव ५० रुपये किलो प्रमाणे तरी ५०० कोटी रुपयांचा हा व्यवसाय आहे. डाळिंब उत्पादनासाठी एकारी ५० हजार रुपये खते व औषधांसाठी गेले तरी ६३ कोटींचा नफा या व्यवसायातून मिळू शकतो. डाळिंबापासून अनेक प्रकारचे खाद्यपदार्थ, पेय, सौंदर्य प्रसाधने तयार होतात. त्यामुळे डाळिंबावर प्रक्रिया करणारे अनेक उद्योग गावात सुरू होऊ शकतात. असे झाले तर अनेक बेरोजगार हातांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात. त्यासाठी या सर्व शेतकऱ्यांना एकत्रित करून भोजपूर खोरे डाळिंब उत्पादक कंपनी व इतर तीन शेतकरी उत्पादक कंपन्या सुरू केल्या आहेत. इगतपुरी तालुक्यातील कळसुबाई परिसरात उच्चप्रतीचा इंद्रायनी तांदूळ तयार होतो; परंतु आदिवासी शेतकऱ्यांच्या हाती काहीच लागत म्हणून तेथे शेतकऱ्यांची समृद्ध किसान शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करून स्वतःचा ब्रँड विकसित करण्याचे स्वप्न पाहिले आहे. त्यासाठी राईस मिल उभारण्याची प्रक्रिया चालू आहे. सिन्नर तालुक्यात कुक्कुटपालन व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू झाला; परंतु करार शेती कारणाऱ्या कंपन्या मोठ्या झाल्या व व्यवसाय करणारे शेतकरी अधिक गरीब झाले. आज तालुक्यात २००० पोल्ट्री फार्म आहेत. त्यापैकी फक्त १२०० चालू स्थितीत आहेत. त्यांची वार्षिक उलाढाल २०० कोटींपर्यंत आहे. त्यासाठी फीड मिल, हॅचरिज, किरकोळ विक्री व्यवस्था यासाठीच्या अनेक रोजगार संधी आहेत. यासाठी सिन्नर तालुका पोल्ट्रीफार्म प्रोड्यूसर्स कंपनी सुरू करण्यात आलेली आहे. त्याद्वारे पोल्ट्री उत्पादकांना सर्व प्रकारची मदत केली जाते.

तालुक्यात गरीब, दलित, विधवा व परित्यक्ता महिलांना एकत्र करून त्यांची सावित्रीबाई फुले महिला शेळी उत्पादक कंपनी स्थापन करून त्याद्वारे उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी तालुक्याचाच विचार केला तर हा व्यवसाय वार्षिक १०० ते १२० कोटींचा आहे. वरील तीन चार उदाहरणे बघितली तरी एकाच तालुक्यात फक्त शेतीवर आधारित हजारो कोटींचा व्यवसाय होऊ शकतो. गावात जे जे पिकू शकते ते पिकवून त्याची गुणावत्ता वाढीसाठी प्रक्रिया उद्योग, प्रांतावर उद्योग सुरू केले तर शेतकरी, भूमिहीन या सर्व लोकांना समान पातळीवर विकासाची संधी मिळेल. आपल्याला यासारख्या संस्था सांभाळण्यासाठी व उद्योग व्यवसाय पुढे घेऊन जाण्यासाठीचे तांत्रिक मनुष्यबळ गावातच तयार करावे लागेल; परंतु या व्यवसाय संधी पुढे घेऊन जाण्यासाठीचे व्यावसायिक कौशल्य असलेल्या व्यक्ती शहराकडे लक्ष लावून बसल्या आहेत.

येत्या २०२२ सालापर्यंत भारतीय शेतकऱ्यांचे उत्पन्न/प्राप्ती दुप्पट केले जाईल असा प्रस्ताव यंदाच्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये केंद्रीय अर्थमंत्र्यांनी दिला आहे. अनेक अर्थतज्ज्ञ, विचारवंत यांनी त्याबद्दल शंका उपस्थित केल्या. भारतीय शेतीची गेल्या काही वर्षांतील एकूण कामगिरी पहाता हे स्वाभाविक असले, तरी प्राप्त परिस्थितीमध्येच शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट कसे होऊ शकते ते पाहायला हरकत नाही.

सध्या २०१६-१७ हे आर्थिक वर्ष चालू आहे; परंतु शेतकऱ्यांचे उत्पन्न मोजण्यासाठी 'शेतीवर्ष' विचारात घेणे योग्य होईल. त्याप्रमाणे, ०१ जून २०१६ ते ३१ मे २०२२ ही सहा वर्षे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी उपलब्ध आहेत. उत्पन्न दुप्पट करण्याचा विचार करताना 'वास्तव उत्पन्न' हेच विचारात घेतले पाहिजे. अर्थमंत्र्यांनी 'शेतकऱ्यांचे उत्पन्न' असे म्हटले आहे. आपल्या देशात शेतकरी समाज एकजिनसी नाही. त्यामध्ये लहान, मोठे, बडे, अन्नधान्ये पिकविणारे, नगदी पिके घेणारे, उसवाले, भूसवाले असे सर्व प्रकारचे शेतकरी येतात. कोणत्या शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करायचे? अभ्यासासाठी असे समजू की शेतकऱ्यांचे उत्पन्न म्हणजे समस्त शेती क्षेत्राचे उत्पन्न होय. याचा अर्थ शेतीक्षेत्राचे उत्पादन यापुढे दरवर्षी चक्रवाढ पद्धतीने निदान १२ टक्के किंवा साडेदहा टक्के वाढले पाहिजे.

शेतीक्षेत्राचे उत्पन्न/उत्पादन २०२२पर्यंत दुप्पट करण्यासाठी, तांत्रिक






*उद्योग संचालनाच्या अधिकाऱ्यांसाठी कम्बाईन प्रोबेशनरी ट्रेनिंग प्रोग्राम सीपीटीपी-९ या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन माजी अतिरिक्त उद्योग संचालक मा. श्री.बी.एस.जोशी; उद्योग सहसंचालक तथा कार्यकारी संचालक एमसीईडी, छत्रपती संभाजीनगरचे श्री.बी.टी.यशवंते यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी डावीकडून श्री.संतोष बोर्डे, व्यवस्थापकीय संपादक, उद्योजक मासिक; श्री.डी.यु.थावरे, आस्थापना विभाग प्रमुख तथा विभागीय अधिकारी, एमसीईडी, छत्रपती संभाजीनगर; डॉ.अभीराम डबीर, मालमत्ता विभाग प्रमुख; श्रीमती भारती सोसे, कनिष्ठ प्रकल्प अधिकारी एमसीईडी, छत्रपती संभाजीनगर व उपस्थित प्रशिक्षणार्थी दिसत आहेत.*

आणि संस्थात्मक अशा दोन्ही पातळ्यांवर झटून प्रयत्न करावे लागतील. तांत्रिक पातळीवर, शेतकऱ्यांना महत्त्वाच्या 'निविष्टी' (Inputs) पुरविण्याचा विचार करता येईल, तर संस्थात्मक पातळीवर शेतीक्षेत्रासंबंधीचे सरकारी नियम बदलण्याचा विचार करता येईल. सिंचनाची सध्या दुरवस्था आहे. यातून मार्ग कढून सिंचन वाढविता येईल. इतर काही राज्यांनी हे करून दाखविले आहे. उदा. मध्य प्रदेशने 'मनरेगा'चा पैसा वापरून आणि इतर लहान लहान मार्गांनी सरकारी कालव्यातील गाळ काढणे, रुंदीकरण करणे इ. कामे मोठ्या प्रमाणावर सुरू केली. प्रचंड पैसा खर्च मुळीच केला नाही. जवळ जवळ ४०० छोट्या सिंचन प्रकल्पांचे पुनर्वसन करून सिंचनसोयी प्रत्येक शेतकऱ्याला मिळण्याची यशस्वी व्यवस्था केली. २००१ ते २०१३ या काळात सिंचनाखालील जमीन साधारण ४० लाख हेक्टरवरून ८५ लाख हेक्टरपर्यंत वाढली. याच काळात गुजरातमध्ये सुद्धा सिंचन २८ लाख हे. वरून ४२ लाख हे. पर्यंत वाढले. मध्य प्रदेशने शेतीचा विकासदर २० टक्क्यांपेक्षा जास्त केला. महाराष्ट्रातसुद्धा असे करता येईल.

आपल्या देशामध्ये, १९६५च्या हरितक्रांतीची पूर्णपणे दमछाक झाली आहे. दुसरी हरित क्रांती होणे आवश्यक आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर संशोधन होणे आवश्यक आहे. आपण संशोधनावर जेमतेम राष्ट्रीय उत्पन्नाच्या जेमतेम एक टक्का खर्च करतो. चीन सहा टक्के करतो; परंतु त्याची फळे ताबडतोब मिळत नाहीत. किती वर्षे लागतील सांगता येत नाही. यासाठी ज्या बियाण्यांचे संशोधन जवळजवळ पूर्ण आहे मात्र उपयोग करण्यास सरकारी परवानगी नाही अशा बीटी कापूस, वांगी, मोहरी आणि इतर बीटी बियाण्यांच्या वापरासंबंधी त्वरित निर्णय घेणे आवश्यक वाटते. सुधारित बियाणे, खतांचे योग्य मिश्रण आणि पुरेसे पाणी हे शेतीतील यशाची त्रिसूत्री आहे.

शेतीचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी सिंचन आणि उत्पादनतंत्र याबरोबरच शेतीसंबंधीचे सरकारी धोरण, नियम इ. मध्ये कालानुरूप योग्य ते बदल करणे आवश्यक आहे. १९९१पासून सुरू केलेल्या आर्थिक उदात्तीकरणाचे धोरण शेतीक्षेत्रास पूर्णपणे लागू झालेले नाही. शेतीसंबंधीची बाजार यंत्रणा अजूनही खूपशी बंदिस्त आहे. मुक्त, मोकळी नाही. शेतीच्या उत्पादनामध्ये 'जमीन' हा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. जमिनीसंबंधीची धोरणे अजून बहुशः जुनीच आहेत. कसेल त्याची जमीन, देण्या-घेण्यावर बंदी, कमाल जमीन धारणा कायदा, शेतकरी नसलेल्या व्यक्तीस शेतजमीन विकत घेण्यासंबंधी अटी इ. या धोरणाची वैशिष्ट्ये आहेत. या धोरणामुळे मोठ्या प्रमाणात सामाजिक न्याय मिळाला असेल, परंतु शेतीक्षेत्राचा आर्थिक विकास मात्र खुंटला; कारण शेतकऱ्याला आपला शेती व्यवसाय वाढविणे दुरापास्त झाले. जमिनीचे क्षेत्र वाढविणे अवघड झाले.बिगरशेती क्षेत्रातील भांडवल शेतीमध्ये येणे बंद झाले. सरकारी भांडवल/ गुंतवणूक अपुरी पडू लागली. अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी निरीक्षण केले आहे की, 'या धोरणामुळे भारतीय शेतकऱ्यास शेतकरी या`नात्याने स्वतःचा विकास करण्याची संधी नाकारली गेली. परिणामी शेती व शेतकरी दोघेही खुरटले.' हे धोरण बदलण्याचा, जमिनीचा बाजार खुला करण्याची वेळ आली आहे. असे झाल्यास शेतीमधील गुंतवणूक वाढू शकेल.

शेतीक्षेत्राची कार्यक्षमता, उत्पादकता वाढवून त्या क्षेत्रातील दारिद्र्य नष्ट करण्यासाठी शेतीवर पडत असलेला लोकसंख्येचा भार कमी करणे, तेथील भाऊगर्दी कमी करणे आणि ते होण्यासाठी लहान/मोठ्या उद्योगधंद्याची वाढ होऊन तेथे रोजगार देणे या गोष्टीही अत्यंत आवश्यक आहेत. हाच दूरगामी उपाय आहे. काळाच्या ओघात लहान शेतांची संख्या भरमसाठ वाढल्यामुळे तेथील शेती आतबट्ट्याची झाली आहे. त्या शेतकऱ्यांना शेतीतून बाहेर काढून उद्योगधंद्यात सामावणे हाच उपाय आहे.

*(या लेखाचे लेखक पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठे महांकाळ, सांगली येथे सहा. प्रा. वाणिज्य विभाग म्हणून कार्यरत आहेत. त्यांचा ९८२२६८४५५३ भ्रमणध्वनी आहे.)*



*उद्योजक मासिकाच्या माहे जानेवारी २०२४ विशेषांकाचे विमोचन मा.श्री.बी.टी.यशवंते, कार्यकारी संचालक, एमसीईडी तथा उद्योग सहसंचालक, छत्रपती संभाजीनगर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी एमसीईडी, एमआयडीसी व उद्योग विभागाचे अधिकारी उपस्थित होते.*



## संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादितचा उपक्रम

# २५ हजार युवक-युवतींना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण

**चर्मकार समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक सुविधा मिळणे आवश्यक आहे. याच हेतूने महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचा (लिडकॉम) स्थापनेला ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. लिडकॉम आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी) यांच्यात चर्मकार समाजातील युवक-युवती आणि महिलांना उद्योजकता विकास आणि स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण देण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. याअंतर्गत पुढील ३ वर्षे २५ हजार युवक-युवतींना स्वयंरोजगाराची संधी मिळणार आहे, याविषयी.**

**- प्रतिनिधी**



मा. सुमंत भांगे, भा.प्र.से
सचिव सामाजिक न्याय विभाग

महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळाची स्थापना १ मे १९७४ रोजी कंपनी अधिनियम १९५६ अनुसार करण्यात आली. अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील (चांभार, ढोर, होलार व मोची इत्यादी) आर्थिकदृष्ट्या दुर्बल व दारिद्र्यरेषेखालील जीवन जगणाऱ्या व्यक्तींना त्यांचे जीवनमान उंचविणे, समाज प्रवाहात त्यांना मानाचे स्थान मिळण्याच्या उद्देशाने त्यांचा शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकास होण्यासाठी महामंडळामार्फत विविध योजना राबविण्यात येतात. संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ (लिडकॉम) च्या स्थापनेला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच भाग म्हणून संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ (लिडकॉम), मुंबई आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्यात चर्मकार प्रवर्गातील युवक-युवतींना आणि महिलांना दर्जेदार उद्योजकता विकास आणि स्वयंरोजगार प्रशिक्षण देण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे ३ वर्षांत २५ हजार चर्मकारांना प्रशिक्षण मिळेल. या करारावर लिडकॉमचे व्यवस्थापकीय संचालक श्री. धम्मज्योती गजभिये आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे केंद्र प्रमुख तथा राज्य समन्वयक श्री. हेमंत वाघमारे यांनी स्वाक्षरी केली.

या प्रशिक्षणात चर्मकार उद्योगातील व्यवसाय योजना, वित्त व्यवस्थापन, उत्पादन प्रक्रिया, विपणन आणि ग्राहक सेवा यासह विविध विषयांचा समावेश असेल. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षितांना महामंडळाच्या योजना आणि इतर सरकारी योजनांचा लाभ घेता येईल.



मा. धम्मज्योती गजभिये, (IPoS)
व्यवस्थापकीय संचालक

या करारामुळे चर्मकार प्रवर्गातील सुशिक्षीत बेरोजगार युवक-युवतींना आणि महिलांना उद्योजक बनण्याची संधी मिळेल. या कराराच्या वेळी लिडकॉमचे व्यवस्थापकीय संचालक श्री. धम्मज्ज्योती गजभिये यांनी माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, आणि सामाजिक न्याय विभागाचे सचिव यांचे आभार व्यक्त केले.

चर्मकार प्रवर्गातील युवक-युवतींनी आणि महिलांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी अधिकाधिक सहभाग घ्यावा, असे आवाहन श्री. गजभिये यांनी केले आहे.

या कराराच्या वेळी लिडकॉमचे व्यवस्थापक श्रीमती स्नेहलता नरवाने, सहव्यवस्थापक श्री एन.एम. पवार, कंपनी सेक्रेटरी श्री प्रदीप रथ, आणि प्रशासकीय अधिकारी सौ. संगीता पराते उपस्थित होते. एमसीईडी मार्फत कार्यालयीन सहायक श्री युवराज इंगोले उपस्थित होते. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अधिक माहितीसाठी 'उद्योजक' मासिकातील मुखपृष्ठ क्रमांक ३ वरील जाहिरातीतील पत्त्यांवर संपर्क साधावा. ■■



### एमसीईडीच्या ‘उद्योजक’ मासिकासह बाजारात अनेक पुस्तके उपलब्ध

# उद्योजक व्हायचे, मग पुस्तके वाचाच!

**पुस्तक हे माणसाचे खरे मित्र असतात, असे नेहमी बोलले जाते आणि ते खरेही आहे. पुस्तक वाचताना व्यक्ती त्यात तल्लीन होऊन जाते. मनापासून वाचन करते. उद्योजकतेकडे वाटचाल करण्यासाठी पुस्तकांचे वाचन महत्त्वाचे ठरू शकते. त्यादृष्टीने महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र म्हणजेच एमसीईडीतर्फे दर महिन्याला प्रकाशित होणारे ‘उद्योजक’ मासिक महत्त्वाचे ठरत आहे. याच्या सोबतीला उद्योजकतेला प्रोत्साहन देणारी, उद्योजकांच्या संघर्ष कथा सांगणारी अनेक पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत. याच्या वाचनातून उद्योजकतेकडे बघण्याच्या कक्षा रुंदावतात. सृजनशीलता, सहअनुभूती, सादरीकरण आणि संवाद कुशलतेसाठी कौशल्य आत्मसात करता येतात.**

**- जीवन मुळे**

एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला जन्मलेली पिढी आता तिच्या वयाच्या २४ व्या वर्षात पदार्पण करत असेल. या कुशल, उत्साही, सर्जनशील मुलांना नोकरीच्या चौकटीत स्वतःला बंदिस्त करावयाचे नाही. स्वातंत्र्याचा आनंद अनुभवत, स्वतंत्र वृत्तीने स्वतःचा उद्योग-व्यवसाय सुरू करायचा आहे. मात्र त्यासाठी त्यांना सुरुवातीला एखादा प्रेरक, अनुभवी आणि मनापासून मदत करणारा विश्वासू मित्र हवा असतो. थोडक्यात ‘फ्रेंड-फिलॉसॉफर-गाईड’ हवा असतो. असा विश्वासू मित्र त्यांना पुस्तकरूपात सापडू शकतो.

अनेक यशस्वी, अनुभवी लेखकांनी नव्या पिढीला प्रेरक, मार्गदर्शक ठरतील अशी छान-छान पुस्तके सोप्या भाषेत प्रसिद्ध केली आहेत. उद्योजकीय मानसिकता घडवण्यासाठी, उद्योजकता अंगी बानवण्यासाठी तथा स्वयंनिर्भरतेच्या वाटेवर चालण्यासाठी, या पुस्तकीय ‘गुरुमंत्राचा’ तरुणाईला उपयोग होऊ शकतो. या नंतर अपेक्षित आणि आवश्यक कौशल्य, ज्ञान, प्रशिक्षण आणि दृष्टिकोन संबंधित तज्ज्ञामार्फत आत्मसात करून होतकरू तरुणाई पुढचं पाऊल टाकण्यास सज्ज होऊ शकते. यानंतरच्या उद्योजकतेच्या पुढच्या प्रत्येक पावलावर त्यांना इतर आवश्यक बाबी, संसाधनाबरोबरच, संधी शोधण्यासाठी पुस्तकांचीही मदत होऊ शकते. हा अनेक यशस्वी उद्योजकांचा अनुभव आहे. ते जीवनभर पुस्तकांचे मित्र, चाहते असतात. दिवसातले किमान दोन तास ते पुस्तक वाचनासाठी राखीव ठेवतात. तुम्ही निवडलेल्या उद्योग-व्यवसायासंबंधीच्या ‘बिझिनेस लिटरेचर’चे नियमित वाचन तुमचं ज्ञान अद्ययावत होण्यास मदत करते.

उद्योजकता विकास क्षेत्रात ३५ वर्षांपासून कार्यरत ‘महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र’तर्फे प्रकाशित ‘उद्योजक’ मासिक, होतकरू आणि नवउद्योजकांसाठी उपयुक्त असं उद्योजकतेच्या क्षेत्रातील माहिती/ज्ञान नियमितपणे प्रकाशित करत असते. त्याचाही लाभ नव्या पिढीने घेतला पाहिजे. उद्योजकीय मन घडविणारा हा तत्वज्ञ मित्र तुमची उद्योगशील, प्रगतीशील वाटचाल अधिक सुलभ व गतिमान करण्यास तत्पर आणि उत्सुक आहे. या केंद्रातर्फे नव उद्योजकांसाठी उद्योजकता विकासाला पोषक असे विविध उपक्रम आणि प्रशिक्षण आयोजित करण्यात येतात.

सुप्रसिद्ध उद्योजक डॉ. विठ्ठल कामत म्हणतात, ‘संधी शोधण्यासाठी वाचन उपयुक्त ठरते. वाचनाची आवड मला स्वस्थ बसू देत नाही. यासाठी मी परकीय भाषाही शिकलो’.

### उद्योजकीय विकास आणि वाचन चळवळ

वाचनसंस्कृती तुमच्या व्यक्तिमत्व विकासाला पोषक असतेच, त्याचबरोबर ती तुमच्या व्यावसायिक विकासालाही पोषक असते. उद्योजक असो वा नोकरदार, प्रत्येकाने वाचन चळवळीचा लाभ घेऊन आपला सर्वांगीन विकास करण्यासाठी प्रयत्न केले, तरच तो आपल्या वैयक्तिक, कौटुंबिक आणि व्यावसायिक जीवनाच्या तीनही आघाड्यांवर यशस्वी होऊ शकतो. अन्यथा त्याचा विकास एकांगी होण्याचा धोका असतो. एक पालक म्हणूनही तुमच्या मुलांच्या वाचन विकासात तुमचे सक्रीय योगदान आवश्यक असते. हे महत्त्व अधोरेखित करण्याचे कारण आहे, सध्या आयोजित होत असलेले

वाचन चळवळीला पोषक विविध उपक्रम. या उपक्रमांचा लाभ घेणारात नोकरदार, व्यावसायिक इत्यादींची संख्या इतर घटकांच्या तुलनेत फारच कमी असल्याचे आढळते. खरं तर तुमच्या करियर विकासात 'अर्न' Earn किंवा अर्निंग पैसे मिळवणे इतकचं महत्त्व 'लर्न Learn करण्याला, नवे ज्ञान मिळवण्याला असते. वाचनामुळे तुम्हाला नवे ज्ञान आणि आनंद ही एकाचवेळी मिळू शकतो. जो तुमच्या दैनंदिन कामाच्या कार्यक्षमता आणि परिणामकारकता वाढीला पोषक असतो.

कोणत्याही अडचणी, समस्या बाबतचा सखोल अथवा चौकटीबाहेरचा (out of box) विचार करण्याची क्षमता चौफेर वाचनामुळे निर्माण होते. व्यावसायिक कामादरम्यानच्या मीटिंगमध्ये आपले विचार, म्हणणे प्रभावीपणे मांडण्यासाठीसुद्धा वाचन उपयुक्त ठरते. बदलत्या काळाबरोबर आपलं ज्ञानही अद्यावत ठेवणे आवश्यक असते. असं म्हणतात की, सध्याच्या युगात दर ६४ दिवसांनंतर नव्या ज्ञानाची भर पडते आहे. प्रत्येक प्रक्रियेप्रमाणे येथेही value ॲडिशन महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

**उद्योजकतापूरक वाचनाचे महत्त्व :**

'माझ्या उद्योजकीय यशस्वीतेचे रहस्य खालील त्रिसूत्रीत आहे -

१. कायम कुतूहल २. भरपूर वाचन ३. भरपूर काम' -(एलॉन मस्क)

जागतिक स्तरावर आपल्या उद्योग निपुणतेचा ठसा उमटवणाऱ्या उद्योजकांची कार्यशैली ही नेहमीच वाचनास अंगीकार करणारी आणि इतरांना वाचनासाठी प्रोत्साहन देणारी राहिलेली आहे. नामवंत जागतिक उद्योजक एलॉन मस्क वाचनासाठी दररोज १० तास देतात. बिल गेट्स आठवड्याला एक नवं पुस्तक वाचतात. आपला टाटा परिवार तर वाचनप्रियतेसाठी सुप्रसिद्ध आहेच. त्यांची स्वतःची अभ्यासिका आहे. सर्व यशस्वी उद्योजकमनापासून वाचन करतात. काही व्यावसायिक स्वतः दुकानात, पुस्तक प्रदर्शनात जाऊन निवडक पुस्तके खरेदी करतात. ही एकप्रकारे उद्योजकीय गुंतवणूक असते.



*मा.ना.श्री.नारायण राणे, केंद्रीय अवजड उद्योगमंत्री यांना उद्योजक मासिक भेट देताना श्री धम्मपाल थोरात, जिल्हा प्रकल्प समन्वयक, एमसीईडी, पालघर दिसत आहे*

जी भरपूर लाभांश देते. आपल्या वाचनाला चिंतनाची जोड देतात. त्यातून त्यांच्या उद्योजकीय समस्यांचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करतात. वाचनातून स्वानंदासह व्यक्तिमत्व विकासाला, गटचर्चेला चालना मिळते. नव्या संकल्पना, आयडिया जन्मास येतात. वाचन छंदातून नव्या उद्योगाचे बीज साकारल्याचे, ग्राहक व्यवस्थापनाचे नवे तंत्र स्वीकारल्याचे अनुभवास येते. दिवसभर भरपूर काम असेल तर रात्री वाचनासाठी वेळ देतात. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे त्यांच्या उद्योजकीय यशाचा आलेख सतत उंचावत राहतो. वाचनासाठी वेळ मिळत नाही, ही सबब यांना मान्य नसते. वाचनातून लेखन कौशल्यालाही पाठबळ आणि चालना मिळते. मीटिंगमध्ये उत्तम सादरीकरण, सभेचे सूत्रसंचालन, इत्यादी प्रक्रिया समर्थपणे हाताळता येतात. असे असंख्य लाभ 'वाचन' या क्रियेचे आहेत. पुस्तक वाचनातून कळत-नकळत 'माणसं वाचनाचं' प्रशिक्षण मिळतं.

उद्योजकता विकासात वाचनाचे स्थान आणि महत्त्व अशा महान यशस्वी उद्योजक/व्यावसायिकांना पटलेले असते. म्हणूनच त्यांच्या उद्योग स्थळी ग्रंथालय कक्ष असतात. या वाचन कक्षात उद्योगाशी संबंधीत नियतकालिकासह, मासिके, साप्ताहिक, दैनिक, इत्यादी असतात. यांचा लाभ सर्वच घेऊन आपल्या ज्ञानात भर टाकण्याचा प्रयत्न करतात. काही उद्योग स्वतःचेही नियतकालिक प्रसिद्ध करतात.

**कार्यसंस्कृतीभिमुख पोषक वाचनाचे फायदे :**

उद्योजकीय संस्कृतीमध्ये ज्ञान, श्रवण, विपणन, लेखन यांच्याइतकेच महत्त्व वाचनाला आहे, हे फार थोडे लोक जाणतात. तुमच्या कार्य कौशल्याला या सगळ्यांची जोड मिळाल्यावरच उद्योग-व्यवसायाला यश मिळते. उत्तम सादरीकरणासाठीही भरपूर वाचन हवे असते. वाचनामुळे उद्योजकतेला होणारे काही महत्त्वाच्या फायद्याचा येथे ओझरता उल्लेख येथे केला आहे.

**अ) सृजनशीलता (Creativity) :** वाचनाचा आणि सृजनशीलतेचा फार जवळचा संबंध आहे. वाचनामुळे नवे विचार, नव्या कल्पना मनात साकार होतात. स्वतःसह इतरांच्या विचारांच्या एकत्रित मंथन प्रक्रियेतून (सिनर्जी) एखादा आगळा-वेगळा, हटके कल्पनाविष्कार होऊ शकतो. त्यातून नवनवीन पद्धती, सुधारित प्रक्रिया, पर्याय समोर येतात. विचारांना कृतीशीलतेची जोड प्राप्त झाली, तर सफलतेचा मार्ग सुकर होतो. या सर्व गोष्टीमुळे उद्योग-व्यवसायाला फायदा होतो. ग्राहकांना अधिक चांगली सेवा, उत्पादनाचा पुरवठा करता येतो. वाचनातून मिळणाऱ्या ऊर्जेमुळे त्यांना सकारात्मक कार्य करण्यास बळ मिळते. एकाग्रता वाढीस लागते.

**आ) सह-अनुभूती (Empathy) :'Reading increases and encourages empathy.'**

सह-अनुभूती आणि सहानुभूती यामधील फरक लक्षात घेतला पाहिजे. सहानुभूती इतरांच्या दुःखाविषयी फक्त ममत्व दाखवते, सह-अनुभूती एखाद्याच्या दुःखांबाबत प्रत्यक्ष स्वतःला दुःखाच्या स्थानी कल्पून त्यात समरस होते. वाचन ही संवेदनशीलता,सहभावना, अनुकंपा

आपल्या मनात खोलवर रुजवते. परिणामी कार्यस्थळी सहकारी, नेता यांच्यामध्ये सुदृढ आंतर-वैयक्तिक संबंध प्रस्थापित होतात.

**इ) सादरीकरण (Presentation) :** कामाच्या ठिकाणी आपले विचार मांडण्यासाठी विषयाचे सुसूत्र सादरीकरण करणे गरजेचे असते. आपले वाचन भक्कम आणि चौफेर असेल तर प्रभावी सादरीकरण करणे शक्य होते. सुसंवाद, वाटाघाटी करतानाही केवळ मौखिक संवादापेक्षा सादरीकरणासह वक्तव्य यशदायी सिद्ध होते.

**ई) स्ट्रेस कमी करणं (Stress reduction) :** काम करताना, अवघड निर्णय घेताना मानसिक आणि शारिरीक ताण येतो. यांचा अतिरेक मानवी देहाला अपायकारक होऊ शकतो. अवांतर किंवा आवडत्या विषयांवरील पुस्तक वाचन हा ताण हलका करण्यास मदत करते. जोडीला नवनवीन गोष्टी समजतात.ताण कमी करण्याचे मार्ग समजतात. पुस्तक हा आपला 'फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाईड' असतो. आपल्याला कोणत्याही वेळी मदतीला हजर असतो. आपलं वैयक्तिक जीवन आणि व्यावसायिक कार्य (वर्क-लाईफ) समतोल साधण्यात पुस्तकांची भूमिका, वाचनामुळे आलेली प्रगल्भता स्ट्रेस कमी करण्यात सहाय्यभूत ठरते.

**उ) संवाद कुशलता (EffectiveCommunication) :** संवाद, वाटाघाटी, वक्तृत्व कलेत पारंगत असणाऱ्या व्यक्तीबाबत असं म्हणतात की,

**यशस्वी माणसं जास्त वाचन करतात,**

**अयशस्वी माणसं जास्त वाचाळपणा करतात.**

अनेकांना भाषण आणि संभाषण यात फरक करता येत नाही; कारण वाचन आणि संवाद कुशलता, दोन्हीही कमकुवत असतात. अभ्यासपूरक आणि अभ्यासेतर विषयांचे वाचन असेल तर परिपूर्ण संदर्भा सह स्पष्टीकरण करणे शक्य होते. थोडक्यात, वाचन हा मौखिक आणि लेखी संवाद प्रभावी करण्याचे सोपे आणि प्रभावी साधन आहे.

### गरज आणि उपयोगिता

सध्याच्या मोबाइल युगात इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांमुळे माणसं पुस्तकांपासून दूर चालली आहेत. या मनोवृत्तीमध्ये बदल होण्याची नितांत गरज आहे. ऑनलाइन पुस्तक वाचनाच्या मर्यादा एव्हाना लोकांच्या लक्षात आल्या आहेत. साहजिकच पुस्तक खरेदीकडे कल वाढतो आहे. यांची प्रचिती पुस्तक महोत्सवातही जाणवते.

### 'बुके' पेक्षा 'बुक' बरे

कंपनीच्या एखाद्या कार्यक्रमात अतिथीचे स्वागत 'बुके (पुष्पगुच्छ)' देऊन करण्यापेक्षा 'बुक (पुस्तक)' देऊन करणे अधिक श्रेयस्कर मानले जाते; कारण पुस्तक वाचनाने संबंधित अतिथीला अधिक लाभ होणार आहे. त्याला बुकेपेक्षा बुकमुळे अधिक आनंद मिळणार आहे. जीवनभर ही ज्ञान शिदोरी त्याला उपयुक्तता प्रदान करणार आहे. नोकरी/उद्योग स्थळी उत्तम कामगिरीचे कौतुक, वाढदिवसाचे अभिनंदन, प्रमोशन मिळाल्याबद्दल किंवा बदली/सेवानिवृत्तीबद्दल सत्कार, वार्षिक स्नेहसंमेलन, इत्यादी अनेक कार्यक्रमात बुके, हारतुरे दिले जातात. त्यांचा आनंद क्षणिक टिकणारा असतो; परंतु बुक अर्थात त्या व्यक्तीला उपयुक्त पुस्तक अर्पण केल्यास, त्याचा त्यांना दीर्घकाळ आनंद आणि समाधान घेता येते. या पुस्तकाचा लाभ सत्कारार्थीच्या कुटुंबीयासह स्नेही-नातलग परिवारालाही होऊ शकतो. ज्ञानदान हे एक श्रेष्ठ दान आहे.

**समारोप :** भारतीय संस्कृतीत कार्यसंस्कृती आणि वाचनसंस्कृती यांचा समन्वय अधिक प्रभावी मानला जातो. नुकतेच नवे वर्ष सुरू झाले आहे. प्रत्येक महिना-दोन महिन्यामध्ये एखादे व्यवसायपूरक, यशस्वी उद्योजकांचे चरित्र, व्यक्तिमत्व विकास किंवा एकविसाव्या शतकातील कौशल्ये, इत्यादी प्रकारचे पुस्तक वाचनाचा निर्धार करा. यातून तुम्हाला ज्ञान, मनोरंजन आणि आनंद मिळेल. पुस्तकातील माहितीचा आपल्या दैनंदिन कार्यात उपयोग करून घ्या. मित्रांमध्ये विविध पुस्तकातील माहिती/विचार 'शेअर' करा. त्यावर बुद्धीमंथन (ब्रेनस्टॉर्मिंग) करा. तुम्हाला स्वतःलाच वाचनाच्या फायद्यांची अनुभूती होईल. 'स्वतः अनुभूती घ्या, इतरांना अनुभूती घेण्यास सांगा'.

*(या लेखाच्या लेखकांनी लिहिलेली उद्योजकता, व्यवस्थापन यासह इतर विषयांवरील एकूण १० पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. लेखक शासकीय तंत्रनिकेतनचे माजी प्राचार्य आहेत. त्यांचा मो. क्र. ९८२३२३९३४० असून ई-मेल jeevanmuley@gmail.com आहे.)*

■ ■




पायाभूत प्रकल्प,
एफडीआयमध्ये देशात अग्रेसर

# महाराष्ट्र ठरतंय देशाच्या विकासाचे इंजिन



**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताची अर्थव्यवस्था जगातील टॉप ३ अर्थव्यवस्थांमध्ये आणण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यात महाराष्ट्राचा देशातून सर्वाधिक १ ट्रिलियन डॉलरचा वाटा असणार आहे. त्या दृष्टीने महाराष्ट्राची वाटचाल सुरू असून सर्वच आघाड्यांवर महाराष्ट्र आगेकूच करत आहे. महाराष्ट्र हे नेहमीच देशी आणि परदेशी गुंतवणूकदारांचे आकर्षणाचे केंद्र ठरले आहे. दावोस येथे पार पडलेल्या जागतिक आर्थिक परिषदेत यावर शिक्कामोर्तब झाले. परिषदेमध्ये राज्यात १ लाख ३७ हजार कोटी रुपयांच्या परदेशी गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले. देशातील सर्वाधिक पायाभूत सुविधांचे प्रकल्प महाराष्ट्रात सुरू आहेत. या प्रकल्पांमुळे कनेक्टिव्हिटी वाढणार आहे. लोकांचे जीवन सुलभ होईल. महाराष्ट्र हे देशाच्या विकासाचे इंजिन ठरणार असून भविष्यातही अनेक मोठमोठाले प्रकल्प राज्यात येईल यात शंका नाही.**

**- डॉ. अभिराम डबीर**

**अ) शेतीची परिस्थिती :** आजमितीला भारत हा सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येचे भरण पोषण, रोजगार, स्वयंरोजगार आणि कौशल्य विकासाच्या दृष्टीने शेती क्षेत्राला आजही अनन्यसाधारण महत्त्व आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत शेती क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्न आणि रोजगारातील हिस्सा कमी होणे ही इष्टापत्ती आहे. भारतात शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा १९५१ मध्ये पन्नास टक्क्यांहून अधिक होता, तो आता १५ टक्क्यांपर्यंत आलेला आहे. महाराष्ट्रात त्याची टक्केवारी १० ते १२ टक्के एवढीच आहे, अशी परिस्थिती असतानाही शेती आणि शेतीपुरक व्यवसायांवर आधारित निम्मी लोकसंख्या आजही कार्यरत आहे. हा विरोधाभास आहे. आजही ६० टक्के जमीन शेतीवर जे प्रत्यक्ष राबत नाहीत त्यांच्या मालकीची आहे. शेतीमध्ये कार्यरत ३० कोटी लोकांपैकी ५०-५५ टक्के भूमिहीन शेतमजूर (Laudless Agri worth) वा नाममात्र शेती असलेले भूमीधारक आहेत. कृषी क्रांतीचे अनेक प्रयोग आज देशामध्ये सुरू आहेत. सेंद्रीय शेती, कसेल त्याला जमीन व त्याचे हक्क असे भुसुधार प्रयत्न शासन स्तरावर होत आहेत. सरकारचा रासायनिक खतांवर दरवर्षी लाखो कोटी रुपयांचे अनुदान द्यावे लागतो. अन्नसुरक्षा कायदा आहे. त्यानुसार शेती उत्पादन, खाद्यान्न हे शेती - पाणी - रोजगार विकासाचे मुख्य धोरण राबवत असताना विषमुक्त अन्न, शेतकऱ्यांसाठी सकल हिताचे काही शाश्वत उपाय शासन स्तरावर सातत्याने कृषी विभाग राबविताना दिसतो.

**ब) नवकौशल्याचे महत्त्व :** या पार्श्वभूमीवर आजच्या वेगवान व सतत बदलणाऱ्या जॉब मार्केटमध्ये चाकोरीबद्ध करिअरची कल्पना भूतकाळजमा झाली आहे. ग्रीक इकॉनॉमी, नवीन तंत्रज्ञानाचा उदय आणि विविध उद्योगांच्या एकत्रित येण्यामुळे व्यावसायिकांना व नवउद्योजकांना आधुनिक व उत्कृष्ट कौशल्य संच असण्याचे आव्हान आहे. वेगवेगळ्या उद्योगांमध्ये वेगवेगळ्या भूमिकांशी जुळवून घेणारी कौशल्ये प्राप्त करणे ही आजच्या काळाची गरज बनली आहे. त्याला हस्तांतरणीय कौशल्ये असे संबोधले जाते. ही कौशल्ये एका कामातून दुसऱ्या प्रकारच्या कामात वापरता येऊ शकतात, विविध प्रकारच्या नोकऱ्या आणि वेगवेगळ्या भूमिकांमध्ये ती वापरता येऊ शकतात. किंबहुना उपयुक्त ठरतात यामध्ये आंतर वैयक्तिक संभाषण, वेळेचे व्यवस्थापन, वाटाघाटी यासारखे सॉफ्ट स्किल्स तसेच विदा (डेटा) विश्लेषण, कंटेट रणनीती विश्लेषणात्मक तर्क इ. हार्डस्कील्सचा समावेश होता.

**क) डेमोग्राफिक डिव्हिडंटचा फायदा :** भारताच्या डेमोग्राफीक डिव्हिडंटचा लाभ देशास व्हावा यासाठी या लोकसंख्येचे कुशल मनुष्यबळामध्ये रूपांतर होणे आवश्यक आहे. व्यावसायिक शिक्षणाच्या माध्यमातून कुशल मनुष्यबळाचा विकास प्रत्यक्ष व गतीने करता येतो. त्यासाठी व्यावसायिक शिक्षणाचे प्रकार, प्रशिक्षणाचे विविध उपक्रम, त्यातून मिळू शकणाऱ्या रोजगाराचे, स्वयंरोजगार व नोकरीचे स्वरूप रोजगाराचे क्षेत्र व त्याचा इतर उद्योग वा सेवा क्षेत्रांशी असलेला संबंध प्रभावीपणे जोपासण्यासाठी युवक-युवतींना व्यावसायिक शिक्षण क्षेत्रातील समस्या कारणे व उपाय प्रथम समजून घेणे पण महत्त्वाचे ठरते.

**ड) संस्थेविषयी** : स्वतःचा उद्योग स्वतःचा उद्योग-व्यवसाय स्थिर स्थावर करण्यासाठी व्यक्तिनिहाय पावले उचलावी लागतात. यासाठी स्वतःचा उद्योग सुरू करण्यासाठी एमसीईडी महाराष्ट्र उद्योजकताविकास केंश्वसारख्या राज्य पातळीवर उत्कृष्ट काम करणारी संस्था राज्याच्या कानाकोपऱ्यात व तळागाळात उद्योजकतेचा प्रसार-प्रचार व समाजचे उद्योजकीकरण करण्यासाठी १९८८ सालापासून कटिबद्ध आहे. या सालापासून कटिबद्ध आहे. या संस्थेच्या 'पोर्टल'चा अभ्यास केल्यास उद्योजकतेच्या विविध क्षेत्रात विविध उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रमांची मांदियाळी चांगल्या यशस्वीता टक्केवारीसह संस्थेचे प्रत्यक्ष जिल्ह्यात प्रेरक प्रशिक्षक (ट्रेनर्स मोटीव्हेटर्स' अथकपणे काम करताना दिसतात. यामध्ये कौशल्य, प्रशिक्षण भांडवल, गुंतवणूक, उद्योगनिवड त्यासाठीचे कर्ज, विविध कर्ज योजना बाजाराची मागणी व पुरवठा असा अभ्यास, संभाव्य नफा-तोटा समजावून घेणे इ. बाबी ठळकपणे विविध प्रशिक्षणांमध्ये अभ्यासल्या जातात. यशस्वी प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्यांना पुरस्कृत/अपुरस्कृत पद्धतीने प्रमाणपत्रदिली जातात. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणानंतर वर्षभर किमान पाठपुरावा करून उद्योग व्यवसाय उभा करण्यासाठी हॅड होल्डिंग संरक्षणात्मक सेवा संस्थेतर्फे पाठपुरावा स्वरूपात केला जातो हे विशेष.

**ड) हस्तांतरणीय कौशल्ये** : नेतृत्व कौशल्ये ग्राहकसेवा, संवाद आणि वेळ व्यवस्थापन यासारखी कौशल्ये तुमची व्यावसायिकता वाढवतात. डायनामिक मार्केटमध्ये तुम्हाला लाभ मिळविण्यासाठी ती उपयुक्त ठरतात. प्रभावी संवादकला, टीमवर्क, इंटरपर्सनल स्कील्स मजबूत व्यावसायिक नातेसंबंध निर्माण करण्यासाठी खूप महत्त्वाचे आहेत. या कौशल्यांद्वारे तुम्ही तुमचे सहकारी व ग्राहकांशी प्रभावीपणे संवाद साधू शकता. स्पष्टपणे बोचून तुम्ही तुमचे नेटवर्क वाढवू शकता. समस्या सोडविण्यासाठी वृत्ती, टीकात्मक विचार, स्पष्ट संवाद, निर्णयशिलता जबाबदारीची भावना आणि सहानुभूती ही काही हस्तांतरणीय कौशल्ये आहेत. त्यांचे महत्त्व अधोरेखित आहेत. नेटवर्किंग आपल्याला नवनवीन कौशल्यांबद्दल मौल्यवान माहिती देते यासाठी वेळोवेळी आपला बाडोडाटा अपडेट करणे, पुर्नरचित करणे, बुलेट पॉइंटसह अचुकपणे तुमचे यश जबाबदाऱ्या रेखांकित करणे आपली व्यावसायिक व गुणवत्तापूर्ण बनवणे. हे उद्योजकता विकासामधील कौशल्यतेचे अचूक लक्षण आहे. आजुबाजूच्या परिस्थितीचा विचार करून साकल्याने विचार करून इतरांच्या मदतीने, नफा कमविण्याच्या रास्तशीर मार्गाने दीर्घ मुदतीत केलेले जिद्द व चिकाटीने साधलेले प्रामाणिक प्रयत्न म्हणजे 'उद्योजकता' अशी उद्योजकता या शब्दाची व्याख्या केली आहे, अशी उद्योजकता या शब्दाची व्याख्या केली आहे, अशी उद्योजकता अंगी बाळगणारा तो उद्योजक व्यक्ती होय.

**इ) सायबर सिक्युरिटी क्षेत्राचे उदाहरण** : तांत्रिक संशोधन व डाटा ॲनॅलिसीसचा मोठ्या प्रमाणात समावेश असलेले सायबर सिक्युरिटी या क्षेत्रातील विविध प्रकारची कौशल्ये प्राप्त केल्यावर किती भरपूर संधी उपलब्ध आहेत. याचे हे वानगीदाखल उदाहरण.

**१) सिस्टीम इंटीग्रेशन इंजिनीअर** : इंजिनसाठी सिस्टीम डेव्हलप आणि टेस्ट कंट्रोल तयार करतात. त्यातील अडचणी, दोष दूर करतात. **२) आयटी टेक्नीशियन** : कंपनी इतर क्वायेंटसाठी कॉम्प्युटर आणि प्रिंटर सपोर्ट करतात. गरज भासल्यास नेटवर्क सपोर्टही देतात. **३) सिस्टीम ॲडमिनिस्ट्रेशन** : कॉम्प्युटर सिस्टीमचे प्रॉपर मेंटेनन्स ऑपरेशन आणि कॉन्फिडरेशनचे काम पाहतात. ते कम्प्युटर्स सर्व्हर्स आणि सायबर सिक्युरिटी सॉफ्टवेअर आदी इकॉ नॉमी. **४) आयटी सिस्टीम इंजीनीअर** : कंपनीचे इन्फ्रास्ट्रक्चर आणि इतर प्रगतीचे व्यवस्थापन आणि संचालन करतात. ऑपरेटिंग सिस्टीम सॉफ्टवेअर आणि मॅनेजमेंट टुल्स ते इन्स्टॉल व टेक्सट करतात. **५) सिक्युरिटी कन्ललटंट** : विविध कसटमर्सला सिक्युरीटीही सर्व्हिसेस देतात. इंटर्नल सिक्युरिटीला ते असिस्ट करतात. **६) सिक्युरिटी ॲनेलीस्ट** : कंपनीच्या सिक्युरिटी प्रोग्राम आणि सिस्टीमवर बारीक लक्ष ठेवतात. **७) इन्फर्मेशन सिक्युरिटी ॲनेलिस्ट** : कंपनीच्याा कम्प्युटर्स नेटवर्कमध्ये कोणी घुसखोरी करीत आहे काय? त्या संबंधीची देखरेख व त्या बाबींवर तत्पर कार्यवाही करतात. **८) सिस्टीम टेस्ट इंजिनीअर** : कम्प्युटर्स सिस्टीम टेक्नॉलॉजीमध्ये वापरण्यात येणारी उत्पादने टेस्ट करतात. ते योग्य प्रकारे काम करतात की नाही हे पाहतात. **९) आयटी सिक्युरिटी स्पेशालिस्ट** : कॉम्प्युटर सिस्टीमला असणाऱ्या धोक्याचा हे आधीच आढावा घेतात. **१०) सिक्युरिटी सिस्टीम इंजिनीअर** : कॉम्प्युटर सिस्टीम, इन्फॉर्मेशन, नेटवर्क सुरक्षित करण्याचे काम करतात. या क्षेत्रातील वरील रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी आपण तपासल्या असता असे दिसते की हस्तांतरित कौशल्ये, मल्टी टास्किंग कौशल्ये असणाऱ्या मनुष्यबळाची प्रचंड गरज आहे मागणी आहे. ही वानगीदाखल एका आयटी आणि आयटी इनेबल्ड क्षेत्रातील घेतलेले उदाहरण आहे.

**ई) महाराष्ट्र देशाच्या विकसाचे इंजिन** : महाराष्ट्राने सुरुवातीपासूनच देशाच्या प्रगतीत आणि विकासाचे कायम मोलाचे योगदान दिले आहे. ज्ञान-विज्ञान, अभियांत्रिकी, शेती, फार्मा, सिंचन, आरोग्य, शिक्षण - उद्योग - मनोरंजन, पर्यटन अशा अनेक क्षेत्रात महाराष्ट्राने आघाडी आजपावेतो कायम ठेवली आहे. महाराष्ट्र हे जगभर एक पुरोगामी विचारांचे - प्रागतिक राज्य म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्राने




*माननीय डॉ. हेमंत वासेकर (IAS), आयुक्त, पशू संवर्धन विभाग, औंध, पुणे यांना उद्योजक मासिक भेट देताना डावीकडून श्री.सुदाम थोटे, विभागीय अधिकारी, एमसीईडी, पुणे; श्री.एम.डी.शेळके, प्रकल्प अधिकारी, एमसीईडी, पुणे व श्री. विवेक तोंडरे, समन्वय विभाग प्रमुख, एमसीईडी मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर दिसत आहेत.*

आज राज्यामध्ये आठ लाख पत्तीस हजार कोटी रुपयांची विकास कामे सुरू आहेत. महाराष्ट्राची आंतरराष्ट्रीय पत व ट्रॅक रेकॉर्ड बघून आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था वर्ल्ड बँक आदी आर्थिक सहकार्यासाठी तत्पर आहेत. भारत हा ५ ट्रिलियन डॉलर्स एकॉनॉमी बनण्यासाठी कंबर कसली आहे. नुकतेच मा. पंतप्रधान यांच्या हस्ते मुंबईत अभूतपूर्व अशा 'अटलशेतू' (शिवडी - न्हावा शेवा सागरी सेतूचे) लोकार्पण झाले. हा देशातील सगळ्यात मोठा सागरी सेतू (२२ किमी) असून, तो मुंबई - नवी मुंबई - पुणे - गोवा यांना जोडणार आहे. यामुळे एमएमआर क्षेत्रातील वाहतूक पायाभूत सुविधा उंचावणार आहेत. या प्रकल्पात जेवढे पोलाद वापरले आहे त्यातून चार हावडा ब्रीज, सहा स्टॅच्यू ऑफ लिबर्टी बांधता येतील. आणि प्रकल्पामधील तारांची लांबी विचारात घेतली तर पृथ्वीभोजती दोन वेटोळे होतील. या दर्जाचे तंत्रज्ञान व साधनसामग्री या सेतुच्या बांधकामासाठी वापरली आहे, असे शासनाने नमूद केले आहे. ही आपणा सर्वांसाठी अभिमानास्पद आणि गौरवास्पद बाब आहे. सागरी किनारा मार्ग विकास, मुंबई मेट्रोचे प्रगतीपथावर असलेले काम नवी मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाचे बांधकाम वर्सोवा-मुंबई सागरी सेतुचे प्रस्तावित बांधकाम, इस्टर्न फ्री वेचा ठाण्यापर्यंत होणारा विस्तार हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचे तिसऱ्या टप्प्याचे बांधकाम अंतिम टप्प्यावर आहे. विरार - अलिबाग मल्टीमॉडेल कॉरीडॉर कामाची चालना मुंबई - अहमदाबद बुलेट ट्रेन प्रकल्प मुंबई - गोवा महामार्गाचे प्रलंबित पण जोर धरत असलेले बांधकाम, कोकण विकास, रेल्वे विकासामध्ये महाराष्ट्रात सुरू असलेल्या सात वंदे मातरम एक्स्प्रेस या रेल्वे गाड्यांची निर्मिती लातूर येथील कारखान्यात होणार आहे. रेल्वेची १ लाख कोटीच्या वर कामे महाराष्ट्रात आज प्रगतीपथावर आहेत. जगात ५ व्या क्रमांकाची अर्थसत्ता म्हणून आपण आपले स्थान निर्माण केले आहे. मा. पंतप्रधान भारताचा जगात युएसए आणि चीननंतर क्रमांक ३ ची आर्थिक महासत्ता बनविण्याचे उद्दिष्ट ठेवून आहेत. यासाठी 'मेक इन इंडिया' अंतर्गत लोकल फॉर ग्लोबल, वन इंडस्ट्री वन प्रॉडक्ट / मोअर दॅन वन प्रॉडक्ट 'आत्मनिर्भर भारत'चा आग्रह केंद्र सरकारने धरला आहे. गेल्या वर्षी स्वित्झर्लंड येथील दाओस आंतरराष्ट्रीय परिषदेमधून वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममधून १ लाख सदतीस हजार कोटी गुंतवणुकीचे एमओयू करण्यात आले होते. त्यातील प्रकल्पांना मान्यता मिळून अनेक प्रकल्प आकारास येत आहेत. हा लेख लिहीत असतानाच या वर्षीच्या दाओस परिषदेमध्ये महत्त्वाच्या तीन प्रकल्पांसाठी मॅग्नेटिक महाराष्ट्राच्या अद्ययावत अशा दालनात ७० हजार कोटींचे सामंजस्य करार झाल्याचे वृत्त आले आहे. आयनॉक्स एअर प्रॉडक्शनसोबत २५००० कोटी रुपयांचा एमओयूमुळे भारताच्या ग्रीन हायड्रोजन धोरणाला महाराष्ट्र राज्याच्या या करारामुळे बळकटी मिळणार आहे. जिंदाल समूहाशी ४१ हजार कोटींचा करार एमओयू करण्यात आला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात ५ हजार नोकऱ्या इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम डिझाईन आणि मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात निर्माण होण्याची संधी निर्माण झाली आहे. महाराष्ट्रात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय)चा हब निर्माण करण्यासाठी महाप्रित आणि यूएसएच्या प्रिडिक्शन यांच्या समवेत ४ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा एमओयू करण्यात आला आहे.

जगभरातील उद्योग क्षेत्रातील महाराष्ट्र हे आकर्षणाचे केंद्र आहे. मजबूत असे पायाभूत सुविधांचे जाळे, कुशल मनुष्यबळ यामुळे गुंतवणुकीसाठी आणि राजगार निर्मितीसाठी महाराष्ट्र राज्याला कायमच प्रथम पसंती दिली जाते. २०२३ चे आयटी धोरण राज्यात कुठेही टेक्नॉलॉजी पार्क उभारण्याची मुभा देते. या धोरणातून ३५ लाख रोजगार भविष्यात प्रत्यक्ष / अप्रत्यक्षपणे निर्माण होण्याची शक्यता आहे. सगळ्या आयटी व आयटी आधारित सेवांना मान्यता मिळवण्यासाठी एक खिडकी व्यासपीठ महाराष्ट्र इनफर्मेशन टेक्नॉलॉजी इंटरफेस माहिती पोर्टल उपलब्ध आहे. यावर अनेक प्रोत्साहनपर सेवा उपलब्ध आहेत.

आर्थिक विकास नवीनतेचा शोध, स्थैर्य या दृष्टीने महाराष्ट्राकडे आज जग बघतेय. राज्याची आर्थिक व्यवस्था एक ट्रिलियन डॉलरची करण्यासाठी मॅग्नेटिक महाराष्ट्राची ही सशक्त वाटचाल आत्मनिर्भर भारताचा पाया मजबूत करणारीच ठरणार आहे, यात तीळमात्र शंका नाही.

*(या लेखाचे लेखक हे राष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ट प्रेरक-प्रशिक्षक आहेत. सध्या ते एमसीईडी मुख्यालय येथे कार्यरत आहेत. त्यांचा भ्रमणध्वनी ९४०३०७८७५९ आहे.)*




मा.श्री.श्रीकृष्ण पांचाळ, भा.प्र.से., जिल्हाधिकारी, जालना यांना उद्योजक मासिक भेट देताना श्रीमती करुणा खरात, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र , जालना व अधिकारी कर्मचारी दिसत आहेत.



*निवासी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम REDP पुणेमध्ये उद्योग सहसंचालक श्री. शैलेश राजपूत यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. त्यावेळी डावीकडून श्री.एम.डी.शेळके, प्रकल्प अधिकारी, एमसीईडी, पुणे; श्री.सुदाम थोटे, विभागीय अधिकारी, एमसीईडी, पुणे आदी दिसत आहेत.*




यशोगाथा : दादाभाऊ चिखले,
सोहम टॅलेंटलिंक प्रा.लि.

# हाऊसकिपिंगच्या कामाने पुसला अपयशाचा डाग!

**दादाभाऊ चिखले यांचे बालपण संघर्षमय गेले. मुंबईत झोपडपट्टीत राहिले, अनेकदा गाडीतच झोपले, हमालकाम केले आणि रस्त्यावरच अन्न खाऊन दिवस काढले. एका कंपनीत कामाला लागले, मात्र ती बंद पडली. घड्याळ विकण्याचा व्यवसाय केला, त्यातही अपयश आहे. सततच्या अपयशाने जीवन अंधकारमय होत असताना सोहम टॅलेंटलिंक प्रा.लि. कंपनीची स्थापना केली. या माध्यमातून उद्योग समूहांना हाऊसकीपिंग आणि सिक्युरिटी गार्ड पुरविण्याचे काम सुरू केले. कामातील सचोटी, कष्ट, संयम आणि गुणवत्ता याच्या जोरावर काम मिळत गेले. रांजणगाव, बारामती, पुणे, बेंगलोर आणि दुबईमधील कंत्राट त्यांना मिळाले आहे. कधीकाळी कामासाठी दारोदार फिरणारे दादाभाऊ आता इतरांना काम देत आहेत. हाऊसकीपिंगच्या व्यवसायाने त्यांच्यावर लागलेला अपयशाचा डाग पुसला आहे.**

**- सौ. निशिगंधा उमेश कणकवलीकर**

नमस्कार, मी श्री. दादाभाऊ सुगंधाबाई गीताराम चिखले बोलतोय. माझा जन्म १२ जुलै, १९६८ रोजी पिंपरी दुमाला, रांजणगाव, पुणे येथे झाला. आम्ही पाच भावंडं आहोत. आमचे आई-वडील शेती करायचे. आम्ही कांदा, ज्वारी, डाळिंब, सीताफळ ही पिके घेतो. मला नोकरी किंवा शेती करायची नव्हती. मी मुंबईला गेलो आणि ड्रायव्हिंग शिकलो. तिथे मी झोपडपट्टीत राहिलो, गाडीतच झोपलो, रस्त्यावरचं अन्न खाल्लं. कष्ट काय असतात याची खरी जाणीव तिथे मला झाली. आमच्याच गावातील श्री. सावळेराम चिखले यांनी मला मुंबईत आधार दिला. ते ड्रायव्हिंगचं काम करायचे. त्यांच्यासोबत मी क्लीनरचं आणि हमालीचं काम केलं. स्वतःचे हात काळे करून घेतल्याशिवाय आपल्याला त्या धंद्यातले खाचखळगे कळत नाहीत. माझा उद्योजकतेकडे कल होता. मला वडिलांनी टेंपो घेऊन दिला. दोन वर्ष टेंपोवर वाहतुकीचं काम केलं. त्यानंतर वाळूचा व्यवसाय करण्यासाठी मी ट्रक घेतला; पण त्यातही मला अपयश आले. मी ते सर्व धंदे बंद केले; कारण मला यश लाभत नव्हते.

माझे एक नातेवाईक श्री. भाऊसाहेब इचके यांच्या माध्यमातून मला 'ग्रो-वेल टाइम्स' या घड्याळाच्या कंपनीत लेबर सप्लायचं काम मिळालं; पण ती कंपनी बंद झाली. नुकसान भरपाई म्हणून कंपनीच्या मालकाने मला घड्याळे दिली. ती घड्याळे विकूनही मला आर्थिक नुकसान झाले. एव्हाना शिक्कामोर्तब झाला होता, की मी एक अपयशी व्यक्ती आहे. त्यामुळे जीवन नैराश्यमय झालं होतं. हे सगळं करत असताना उधारी पण वाढत होती. आमचं कुटुंब मोठं असल्यामुळे माझी पत्नी सौ. गायत्री हिला दररोज पहाटे उठून पन्नास भाकऱ्या कराव्या लागायच्या. ती गुरांना चारण्यासाठी घेऊन जात असे. तिथे ती हात-शिलाई करून महिलांचे कपडे शिवायची. सौ. गायत्री यांना मी शिलाई मशीन घेऊन दिली. तिला नातेवाईकांचं आणि गावातील महिलांचं शिलाईचं काम मिळू लागलं. पहिल्याच महिन्यात मशीनच्या किमतीपेक्षा जास्त पैसे तिने कमवले. तिच्या पहिल्या कमाईचे पैसे तिने मला दिले; पण मी ते स्वीकारले नाहीत. त्यातून तिने सोन्याचा दागिना केला आहे.

मी 'सोहम टॅलेंटलिंक प्रा. लि.' या कंपनीची स्थापना केली. 'द ह्युमन टच' हे ब्रीदवाक्य ठरवलं. मी माझ्या नवीन कार्याचा शुभारंभ केला. मी ठरवलं की आता माघार घ्यायची नाही. पुढचं पाऊल पुढे टाकायचं आणि यशाचं शिखर गाठायचं. दरम्यानच्या काळात श्री. शिवाजी पराड या आमच्या नातेवाईकाने मला वीस हजार रुपये उसने दिले. हा एक मोठा आधार लाभला. अपोलो टायर्समध्ये मी पहिलं हाऊस-कीपिंगाचं काम सुरू केलं. त्यानंतर फियाट कंपनीमध्ये हाऊस- कीपिंगाचं आणि सिक्युरिटीचं काम मिळालं. श्री. संजय खेडकर यांनी मला कॉन्ट्रॅक्ट मिळवून दिलं. मग बजाज इलेक्ट्रिकलचं काम मिळालं. तिथे प्लांट हेड श्री. भार्गव यांनी मला 'उत्कृष्ट कॉन्ट्रॅक्टर' म्हणून पुरस्कार दिला. तो मला प्रेरणादायी ठरला. या पुरस्कारामुळे रांजणगाव एम. आय. डी. सी. मध्ये माझं नावलौकिक झालं. त्यामुळे मला कामं मिळत गेली. प्रामाणिकपणे काम केलं त्याचं फळ मिळालं. मी रात्रंदिवस झपाटल्यासारखं काम करायला लागलो. मला कष्ट करण्याशिवाय पर्यायच नव्हता.

त्यानंतर मी एक मोटरसायकल घेतली आणि ती घेऊन मी कॉन्ट्रॅक्ट

मिळवण्यासाठी धडपड करू लागलो. डाय ॲल्युमिनिअम कंपनीची भिंत सारखी पडायची. तिथल्या फर्नांडिस साहेबांनी मला ते बारा लाख रुपयांचं काम दिलं. मी ते काम चांगल्या पद्धतीने केलं. त्यात मला चार लाख रुपये फायदा झाला. त्यानंतर मला होशांग कंपनीचं काम मिळालं. त्यात मला पाच लाख रुपयांचा फायदा झाला. मी रांजणगाव एम.आय.डी.सी.मधील मोठ्या अधिकाऱ्यांच्या संपर्कात येऊ लागलो, त्यामुळे मला कामं मिळत गेली. आता मी कर्जमुक्त झालो होतो. मी ठरवलं की यापुढे मी कर्जबाजारी होणार नाही.

मी रांजणगावमध्ये छोटंसं तीनशे स्क्वे. फूटचं ऑफीस घेतलं आणि तिथून काम सुरू केलं. कामगारांच्या पी.एफ.ची कामं करत असताना पुण्यातील श्री. चंद्रशेखर कुलकर्णी नावाची व्यक्ती माझ्या जीवनात आली. ते मला मॅनेजमेंटचे धडे देऊ लागले. त्यामुळे माझ्या उद्योगात उत्तरोत्तर प्रगती होत गेली. पत्रव्यवहार करणे, कंपन्यांना व्हिजीट देऊन काम मिळवणे, वेगवेगळ्या एक्झिबिशन्सना जाऊन आपली ओळख निर्माण करणे, त्यातून शिकणे या सगळ्या गोष्टी होत गेल्या. बी.व्ही.जी., सुमित, प्रॉम्ट अशा संस्थांकडून आम्ही धडे घेऊ लागलो. इतर उद्योजकांचा अभ्यास करून आम्ही आमच्या कामाची पद्धत विकसित केली आणि ती यशस्वी झाली. भारत विकास ग्रुपचे आदरणीय श्री. हनमंत गायकवाड हे माझे आदर्श आहेत. पूर्वी मी लोकांकडे काम मागायला जायचो, आता लोक आमच्याकडे त्यांची कामं घेऊन येतात, हेच आमचं यश आहे. मी माझ्या आयुष्यात काही तत्वं पाळतो. कधीच कोणाचे पैसे बुडवायचे नाहीत, कामगारांचे पगार वेळच्यावेळेस द्यायचे, मला कोणी फसवलं तर चालेल; पण मी कोणाला फसवणार नाही, सरकारचे सर्व कर वेळच्यावेळी भरायचे.

आज आम्ही सोहमच्या माध्यमातून अनेक लोकांना रोजगार देत आहोत. आम्ही स्टाफींग आणि फॅसिलिटी मॅनेजमेंटचं काम करतो. अनस्कील्ड, सेमी-स्कील्ड, स्कील्ड वर्कर्स, लेबर, स्टाफ कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर पुरवणे हे आमचं काम आहे. ‘कमी कामगार, पण दर्जेदार काम’ हे तत्त्व आम्ही पाळतो. त्यामुळे प्रत्येक जण वाघासारखं काम करतो. सध्या आमचं रांजणगाव, कुरकुंभ, पुणे, बंगलुरू, गोवा, अनंतपूर, बेलगावी, वलसाड, सिल्वासा, दमन आणि दुबई इत्यादी ठिकाणी काम चालू आहे. टाटा स्टील, बजाज, सिप्ला, सिमेन्स, आयटीसी, एलजी, बॉश, ब्रिटानिया, कमिन्स, कल्याणी, सुझलॉन, सुप्रिम, ॲटलास कॉपको अशा मोठमोठ्या कंपन्यांचे कामकाज आम्ही करतो. सध्या सत्तर कंपन्यांमध्ये चालू असलेलं आमचं काम लवकरच शंभरपर्यंत पोहोचेल. आम्हाला भारतातच नव्हे तर जगभर आमच्या कामाचं जाळं पसरवायचं आहे.

आमचे लग्न होऊन पंधरा वर्ष झाली होती; पण आम्हाला अपत्य नव्हते. मी साईबाबांचा परमभक्त आहे. मी मोटरसायकलवरून साईबाबांच्या दर्शनाला सतत जायचो. मी नवस केला, की मला मूल होऊ दे, माझ्याकडे स्वतःची कार येऊ दे. माझी श्रद्धा आणि सबुरी फळाला आली. आम्हाला मुलगा झाला. आम्ही त्याचं नाव सोहम ठेवलं. मी माझ्या आयुष्यातली टाटा सुमो ही पहिली गाडी घेतली. मी माझं स्वतःचं घर बांधलं. मी घरच्यांच्या संमतीने वेगळं राहण्याचा निर्णय घेतला. माझी पत्नी, सौ. गायत्री सदैव माझ्या पाठीशी खंबीरपणे उभी असते. मला पर्यटनाचा छंद आहे. आजवर मी पत्नीसोबत २२ देशांमध्ये दौरे केले आहेत. तसंच आम्ही आमच्यासोबत दोन कर्मचाऱ्यांना घेऊन जातो, जेणेकरून ते पर्यटनातून उद्योग वाढीचे धडे शिकतील. मला पुस्तकं वाचायची आवड आहे. एकदा मी डॉ. उमेश कणकवलीकर यांचं ‘मी विजेता होणारच!’ हे पुस्तक विकत घेतलं. त्या पुस्तकात मला सरांच्या इतर पुस्तकांची माहिती मिळाली. मी ती सर्व पुस्तकं मागवली आणि वाचून काढली. त्यातून मला उद्योग वाढीसाठी मार्गदर्शन मिळालं. अलीकडेच मी माझ्या पत्नीसह सरांच्या शिष्यकुलला भेट दिली. त्यांचं ज्ञानमंदिर पाहून आम्ही भारावून गेलो आहोत. सरांकडे हजारो पुस्तकांचं भव्य ग्रंथालय आहे. आमच्या घरीही अंदाजे ३०० पुस्तकांचं ग्रंथालय आहे. वाचनसंस्कृती जोपासल्यामुळे जीवन समृद्ध होते याची मला प्रचिती आली आहे.

आम्ही सोहमला जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकवण्याचा निर्णय घेतला. मला समाजसेवेची आवड आहे. ज्या जिल्हा परिषदेच्या शाळेत मी शिकलो त्या शाळेच्या ग्रंथालयाला मी पाचशे पुस्तकं भेट दिली. एकदा श्री. राहुल चातुर सरांनी शाळेतील उंदरांविषयी तक्रार केली. मी आमच्या कपड्यांचे कपाट रिकामे करून शाळेला भेट दिले, जेणेकरून शाळेतील पुस्तके, वह्या, इतर महत्त्वाची कागदपत्रे सुरक्षित राहतील. श्री. मोहन चिखले यांच्यासोबत माझ्या पत्नीने ग्रामपंचायतीची निवडणूक जिंकली. सौ. गायत्रीने सरपंच पदाची धुरा हाती घेतली. आम्ही गावातील शाळेचा जीर्णोद्धार केला, सावित्रीबाई फुले सभागृह उभे केले, गावातील रस्ते सुधारले. पाटबंधाऱ्याची कामे केल्यामुळे आमचे गाव कृषिप्रधान झाले आहे. आमची चांगली कामगिरी पाहून एमआयडीसी मधील कंपन्यांनी आम्हाला मदत केली. आम्ही शाळेसाठी चार संगणक घेतले. सरपंचपदी भरीव कामगिरी केल्यामुळे माझ्या पत्नीला अनेक पुरस्कार मिळाले. सोहमला उत्तमरीत्या घडवणे आणि निरंतर समाजसेवा करणे हे आमच्या जीवनाचे उद्दिष्ट आहे.

मी नवउद्योजकांना इतकेच सांगू इच्छितो की, एखाद्या उद्योगात अपयश आलं तरी उद्योगाची कास सोडू नका. आपल्या उद्योगाचा सखोल अभ्यास करा. उद्योगाची पूर्ण माहिती नसल्यामुळे आपल्याला अपयश येतं. विचार करा जर त्या उद्योगात इतर माणसं यशस्वी होत असतील, तर आपण का होत नाही? कारण आपल्याला त्यातली संपूर्ण माहिती नसते. मला वाटतं अपयश आलं तरच आपण त्या उद्योगात यशस्वी होऊ शकतो. कोणताच उद्योजक अचानक यशस्वी होत नाही. लवकरच आम्ही १५०० स्क्वे.फिटच्या नवीन कार्यालयात स्थलांतरित होत आहोत. ३०० स्क्वे.फीट ते १५०० स्क्वे.फीटच्या ऑफीसमध्ये प्रवास करताना अत्यानंद होत आहे. एकेकाळी माझ्याकडे सायकल नव्हती; पण आज बीएमडब्ल्यू, स्कॉर्पिओ सारख्या आलिशान गाड्या माझ्याकडे आहेत. एक निश्चित, सोहम टॅलेंटलिंक प्रा. लि. विजेता होणारच!

*(या लेखाच्या लेखिका पूर्वी राष्ट्रीयीकृत बँकेत नोकरी करायच्या. आता त्या एक प्रशिक्षक आणि सामाजिक उद्योजिका आहे. त्यांचे मीच!' नावाचे पुस्तक प्रकाशित झाले आहे. ८ मार्च, २०२२ या जागतिक महिला दिनी, लहान ते महान प्रवास केलेल्या एका सामर्थ्यशाली, आयकॉनिक भारतीय महिलेला भेटण्याचे माझे स्वप्न मी पूर्ण केले. email - nishamissionvijeta@yahoo.com)*



यशोगाथा : राजू रामफळे, संचालक, फिनिक्स प्रॉपर्टीज

# घर खरेदी-विक्रीच्या व्यवसायातून समृध्दीकडे

**राजू रामफळे यांनी शिक्षक होण्याचे स्वप्न बाळगले होते. त्यासाठी बीए इंग्रजी आणि बीएड पूर्ण केले. शिक्षक पात्रता परीक्षा म्हणजेच टीईटी उत्तीर्ण केली. मात्र, सरकारी शाळांमध्ये शिक्षकांच्या जागा निघत नव्हत्या, तर खाजगी विनाअनुदानित संस्थांमध्ये मनाजोगा पगार मिळत नव्हता. मग एका बांधकाम क्षेत्राशी संबंधित फर्ममध्ये नोकरी केली. येथे घर खरेदी-विक्रीचा अनुभव घेतला आणि त्या जोरावर नव्या व जुन्या घरांची खरेदी-विक्री व भाड्याने देण्या-घेण्याचा व्यवसाय उभारला. पारदर्शकता आणि विश्वासार्हता याच्या जोरावर त्यात जम बसला. पुण्यासह अमेरिका, ऑस्ट्रेलिया, दुबई, सिंगापूर आणि व्हिएतनाममधूनही लोकं प्रॉपर्टी खरेदी-विक्रीसाठी त्यांना संपर्क साधतात.**

**- सुधीर साबळे**

आपण उत्तम शिक्षक व्हावे, मुलांना घडवावे, या क्षेत्रात नवनवीन संशोधन करावे, अशी एक नाही तर अनेक स्वप्ने त्याने पहिली होती. शिक्षकी पेशा स्वीकारण्यासाठी आवश्यक असणारे शिक्षण पण पुण्यासारख्या शहरात येऊन जिद्दीने पूर्ण केले, त्यानंतर शिक्षकाची नोकरी मिळवण्याचा खूप प्रयत्न केला खरा; पण मनात व्हावे, तसे काहीच घडले नाही. कदाचित नियतीला ते मान्य नसावे. शिक्षकी पेशासाठी आवश्यक असणारे शिक्षण घेणे त्याच्या नशिबात होते; पण पुढे जे काही स्वप्न पाहिलेले होते, ते पूर्ण होणे त्याच्या नशिबात नसावे. आता पुढे जाऊन काय करायचे? हा विचार डोक्यात आला तेव्हा, आपण जोखीम असणारा जरा हटके व्यवसाय करायचा निश्चय त्याने केला, त्याचा थोडा अनुभव एका ठिकाणी नोकरी करताना आला होता. त्यामुळे २२ मार्च २०१७ मध्ये खास करून पुण्यातल्या पॉश असणाऱ्या डेक्कन जिमखाना, भांडारकर रोड, या भागात जुन्या-नव्या घरांची खरेदी विक्री करण्याचा व्यवसाय करण्यासाठी फिनिक्स प्रॉपर्टीज नावाची फर्म सुरू करत व्यवसायाच्या क्षेत्रात पहिले पाऊल टाकले. नोकरीच्या पेक्षा व्यवसाय करणे किती चॅलेंजिग असते याचा अनुभव घेता घेता पाच वर्ष उलटून गेली. शिक्षण घेताना असे काही घडू शकेल याचा विचारही मी केला नव्हता. ध्यानीमनी नसताना सुरू झालेला हा व्यवसाय आज चांगला नावारूपाला आणणाऱ्या युवकाचे नाव आहे राजू रामफळे. ग्रामीण भागात लहानाचा मोठा झालेल्या राजूने आपल्या मनासारखे काहीच घडले नाही, म्हणून हताश न होता, वेगळा मार्ग निवडला आणि त्यामध्ये यश मिळवले. त्याने केलेले प्रयत्न, कष्ट हे युवा वर्गाला निश्चितपणे प्रेरित करणारे आहे.

### शिक्षक व्हायचे स्वप्न...

अहमदनगर जिल्ह्यातल्या श्रीगोंदा तालुक्यामधील भानगाव मध्ये प्राथमिक शिक्षण पूर्ण केले, त्यानंतर श्रीगोंदा येतील छत्रपती शिवाजी महाविद्यालयातून बी.ए (इंग्रजी)चे शिक्षण २०१०मध्ये पूर्ण केले. तेव्हा आपण शिक्षकच व्हायचे मी ठरवले होते. माझ्या आईची पण राजूने शिक्षक व्हावे हीच इच्छा होती, म्हणून पुढचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी एज्युकेशन हब असणाऱ्या पुण्यात माझा मोर्चा दाखल झाला. अरण्येश्वर येथील अध्यापक महाविद्यालयातून बी.एड. चे शिक्षण पूर्ण केले. तेव्हा शिक्षक म्हणून नोकरी करण्यासाठी टी.ई.टी परीक्षा पात्र असण्याचा निकष सरकारकडून बंधनकारक करण्यात आला होता. ती परीक्षा उत्तीर्ण केली, त्यानंतर लगेच राज्यातील सरकार बदलले. नव्या सरकारने शिक्षक होण्यासाठी अभियोग्यता चाचणी उत्तीर्ण असणे, आवश्यक आहे अशी अट निश्चित केली. ती यशस्वीपणे पूर्ण केली.त्यानंतर पुणे, श्रीगोंदा या भागातील काही खासगी विना अनुदानित शाळांमध्ये नोकरीच्या ऑफर येत होत्या; पण तिथे किती पैसे मिळणार, उदरनिर्वाह कसा चालणार, असे अनेक प्रश्न माझ्यासमोर अगदी आ वासून उभे होते. त्यामुळे थोडे फ्रस्ट्रेशन देखील आले होते. २०१३ मध्ये स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली खरी; पण आर्थिक घडी पूर्णपणे बिनसलेली होती. आई अंगणवाडी सेविका म्हणून काम करत होती, तिच्याकडून मिळणाऱ्या पैशावर मला पुण्यात राहणे शक्य नव्हते. पुण्यात सदाशिव पेठेत भाड्याने राहत असताना महिन्याला पाच ते सहा हजार रुपये खर्चासाठी लागत असत. आर्थिक परिस्थिती कठीण असल्यामुळे हाती घेतलेला स्पर्धा परीक्षेचा उपक्रम मला सोडून द्यावा लागला आणि खासगी ठिकाणी नोकरी करण्याचा निर्णय घेतला. बांधकाम क्षेत्राशी संबधित असणाऱ्या एका फर्ममध्ये नोकरी सुरू केली, हातात पडणाऱ्या पगारामध्ये पुण्यात राहणे शक्य व्हायला लागले. तिथे सेल्स एक्झीक्युटिव्ह म्हणून काम करत होतो, त्यामुळे बाहेर भरपूर

भ्रमंती व्हायची, लोकांना भेटायला मिळायचे, त्यामधून नवीन अनुभव मिळायचे. त्या फर्ममध्ये दोन वर्ष काम करत असताना प्रमोशन मिळाले. कामाचा आनंद मिळाला; पण एका क्षणावर असे वाटले की आपण किती काळ नोकरी करत राहायचे, आपले स्वतःचे काहीतरी करायला हवे, छोटा का होईना पण आपला व्यवसाय हवा, डोक्यात या विचाराने घर केले होते. आपल्याला कोणता व्यवसाय करता येऊ शकेल, याचा अभ्यास सुरू केला. आपण असा व्यवसाय करायचा की त्यामध्ये आव्हाने असतील, कागदपत्रांचे ज्ञान असणे आवश्यक असेल, अशा गोष्टींचा त्यामध्ये समावेश असेल. कमीतकमी गुंतवणूक एस्सेल आणि त्यामध्ये बऱ्यापैकी रिटर्न मिळतील, असा व्यवसाय करण्याचे निश्चित करत असताना रिअल इस्टेट ब्रोकरचा व्यवसाय सापडला.

### भाड्याच्या जागेत सुरू झाला व्यवसाय...

तारीख असेल २२ मार्च २०१७... त्या दिवशी प्रभात रोडवरील नवव्या गल्लीत भाड्याच्या जागेत या व्यवसायाची सुरुवात झाली. आपण फक्त डेक्कन जिमखाना, भांडारकर रोड, प्रभात रोड, लॉ कॉलेज रोड, या भागातील नव्या जुन्या घरांची खरेदी विक्री, भाड्याने देणे-घेणे करण्याचे ठरवले. व्यवसाय सूरू केला त्याच्या पहिल्या दिवसापासून व्यवहार पूर्ण होईपर्यंत तो पर्यंत आपण घर खरेदी करणारे आणि विक्री करणारे या दोघांच्या बरोबर राहायचे. त्याचा व्यवहार पूर्ण करायचा, त्यामध्ये काही अडचणी आल्या तर त्या स्वतः सोडवायच्या, हे तत्व पक्के केले होते. त्यामुळे अगदी थोड्या कालावधीत अनेक लोक आमच्याशी जोडले गेले. जागांच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार करत असताना काही कटू अनुभव देखील आले. धमकी देणे, अशा प्रकाराना तोंड द्यावे लागले; पण काहीही झाले तरी आपण काम करताना ते गांधीवादी विचारानेच करायचे हे तत्व पक्के केले होते. त्यामुळे असे प्रसंग अनेकदा आले; पण त्याचा व्यवसायावर काही परिणाम झाला नाही. आतापर्यंतच्या प्रवासामध्ये चांगली लोकं खूप भेटली. सरकारी अधिकारी, डॉक्टर, व्यावसायिक, प्राध्यापक, शिक्षक, उद्योगपती, अशी कितीतरी नावे सांगता येतील. घर हे प्रत्येकाच्या जीवनात महत्त्वाचा घटक आहे, त्यामुळे खूप गरज आहे, अशा ठिकाणी मी व्यवहार बाजूला ठेवून त्यांना मदत केली, अशा मंडळींचे आशीर्वाद मिळाल्यामुळेच व्यवसाय उभा राहण्यास मदत मिळत गेली.

### असा एक प्रसंग

एकदा ऑफिसात बसलेलो असताना माझ्याकडे ७० ते ७५ वय असणारे गृहस्थ आले. 'मला तुमच्याकडे काही काम मिळू शकेल का? मी खूप अडचणीत आहे, त्याची मनःस्थिती पाहून त्याना माझ्याकडे काम दिले, कामाचे स्वरूप काय होते ते म्हणजे आमच्याकडे आलेल्या ग्राहकांना घर, ऑफिस दाखवण्याचे, त्या गृहस्थांनी ते काम अगदी आनंदाने केले. हे इथे सांगण्यामागचे कारण म्हणजे मी जर शिक्षक म्हणून कुठे काम करत असतो, तर अशा गरजू व्यक्तींना मला मदत करण्याची संधी मिळाली नसती, माझ्या या व्यवसायामुळे ती मला मिळाली.

### घरातून होता विरोध.. पण

आपल्या मुलाने शिक्षकी पेशा निवडला आहे, त्यामुळे त्याने शिक्षकाची सरकारी नोकरी करावी, अशी माझ्या आईची पहिल्यापासून भूमिका होती. त्यामुले मी जेव्हा घरातून व्यवसाय सुरू केला तेव्हा त्याला घरातून विरोध होता; पण तो झुगारून मी व्यवसाय करण्याचा निश्चय पक्का केला होता. आपण जर व्यवसाय केला नाही तर आपली सुधारणा, विकास होणार नाही, यावर माझा ठाम विश्वास होता. त्यामुळे याच मार्गाने जाण्याचे ध्येय मी निश्चित केले. आपल्याकडे शैक्षणिक पात्रता असताना देखील मनासारखी नोकरी मिळत नाही, यावर चर्चा करत बसण्यापेक्षा दोन पावले पुढे टाकून घेतलेला व्यवसाय करण्याचा निर्णय हा माझ्यासाठी फायदेशीर ठरला आहे, असे त्याला वाटते.

### या तत्वांना पहिल्या दिवसापासून प्राधान्य...

व्यवसाय सुरू केला त्याच्या पहिल्या दिवसापासून जो पर्यंत आपल्या हातात येणारी प्रॉपर्टीची कागदपत्रे ही क्लिअर आहेत की नाही, याची खातरजमा होत नाही. तो पर्यंत ती प्रॉपर्टी कोणाही क्लाएन्टला दाखवायची नाही. व्यवहार करत असताना आपल्याला दोन पैसे कमी मिळाले तरी चालेल पण कुणाला फसवायचे नाही. घराची विक्री करणारे आणि घर खरेदी करणारे यांच्यामधील व्यवहार निश्चित करणे, या दोघांबरोबर समोरासमोर बसून चर्चा करणे, त्यामुळे प्रत्येक व्यवहार हा पारदर्शीपणे होतो, याचा या दोघांना फायदा होतो. आमच्या याच तत्वामुळे आमच्या व्यवसायाची माऊथ टू माऊथ प्रसिद्धी झाली आहे, त्या माध्यमातून चांगले ग्राहक आमच्याकडे जोडले गेलेले आहेत. व्यवसाय वृद्धी करण्यासाठी त्याचा चांगला फायदा होताना दिसत आहे.

### १०० व्यवसायांचा अभ्यास

रियल इस्टेटच्या व्यवसायात उतारण्याअगोदर सुमारे १०० वेगवेगळ्या व्यवसायांचा अभ्यास मी केला होता. त्यामध्ये बंद बाटलीतून होणाऱ्या पाण्याच्या विक्रीपासून ते फिश फार्मिंग, कुक्कुटपालन, डेअरी फार्मिंग अशा एक नाही तर १०० व्यवसायांचा समावेश आहे. एक महिनाभर मी हा सारा अभ्यास करत होतो. अखेरीस कमीत कमी गुंतवणूक आणि चांगले रिटर्न मिळवून देणारा वयवस्य म्हणून या रिअल इस्टेटमध्ये खरेदी-विक्रीच्या व्यवसायाची निवड केली. सध्या यामध्ये देखील खूप स्पर्धा निर्माण झाली आहे, त्यामुळे आपल्या व्यवसायात तंत्रज्ञानाचा आधार घेत आम्ही देखील बदल केले आहेत. पोर्टलच्या माध्यमातून आम्ही जगातील कानाकोपऱ्यात पोचलो आहोत. आम्ही ज्या भागात काम करतो, सध्या विदेशात असणाऱ्या कुणाला जर त्या ठिकाणी जुने-नवे घर खरेदी करायचे असेल तर ते आमच्याशी संपर्क करतात. खासकरून अमेरिका, ऑस्ट्रेलिया, दुबई, सिंगापूर, व्हिएतनाम या भागातील मंडळींनी संपर्क केलेला आहे.

### स्पर्धा वाढतेय....

कोरोनामुळे सगळे चित्र बदलून गेलेले आहे, त्यामध्ये बेरोजगारीची भर पडल्यामुळे दिवसेंदिवस या उद्योगात स्पर्धा वाढत चालली आहे. त्यामुळे त्याचा विचार करून नव्या तंत्राचा प्रभावी उपयोग करून यामध्ये काय करता येईल, याचा विचार सुरु त्याने केला आहे. त्याच बरोबर नवा काही पूरक व्यवसाय करता येतो का, याचा विचार देखील त्याच्या डोक्यात घोळत आहे. आपल्या व्यवसायाच्या वृद्धीसाठी त्याने नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून व्यवसाय वाढवण्याचा उद्देश त्याने ठेवला आहे.

*(मुलाखतकार वरिष्ठ पत्रकार असून विविध नियतकालिकांसाठी विविध विषयांवर लिखाण करीत असतात. त्यांचा भ्रमणध्वनी ९४२१०८००७२ असा आहे.)*




**यशोगाथा : प्रा.शामसुंदर कुलकर्णी,**
**एस.एम.कुलकर्णी मॅथ्स सायन्स अकॅडमी, पुणे**

# विद्यादानातून स्वयंविकास

**प्रा.शामसुंदर कुलकर्णी यांनी विशेष गुणवत्तेसह गणित विषयात एम.एस्सी. केले. छत्रपती संभाजीनगर येथे काही नोकऱ्या करून बघितल्या. स्वतःची शिकवणीही सुरू केली. मात्र फारसे यश मिळत नव्हते. मग थेट पुणे गाठले. सुरुवातीला पुण्यातील दिग्गज मंडळींच्या मुलांच्या इंजिनीअरिंगच्या होम ट्युशन्स घेतल्या. दिवसभर अक्षरशः २०० किलोमीटरचा प्रवास करत पहाटे ५.३० ते रात्री १० वाजेपर्यंत शिकवणी घ्यायचे. यात चांगलेच यश मिळू लागल्यावर होम ट्युशनचे यश क्लासमध्ये रूपांतर झाले. मग एस. एम.कुलकर्णी मॅथ्स सायन्स अकॅडमीची सुरुवात केली. आता त्यांच्याकडे तब्बल ३० शिक्षकांची टीम आहे. परदेशातील विद्यार्थीही ऑनलाइनद्वारे त्यांना जोडली गेली आहेत. या कामाबद्दल त्यांचा पुणे महापालिकेसह इतर संस्थांकडून सन्मान करण्यात आला आहे.**

**- सौ. समीरा पारवे**

'कसलेले हातच देऊ शकतात योग्य आकार', या संकल्पनेने झपाटलेला मी प्रा. शामसुंदर पुष्पा मधुकरराव कुलकर्णी बोलतोय. माझा जन्म १९ ऑगस्ट, १९७५ रोजी झाला. माझे वडील शेती करायचे. त्यामुळे शाळेसोबत गुरे राखण्याची कामे करावी लागत होती. दहावी नंतर मी स्वकमाईने शिक्षण घेतले. मला बी.एस्सी.ला मॅथेमॅटिक्स या विषयात गोल्ड मेडल मिळाले. मी एम.एस्सी. डिस्टिंक्शनने उर्त्तीण झालो. दोन-चार नोकऱ्या केल्यानंतर मला महाराष्ट्र पब्लिक स्कूल, औरंगाबाद येथे तीन-चार तासांची शिक्षकाची नोकरी मिळाली. फावल्या वेळात मी 'यश कोचिंग क्लासेस' नावाचा लघुउद्योग सुरू केला; पण मी त्रस्त झालो होतो कारण लोकं फी बुडवायचे, भाड्याची जागा असल्यामुळे जागा बदलावी लागायची. त्यामुळे आर्थिक नुकसान व्हायचे. प्रामाणिकपणे काम करूनसुद्धा सुख-समाधान लाभत नव्हते. या सर्व प्रकारामध्ये तीन-चार वर्ष निघून गेली. पैशापेक्षा अनुभवाचेच धडे जास्त मिळाले.

मला लहानपणापासूनच वाचनाची आवड आहे. मी शिक्षण घेत असताना ग्रंथालयातून पुस्तके आणून वाचन करत असे. माझ्या श्री. श्रीकांत देशपांडे या मित्राच्या आजोबांचे वाचनालय त्यांच्या मृत्यूनंतर बंद झाले. ती सर्व पुस्तके त्या मित्राने त्याच्या घरी आणली. त्याचा मी पुरेपूर फायदा घेतला. आज आमच्या घरी आमचे एक छोटे ग्रंथालय आहे. प्रतिष्ठान महाविद्यालय तर्फे आयोजित वक्तृत्व कलेचा मी विजेता झालो. त्यामुळे आपल्याकडे वक्तृत्वकला आहे याची ओळख झाली आणि आज या वक्तृत्वाच्या जोरावरच मी शैक्षणिक क्षेत्रात उत्तरोत्तर प्रगती करत आहे.

दरम्यानच्या काळात माझं सौ. सुलभाशी लग्न झाले. २००१ ला मी माझ्या पत्नीला आणि मोठ्या मुलीला घेऊन पुण्यात आलो. माझ्याकडे फक्त १२,००० रुपयांचे भांडवल होते. आम्ही एका छोट्याशा पत्र्याच्या खोलीत भाडेतत्वावर राहू लागलो. मी माझ्या कामाची पद्धत बदलली. घरोघरी जाऊन मी इंजिनीअरिंगच्या मुलांना शिकवू लागलो. पुण्यातील अष्टेकर ज्वेलर्स यांच्या मुलांपासून माझ्या शिकवणीच्या कामाला सुरुवात झाली. सोप्या, सुलभ पद्धतीने, दर्जेदाररीत्या, प्रामाणिकपणे कोचिंग केल्यामुळे मला किर्लोस्कर, फिनोलेक्स, जय हिंद कलेक्शन, कासट अशा मान्यवरांच्या मुलांच्या प्रायव्हेट शिकवण्या मिळू लागल्या. या शिकवण्यांच्या जोरावर मी एक मोटरसायकल घेतली. त्यामुळे प्रवास करणे सोपे झाले. दिवसभरात मी २०० कि.मी.चा प्रवास करायचो. माझा पहिला क्लास पहाटे साडेपाच वाजता आणि रात्री शेवटचा क्लास दहा वाजता असायचा. मी रोज १६ तास कष्ट करायचो.

मी डी.एस.के. विश्व, धायरी येथे स्वतःच्या मालकीचे घर घेतले. आयाचित इंडस्ट्रीचे मालक श्री. सुनील आयाचित यांनी मला त्यांच्या वास्तूच्या पार्किंगच्या जागेत क्लास घेण्याचे सुचवले. त्यांच्या मुलासोबत मला पन्नास इंजिनीअरिंगची मुले शिकवणीसाठी मिळाली. उचिल इंडस्ट्रीचे मालक श्री. राजन उचिल यांनी मला चारचाकी वाहन घेण्याचा सल्ला दिला. त्यांनीच मला वाहनकर्ज मिळवून देण्यासाठी मदत केली. त्याच सुमारास मी पुण्यात पाषाण येथे आणखीन एक स्वतःच्या मालकीचे घर घेतले. प्रामाणिकपणे काम केले की त्याचे फळही सुमधूर असते. श्री. जयसिंह परिहार यांच्या मुलीला मी

शिकवत होतो. त्यांनी मला बाणेर, पुणे येथील त्यांची पडीक पाच गुंठे जागा वाजवी दरात विकली. ही जागा विकत घेण्यासाठी मी माझी दोन्ही घरे विकली. श्री. राजू जाधव या बिल्डरने मला ना नफा, ना तोटा या तत्वावर आलिशान प्रशस्त असा बंगला बांधून दिला. मी त्यांच्या मुलीला शिकवणी देत होतो. त्या शिकवणीच्या जोरावर ती डॉक्टर झाली. एक गुरुदक्षिणा म्हणून त्यांनी मला मदत केली.

'मी विजेता होणारच!' हा कार्यक्रम मी पाहिला. 'मी विजेता होणारच!' हे पुस्तक खरेदी केले. त्यानंतर मी हा कार्यक्रम पुन्हा पुन्हा पाहिला. यातून मला एक शिकायला मिळाले की, आपले स्वतःचे नाव कमवले पाहिजे. म्हणून मी यश क्लासेस नाव बदलून 'एस.एम.कुलकर्णी मॅथ्स-सायन्स ॲकॅडमी' या नावाची संस्था स्थापन केली. हार्डवर्क आणि स्मार्टवर्क या दुहेरी रुळांवर आपल्या यशाची गाडी रुळती ठेवली पाहिजे. इच्छाशक्तीच्या जोरावर माणूस कोणतेही अशक्य कार्य शक्य करू शकतो. डॉ. उमेश कणकवलीकर सरांचे ज्वलंत विचार, लोकांना सामुहिकरीत्या प्रेरणा देण्याचे कौशल्य, त्यांचा घणाघाती आवाज, मनात कायमची घुमत असलेली संवादशैली यामुळे मी मंत्रमुग्ध झालो होतो.

डॉ. उमेश कणकवलीकर हे माझ्या जीवनातील टॉप फाइव्ह गुरुवर्यांपैकी एक आहेत, ज्यांच्यामुळे माझ्या जीवनाला आकार आला आहे. श्री. मिनाज खान हे बॉम्बे मर्कंटाइल बँकेत मोठ्या पदावर कार्यरत होते. त्यांनी मला जीवनात आर्थिक सल्ले दिले. त्यांच्या मुलीची मी शिकवणी घेत होतो. माझ्या शैक्षणिक जीवनात गणिताचे शिक्षक श्री. म्हस्के सर यांचा विशेष प्रभाव आहे. त्यांच्यामुळेच मला गणित विषयाची गोडी निर्माण झाली. श्री. सुनील आयाचित, श्री. राजन उचिल, श्री. प्रसाद कोकीळ यांची मला जीवनात मदत झाली आहे. आज श्री. प्रसाद कोकीळ यांच्या स्वतःच्या मालकीच्या १५ कंपन्या आहेत. यातूनही मला भरपूर प्रेरणा मिळते. या सर्व मान्यवर गुरुवर्यांच्या सोबत मी मानवी स्नेहसंबंध जोपासले आहेत.

कोरोनाच्या काळात मला ऑनलाइन पद्धतीने विद्यार्थ्यांना शिकवण्याची प्रेरणा मिळाली. मी परदेशातील विद्यार्थ्यांचेही ऑनलाइन क्लासेस घेतो. त्यातून मला चांगले उत्पन्न मिळते. मी गरीब शेतकऱ्याचा मुलगा असल्यामुळे मला गरिबीची जाण आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणासाठी खूप पायपीट करावी लागते. मी स्वतः दररोज दहा-बारा कि.मी. पायी चालून शिक्षण घेत होतो. आता आम्ही 'अरणी फाउंडेशन'च्या माध्यमातून ऑनलाइन पद्धतीने घरच्या घरी शिकण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. तळागळाच्या विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळाले तर ते लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत भरीव कामगिरी करतील. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, ते प्यायल्यावर माणूस गुरगुरल्याशिवाय राहणार नाही, हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार मला तंतोतंत पटतात. आजच्या पिढीला चांगले शिक्षण आणि शिक्षक लाभले तर महाराष्ट्र शिक्षणक्षेत्रात आणखी प्रगती करेल असे मला वाटते. तरुण पिढीने नुसते डॉक्टर, इंजिनीअर, सीए, वकील न होता शिक्षक हा पेशा स्वीकारला पाहिजे; कारण शिक्षणक्षेत्रात उत्तम कामगिरी करून विजेता होता येते. हे मी माझ्याच उदाहरणातून विजेता होऊन सिद्ध केले आहे.

सूर्याला संस्कृत भाषेत अरणी म्हणतात. ' अरणी फाउंडेशन' या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट हेच आहे की, ज्याप्रमाणे सूर्याचा तेजोमय प्रकाश पृथ्वीतलावरील प्रत्येकाला लाभतो, त्याचप्रमाणे अरणी फाउंडेशनच्या माध्यमातून उत्तम दर्जाचे शिक्षण समाजातील सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना लाभले पाहिजे. अत्यंत नाममात्र शुल्क आकारून विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण उपलब्ध झाले आहे. ग्रामीण भागातील गरजू, गरीब शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना परवडेल म्हणून दरमहा रु.१५०/- आकारले जातात. सुरुवातीला पंधरा दिवसांची शिकवणी निःशुल्क दिली जाते. पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना मॅथ्स, सायन्स आणि इंग्रजी हे विषय शिकवले जातात. समाजाप्रतिच्या उत्तरदायित्वाच्या भावनेतून हे ज्ञान पसरवण्याचे कार्य संस्थेमार्फत चालवले जाते.

दर्जेदार शिक्षण देण्यासाठी प्रा. गौरी कुलकर्णी, प्रा. बाळासाहेब शिंदे, प्रा. गणेश भुमे अशा तीस तज्ज्ञ शिक्षकांची टीम या कार्यासाठी सज्ज झाली आहे. गेली अनेक वर्षे शिक्षणशेत्रात कार्यरत असलेले माजी शिक्षण आयुक्त श्री. पुरुषोत्तम भापकर हे एक तज्ज्ञ संचालक म्हणून संस्थेला लाभले आहेत. पुणे आणि संभाजीनगर येथे पाच अत्याधुनिक डिजिटल सुविधा असलेल्या स्टुडिओच्या माध्यमातून हे काम केले जाते. या सेवेचा आज ५००० विद्यार्थी लाभ घेत आहेत. लवकरच ' अरणी फाउंडेशन' पाच लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचेल असे आम्ही ध्येय रचले आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून आम्ही सीबीएससी माध्यमाच्या मुलांचे ऑनलाइन शिकवणीचे वर्ग सुरू करत आहोत.

मी आजवर ३०,००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले आहे. मला पुणे महानगर पालिकेतर्फे पुण्याच्या शैक्षणिक आणि सामाजिक कीर्तीत भरीव कामगिरी केल्याबद्दल पुरस्कार देण्यात आला. तसेच मला जेएसपीएम संस्थेचा 'विद्यागौरव पुरस्कार' मिळाला आहे. भूतकाळात दरमहा शेकड्यात उत्पन्न कमवणारा शामसुंदर वर्तमानात करोड रुपयांची वार्षिक उलाढाल करू लागला. माझी मोठी मुलगी शर्वरी ही लंडनला मास्टर्स डिग्री घेत आहे आणि मुलगा अर्णव एम. आय.टी.मध्ये इंजिनीअरिंग शिकत आहे. मला परिस्थितीने नाही, तर मी वेळोवेळी घेतलेल्या अचूक निर्णयांनी घडवले आहे. मी सतत स्वतःचे मूल्यमापन करत राहतो. जगातील प्रत्येक व्यक्तिमत्त्व एकमेव आहे, आगळे-वेगळे आहे. प्रत्येकाकडे स्वतःची अशी मूलभूत शक्तीस्थळं असतात, ज्यामुळे त्याचा व्यक्तिमत्त्व विकास होत असतो. स्वयंप्रेरणा आणि स्वयंशिस्त यांच्या जोरावर आपण अशक्य ते शक्य हा प्रवास करू शकतो. आजच्या तरुणांना मी असा संदेश देतो की, भरपूर शिक्षण घेऊन आपली बुद्धी सतत वाढवत रहा. सतत शिकत रहा. शिक्षणाला पर्याय नाही. आमच्या घरासमोर एक कुंभार मडकी घडवण्याचे काम करायचा. त्या कुंभाराकडून मी आयुष्यभर पुरेल अशी शिकवण घेतली की, 'कसलेले हातच देऊ शकतात योग्य आकार.' हे वाक्य मला त्या कुंभाराकडून मिळालेल्या शिकवणीतून सुचले, जे मला आयुष्यभर पुरेल अशी शिकवण देत राहिले.

*(या लेखाच्या लेखिकेचे लेख नियतकालिकांतून प्रकाशित होत असतात. त्यांचा भ्रमणध्वनी ८२७५३६४९१४ आहे.)*






## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाचे लाभार्थी संदीप बेहरे

# लाकडी घाण्याच्या तेलातून ३० लाखांची उलाढाल

**रिफाइंड तेल आरोग्यासाठी चांगले नसते. त्यामुळे एक मोठा वर्ग पारंपरिक घाण्याच्या तेलाकडे वळत आहे. मात्र, त्या तुलनेत त्यांची मागणी पूर्ण करण्यासाठी घाण्याच्या तेलाचे उत्पादन करणाऱ्यांची संख्या कमी आहे. ही बाब लक्षात घेऊन संदीप बेहरे यांनी लाकडी घाण्यातून तेल तयार करण्याचा उद्योग उभारला. यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातून अर्थसहाय्य मिळाले. १०.५४ लाखात उभारलेल्या प्रकल्पातून वर्षाकाठी ३० लाखांची उलाढाल होत आहे. यातून ३ जणांना पूर्णवेळ रोजगारही मिळाला आहे.**

**- प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन राज्यातील बेरोजगार तरुणांना व्यवसायाच्या संधी निर्माण करण्यासाठी विविध योजनांची राबवत असते. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) त्यापैकीच एक. यातून राज्य शासनाच्या भक्कम सहकार्याने तरुण-तरुणींना नवीन उद्योजक बनण्याची सुवर्णसंधी निर्माण झाली आहे. या योजनेंतर्गत लाभ मिळण्याकरीता १८ ते ४५ वर्ष वयोगटातील कोणतीही व्यक्ती अर्ज करू शकते. जर प्रकल्प हा १० ते २५ लाखासाठी असेल तर इयत्ता सातवी पास आणि जर प्रकल्प २५ ते ५० लाखासाठी असेल तर इयत्ता दहावी पास असणे आवश्यक आहे. उत्पादन उद्योगासाठी कमाल प्रकल्प मर्यादा ५० लाख रुपये आणि सेवा उद्योगासाठी कमाल प्रकल्प मर्यादा २० लाख रुपये आहे. योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात तरुणांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी मिळाली आहे. नांदेड जिल्ह्यातील संदीप बेहरे त्यापैकीच एक.

### १० लाखात उभारला प्रकल्प

नांदेड जिल्ह्यातील कलावतीनगर वाडी (बु) नांदेड येथे शुभ्रा इंडस्ट्रिज लाकडी घाणा खाद्यतेल उत्पादन उद्योग विस्तारीकरण करण्यात आला आहे. फार्म्स ओशन या नावाने खाद्यतेलाचे ब्रँड तयार करण्याचा व्यवसाय संदीप प्रल्हाद बेहरे यांनी उभारला आहे. रिफाइंड तेलाचे आरोग्यावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष दुष्परिणाम होत असल्याने त्यांना लाकडी घाणा तेल तयार करण्याची कल्पना सुचली. त्यांच्या प्रकल्पाची किंमत १० लाख ५४ हजार एवढी आहे. या व्यवसायातून ते वर्षाला ३० लाख रुपयांची उलाढाल करतात. या व्यवसायाच्या माध्यमातून त्यांनी १ पुरुष व ३ महिलांना अर्धवेळ काम देऊन रोजगार उपलब्ध करून दिला आहे.

### प्रकल्पाचा केला अभ्यास

सुरुवातीला संदीप प्रल्हाद बेहरे यांनी लातूर, सातारा व कोल्हापूर येथील लाकडी घाण्याचे तेल उत्पादकासाठी प्रसिद्ध असलेल्या उद्योजकांसोबत समन्वय साधला. यात त्यांच्या बरोबर त्यांच्या पत्नी रचिता बेहरे यांचा कृतिशील सहभाग आहे. बेहरे यांनी प्रथमतः स्वखर्चाने कोयम्बतूर येथून २ लाख ९० हजार रुपयांना एक लाकडी घाणा मशीन विकत घेवून हा व्यवसाय पारंपरिक पद्धतीने सुरू केला. लाकडी घाण्यातून ते खोबरे, शेंगदाणा, करडी, सूर्यफूल, जवस, मोहरी, बदाम, तिळाचे असे विविध प्रकारचे तेल काढतात. उद्योग उभारताना सुरुवातीला त्यांना अनेक अडचणीचा सामना करावा लागला. व्यवसायाबाबत संपूर्ण माहिती मिळविण्यासाठी सर्वेक्षण करून संबंधित तंत्रज्ञानाबाबत जाणून घेतले. तेलाचा घाणा मशीन




रकमेतून चार यंत्र खरेदी केले. त्यामुळे त्यांचा आर्थिक प्रश्न सुटला. या रकमेतून त्यांनी व्यवसायासाठी कच्चा घाणा, करडी दाळ मशीन, ऑईल फिल्टर, बॉयलर इ. यंत्र खरेदी केले.

**स्वतःचा ब्रँड केला विकसित**

शुभ्रा इंडस्ट्रिज मार्फत त्यांनी 'फार्म्स ओश' नावाचा बँड त्यांनी विकसित केला. नांदेड व नांदेड बाहेरील अनेक कुटुंब या लाकडी घाण्याच्या तेलास प्राधान्य देत आहेत. तेल निर्मिती कशी करता, प्रमाण काय असते याबाबत संदीप बेहरे सांगतात, घाण्यातून तेल काढण्यासाठी १५ किलो शेंगदाणे ११० रुपयेप्रमाणे विकत घेतले तर त्यापासून जवळपास ७ किलो तेल तयार होते. शेंगदाणा तेल ते २९० रुपयेप्रमाणे विक्री करतो. तेलबियांपासून तेल बनविल्यानंतर उर्वरित राहिलेल्या पदार्थापासून जनावरांना खाण्यासाठी खल्ली (पेंड) तयार केली जाते. पेंड ४० रुपये किलोप्रमाणे विक्री होते. म्हणजेच तेलासोबत पेंडीच्या विक्रीतूनही उत्पन्न मिळते. या व्यवसायाच्या माध्यमातून इतर ४ जणांना रोजगारही मिळाला आहे. बेहरे यांनी उद्योग उभारणीसाठी यशाचे श्रेय हे मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेस देऊन महाराष्ट्र शासनाचे त्यांनी आभारही मानले आहेत.

कोणते घ्यावे, कुठून घ्यावे याबाबत माहिती मिळविली. कच्चा माल दर्जेदार उपलब्धतेसाठी शेतकऱ्यांना भेटी घेतल्या. शेतकऱ्यांचा कच्चा माल जागेवरच खरेदी केला. व्यापाऱ्याची मध्यस्थी न ठेवता थेट शेतकऱ्यांपासून कच्चा माल खरेदी केल्यामूळे शेतकऱ्यांना फायदा झाला. उद्योग उभारताना जागेच्या उपलब्धतेसाठी आलेल्या अडचणीवर मात करून बेहरे यांनी आपला हा उद्योग उभा केला.

**सीएमईजीपीचा झाला फायदा**

संदीप बेहरे यांनी अगोदरच व्यवसायात स्वतः जवळचे पैसे गुंतविलेले असल्यामुळे, त्यांना व्यवसायाच्या विस्तारीकरणासाठी आर्थिक चणचण भासत होती. मात्र त्यांनी हार मानली नाही. यातून मार्ग काढत मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र नांदेड कार्यालयास त्यांनी संपर्क साधला. जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून स्टेट बँक ऑफ इंडिया, गुरुद्वारा शाखा, नांदेड यांच्याकडून व्यवसाय विस्तारीकरणासाठी कर्ज घेतले. या


**रोजगार निर्मितीसाठी सरकारचे प्रयत्न**

राज्याच्या विकासाला चालना मिळवी यासाठी राज्य शासनाच्यावतीने अनेक लोककल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. जास्तीत जास्त युवक-युवतींना रोजगार उपलब्ध होवून ते आत्मनिर्भर व्हावेत, त्यांचे स्वयंरोजगार प्रकल्प शासनाच्या आर्थिक सहाय्यातून उभारणीसाठी आर्थिक पाठबळ मिळावे यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना लाभदायक आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यात हजारो उद्योजकांना कर्ज मंजूर करण्यात आले आहेत.





*मा.श्री.संजय देगांवकर, उद्योग सह सचिव, उद्योग विभाग यांनी एमसीईडीचे मुख्यालय छत्रपती संभाजी नगर येथे भेट देऊन या ठिकाणी सुरू असलेल्या १८ दिवसीय निवासी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रमास (REDP) भेट दिली. यावेळी त्यांनी सीएमईजीपी योजनेची माहिती दिली व या योजनेत जास्तीत जास्त अर्ज करण्याचे आवाहन उपस्थित लाभार्थींना केले . यावेळी मा.श्री.डी.एन.भडकवाड, सहमहाव्यवस्थापक, एमआयटीएल; मा.श्री. बी.टी.यशवंते, कार्यकारी संचालक, एमसीईडी तथा उद्योग सहसंचालक, श्री.स्वप्नील राठोड, महाव्यवस्थापक, जिऊके, छत्रपती संभाजीनगर, डॉ. अभिराम डबीर, मालमत्ता विभाग प्रमुख, एमसीईडी व प्रशिक्षणार्थी दिसत आहेत.*







**यशोगाथा : शिल्पकार संतोष पांडुरंग पाटेकर**

# शिल्पकलेतून समृध्दीकडे

**वाशिम जिल्ह्यातील एका छोट्याशा गावात जन्मलेले संतोष पाटेकर यांचे बालपण अत्यंत कष्टात गेले. लहानपणापासूनच चित्रकलेची आवड होती. ती जोपासण्यासाठी आर्ट टीचर डिप्लोमा हा अभ्यासक्रम पूर्ण केला. काही काळ शिक्षकाची नोकरी केली; पण मन रमत नाही. मग फोटोग्राफीही करून पाहिली. छत्रपती संभाजीनगर येथील प्रसिद्ध शिल्पकार सुनील देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिल्पकलेचे काम करण्याची आणि त्यातून खूप शिकण्याची संधी मिळाली. या अनुभवाच्या जोरावर स्वतःचा शिल्पकलेचा व्यवसाय सुरू केला. त्यास चांगला प्रतिसाद मिळत आहे.**

**- प्रतिनिधी**

मी शिल्पकार संतोष पांडुरंग पाटेकर. माझा जन्म वाशिम जिल्ह्यातील छोट्याशा विठोली या गावात झाला. १९९१ मध्ये मी दहावी तेथेच उत्तीर्ण झालो. माझी मोठी बहीण शोभाताईचे लग्न झाले. लग्नानंतर ताई व ताईचा परिवार औरंगाबादमध्ये स्थायिक झाला. लहान असताना मी लहान लहान शाडू मातीचे गणपती तयार करून विकायचो. माझं शिक्षण चालू असतानाच जेव्हा मी इ. १०वी उत्तीर्ण होऊन डॉक्टर बाबासाहेब नाईक चित्रकला महाविद्यालय, खामगाव येथे प्रवेश घेतल्यानंतर काही महिन्यांतच माझ्या वडिलांचे निधन झाले. वडिलांच्या निधनानंतर आमची आर्थिक परिस्थिती खूप खालावली. माझं शिक्षण सुरू असताना मला योग्य मार्गदर्शनही मिळत नव्हते. मी कॉलेजमध्ये असताना छोटासा व्यवसाय करायचो. जसे - बसस्टॉप, रेल्वे स्टेशनमध्ये जाऊन स्केचेस विकायचो. मला पुढील शिक्षणासाठी जे जे स्कूल ऑफ आर्टमध्ये नंबर लागला होता; परंतु मी जाऊ शकलो नाही. मी छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे सुभेदार रामजी आंबेडकर या शाळेमध्ये चित्रकला शिक्षक म्हणून नोकरी केली; परंतु मला हेही काम काही आवडेना आणि ते शिक्षकपद सोडून मी फोटोग्राफीकडे वळलो. जवळपास एक वर्ष मी फोटोग्राफर म्हणून काम केले; पण त्यातही माझे मन रमेना.

स्केचेस, फोटोग्राफी, शिक्षक अशी कामे करताना माझी काही मित्रांशी ओळख झाली आणि त्यातल्याच माझ्या एका मित्राने माझे स्केचेस पाहिले. माझ्या केलेल्या काही शिल्पकला आणि चित्रकला पाहून तो मला औरंगाबाद येथील सुप्रसिद्ध शिल्पकार सुनील देवरे यांच्याकडे घेऊन गेला आणि माझी ओळख त्यांच्याशी करून दिली. त्यांची शिल्पे पाहून मला शिल्पांची आवड जास्त निर्माण झाली, त्यानंतर मी सुनील देवरे सरांसोबत काम केले आणि मी स्वतः शिल्पकलेत खूप रमलो. लहान असताना जसं की मला चित्रकलेची व शिल्पकलेची आवड होती. ही आवड अधिकच घट्ट झाली आणि शिल्पकार सुनील देवरे सर यांच्या मार्गदर्शनाखाली मी काम केले. काम करता करता मला नवीन काही कल्पना सद्धा सुचत होत्या; परंतु मला शिल्पकामाव्यतिरिक्त इतर कामे जास्त करावी लागत होती; कारण मला हवे तसे मानधन मिळत नव्हते. मी रोज सकाळी उठून छोट्या मूर्त्या तयार करून शाळेसमोर १०-२०-५० अशा किमतीत विकायचो.

सुनील देवरे सरांचाही माझ्या कामावरचा विश्वास वाढला आणि हे सर्व पाहून माझं मन एकदम आनंदी झालं होतं. एकंदरीत काम चांगले चालले होते. आता आई इथे माझ्याजवळ असल्याकारणाने माझ्या कामाची मिळालेली रक्कम आईजवळ द्यायचो; जेणेकरून माझ्याकडून काही वायफळ खर्च होऊ नये. तसे पैसे आईजवळ दिले की आई बरोबर बचत करायची.

२००३ मध्ये निश्चितच राहण्यासाठी स्वतःचे घर आवश्यक वाटत होते. आमच्या कॉलनीत असलेलं एक सिडकोचं घर विक्रीला होतं. ते आईला कळले. मग आम्ही घर विकत घेण्यासाठी चर्चा केली. तेव्हा त्या घराची किंमत १ एक लाख ५० हजार इतकी होती आणि तेव्हाच्या परिस्थितीत तेवढे जास्त होते. मग आमच्या मनात एक प्रश्न आला की एवढ्या पैशाची व्यवस्था कशी करायची, तरी माझ्या आईने अर्धे पैसे बचत करून ठेवले होते. आता प्रश्न फक्त उर्वरित अर्ध्या पैशांचा होता. मग आई म्हणाली की, 'तू तुझ्या साहेबांच्या कानावर ही गोष्ट टाक'. दुसऱ्याच दिवशी मी कामावर गेल्यानंतर आमच्या साहेबांशी भेटलो आणि त्यांना घर घेण्याविषयी माहिती दिली. त्यांना मी आर्थिक मदतीची मागणी केली. साहेबांनी हे सर्व ऐकून त्या विक्री असलेल्या घराची जागा पाहायला आले आणि त्यांनी लगेच होकार दिला. साहेबांनी रु. ४०,००० इतकी मदत केली. बाकीचे रु. १,१०,००० आमच्याजवळ रक्कम होतीच. सर्व

रक्कम एकत्र करून आम्ही ते घर खरेदी केलं. नवीन घर घेतल्याचा आनंद आसमंतात मावत नव्हता.

घर घेतल्यानंतर जबाबदाऱ्याही खूप वाढल्या होत्या. आता उत्पन्न वाढले तरच रक्कम फेड करता येईल अन्यथा अवघड होईल म्हणून मी हळूहळू छोटी-छोटी कामे करायला सुरुवात केली. जसे - मोमेंटो, ट्रॉफी इत्यादी तयार करून विकण्याची कामे मी करत होतो. संध्याकाळी कामावरून घरी आल्यानंतर मी ती मोमेंटो, ट्रॉफी ची कामे करत होतो. मला आई सुद्धा त्यात मदत करत होती. असे करत करत रक्कम फेड केली. २००४ साली माझे लतासोबत लग्न झाले.

काही दिवसांत आमच्या साहेबांचे मुंबईला जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये शिल्पकलेचे प्रदर्शन होणार, यासाठी तयारी चालू होती. वेगवेगळ्या प्रकारचे शिल्प साहेब तयार करत होते. तयार झाल्यानंतर त्या शिल्पकृती पॅकिंग करून मुंबईला घेऊन निघालो. तेव्हा मुंबई मी पहिल्याच वेळेस पाहत होतो. उद्घाटनासाठी आलेल्या प्रमुख पाहुण्यांनी कलाकृत्या पाहिल्या. प्रसन्न वातावरण होते, माझा उत्साहही वाढलेला होता. हे सर्व घडल्यानंतर मलाही माझ्या शिल्पकृत्या प्रदर्शित करावे असे वाटत होते.

मी औरंगाबादला आल्यानंतर मी स्वतः नवनवीन कलाकृत्या तयार करण्याची तयारी सुरू केली. नवीन कलाकृत्या तयार करण्यासाठी आवश्यक रकमेसाठी ओव्हरटाईम काम करत होतो. त्यातून येणारे पैसे आईजवळ बचतीसाठी देऊ करत होतो.

जेव्हा कधी एखादी नवी कल्पना सुचली की लगेच त्यासाठी लागणारे साहित्य घेऊन नवीन शिल्पकृत्या तयार करत होतो. शिल्पाकृती तयार करण्यासाठी शाडू माती, काथ्या, फायबर, रेझिन, लोखंडी तार, टूल्स इत्यादी साहित्य आवश्यक असतात. नवनवीन शिल्पे तयार करत असताना माझी आई आणि माझी पत्नी दोघेही मला सहकार्य करायचे. मग मी ग्राहकाच्या मागणीप्रमाणे शिल्पे तयार करून विकण्यास सुरुवात केली. मला हळूहळू एकामागे एक नवीन शिल्प तयार करण्याच्या ऑर्डर येऊ लागल्या. जसे - देव-देवतांच्या, थोर पुरुषांच्या, संत-महात्म्यांच्या शिल्पाकृती तयार करून देणे. अशी कामे मी करत होतो. कामे करून त्या कामातून मिळालेल्या रकमेने मातीच्या मूर्त्या, दगडाच्या मूर्त्या तयार करण्याचे साहित्य मी विकत घ्यायचो. जसे - ग्राइंडर मशीन, ड्रिल मशीन, टूल्स इत्यादी. आता बरीच नवनवीन कामे यायला लागली. रात्री उशिरा ११ वाजे पर्यंत मी शिल्प तयार करायचो. आता काम करण्यासाठी जास्त जागेची गरज भासली. मग दुसऱ्या ठिकाणी जागा घेऊन तिथे सुद्धा मूर्तिकामाला सुरुवात केली. आता या वेळेस धातूंच्या सुद्धा मूर्त्या तयार करायला लागलो होतो. मग सोबत २ कारागीर मी हाताखाली ठेवले. अशीच काही वाटचाल चालू होती माझ्या शिल्पकलेच्या व्यवसायाची.

२०१० साली मला स्वतः चा स्वतंत्र व्यवसाय सुरू करण्याची इच्छा झाली. म्हणून मी आधीचे काम सोडून दिले आणि स्वतःचा नवीन शिल्पकलेचा व्यवसाय सुरू केला. योगायोग हर्षा अण्ड संजय सलोनचे मालक संजय इंगळे साहेबांशी भेट झाली. त्यांनी माझी कला पाहून पहिल्याच शिल्पाची ऑर्डर दिली. त्यानंतर एम.जी.एम. मध्ये बसाल्ट कार्निंग वर्कशॉप यामध्ये सहभाग घेतला. त्या प्रदर्शनात माझ्यासोबत ३ शिल्पकार ३ चित्रकार सहभागी होते. ते प्रदर्शन ३ दिवस चालले. त्यात चांगला प्रतिसाद मिळाला. २०१२ मध्ये मुंबई येथे सुप्रसिद्ध चित्रकार घनशाम गुप्ता सर यांच्याकडून आयोजित जी-२१ आर्ट फाउंडेशनमध्ये पुन्हा प्रदर्शनात सहभाग घेतला. त्यामध्ये सुप्रसिद्ध चित्रकार घनशाम गुप्ता साहेबांचे मार्गदर्शन मिळाले. मग या प्रदर्शनातून चांगला प्रतिसाद मिळाला. त्यानंतर व्यवसायात वाढ झाली. मग व्यवसायासाठी नवे शॉप भाड्याने घेतले. माझा संपर्क काही आर्किटेक्टसोबत झाला. त्यातून मला काही इंटेरियरचीही कामे मिळायला लागली. २०१३ नंतर विविध प्रदर्शनात सहभाग घेतला. २०१३ मध्ये जनरेशन आर्ट फाउंडेशनमध्ये अनटायटल्ड एक्जीबिशन प्रोझोन मॉल, २०१४ मध्ये यशवंत कला महाविद्यालय येथे रुजवा आर्ट एक्जीबिशन, सोबतच पतंजली आयुर्वेद, भोज रेस्टॉरंट, उस्कॉन एम.जी.एम., इस्कॉन म्हैसमाळ, नरेंद्र खिंवसरा यांचे अलाइन कंपोनेंट्स, वेरूळ आणि बाहेर राज्यातील कामे सुरू होती. २०१६ मध्ये पुन्हा जनरेशन आर्ट फाउंडेशन, २०१७ ला एम. जी.एम. मध्ये कलादीर्घ असेच काही प्रदर्शनांत मी सहभाग घेतला. माझ्या मिळालेल्या यशाचा आनंद माझ्यापेक्षा जास्त माझ्या आईला व्हायचा. आई मला नेहमी सकारात्मक विचाराने मार्गदर्शन करायची. सर्व काही व्यवस्थित सुरू असतानाच २०१७ मध्येच आईचे निधन झाले. आई मला नेहमी यशाचा मार्ग व्यवस्थित दाखवायची. तिच्या सकारात्मक विचारामुळेच आज मी या यशाचा पायऱ्या चढल्या. काही काळ उलटताना कलेच्या उपक्रमामुळे माझ्या मनात नवचैतन्य निर्माण झाले. पुढे २०१८ मध्ये कलाउत्सव, कारवा आर्ट एक्जीबिशन, इनवेंशन आर्ट शो, २०२२ मध्ये जहांगीर आर्ट गॅलरी मुंबई येथे वाईब्रेशन आर्ट एक्जीबिशन मध्ये सहभाग घेतला.

वर्तमानात माझ्या या शिल्पकलेच्या प्रवासात प्रत्यक्षरीत्या ज्यांनी मला सहकार्य केले, त्यांचा मी मनःपूर्वक आभारी आहे. सर्वांचीच माया आम्हांवर असू दे. अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. या संघर्षात पुढे नवनवीन कलाकृती कायम राहण्यासाठी संघर्ष चालूच आहे. मला पूर्ण विश्वास आहे माझी कला अजून पुढे यशाच्या शिखरापर्यंत पोहोचेल. माझ्या या संघर्षात माझी पत्नी, माझा मोठा मुलगा, लहान मुलगी तिघेही मला खूप सहकार्य करतात. वर्तमानात माझं असं मत आहे की, प्रत्येकाने आपली कला जोपासली पाहिजे. जसे - हस्तकला, शिल्पकला, चित्रकला, संगीत, वादन इत्यादी. कलेच्या जोरावर आपली स्वतःची ओळख निर्माण करण्याची आणि विविध क्षेत्रांत सादर करण्याची वर्तमानात खूप गरज आहे. जर एखाद्या व्यक्तीमध्ये कला असेल तर कलेच्या जोरावर ती व्यक्ती व्यवसाय करू शकते. मायकल अँजेलो, एम.एफ. हुसेन, लिओनार्दो द विंची, ऑगेस्टे रोहडीन, राजा रवी वर्मा, एस.एम. पंडित इत्यादींचा आदर्श आपल्याला त्यांच्या कलाकृतींमधून आणि विविध पुस्तकांमध्ये वाचायला मिळतो. आपल्या भारतातील काही वास्तू जसे अजंठा, एलोरा, ताजमहाल, छ. शिवाजी महाराजांचे किल्ले इत्यादमधून सुद्धा आपल्याला वेगवेगळ्या कलांचा आदर्श मिळतो. उत्कर्ष कायमस्वरूपी टिकवण्यासाठी आपल्या कामात सातत्य, चिकाटी, मेहनत, संघर्ष करावे लागते. आपली कला, आपल्या आवडीनुसार उद्योगाच्या संधी उपलब्ध निर्माण होतात. ■■



यशोगाथा : पिराजी जाधव, इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर

# इलेक्ट्रीकल व्यवसायाने उजळले जीवन!

**पुणे जिल्ह्यातले पिराजी जाधव यांनी लहानपणापासूनच संघर्ष पाहिला. बालपणी काकड्या, मक्याची कणसे घरोघरी विकले. एम.ए. इकॉनॉमिक्स आणि इलेक्ट्रिकल डिप्लोमाचे शिक्षण घेतल्यावर घरगुती इलेक्ट्रिकलची कामे सुरू केली. तळेगाव दाभाडे येथे इलेक्ट्रिकलचे दुकान सुरू केले. या काळात मुंबईत एका घराच्या इलेक्ट्रिकचे काम मिळाले. ते यशस्वीपणे पूर्ण केले. हळूहळू बदलापूर एमआयडीसीतील इलेक्ट्रिकलची कामं मिळू लागले. कष्ट आणि सातत्य याच्या जोरावर व्यवसायात प्रगती झाली. स्वतःची घरे, दुकाने, गाडी आणि शेती विकत घेतली. स्वधर्म फाउंडेशनच्या माध्यमातून सामाजिक कार्यातही अग्रेसर आहेत. थोड्याशा अपयशाने खचून जाणाऱ्यांसाठी पिराजी जाधव यांची यशोगाथा नक्कीच प्रेरणआदायी आहे. - डॉ. उमेश कणकवलीकर**

मी पिराजी पार्वताबाई तुकाराम जाधव. माझा जन्म १ नोव्हेंबर, १९८० रोजी झाला. माझे मूळ गाव सांगवी, मावळ, पुणे. माझे बालपण खडतर अवस्थेत गेले. माझे वडील शेती करायचे; पण शेतीतून पुरेसे उत्पन्न येत नव्हते. त्यात आम्ही एकूण पाच भावंडं होतो. पैशांअभावी माझे वडील तळेगाव-दाभाडे येथे लोकमान्य टिळकांनी स्थापन केलेल्या पैसा फंड काच कारखान्यात तुटपंज्या पगारावर कामाला जायचे. ते फावल्या वेळात वॉचमनचे काम करायचे. कधीकधी मी त्यांच्या जागेवर रात्रपाळीला जायचो. मी पाठीवर शाळेची बॅग घेऊन, टोपलीभर काकडी, मक्याची कणसे डोक्यावर वाहून घरोघरी जाऊन विकायचो. मी अभ्यासात हुशार होतो. मी एमए (इकॉनॉमिक्स), तसेच इलेक्ट्रिकल डिप्लोमाचे शिक्षण घेतले आहे.

इलेक्ट्रिकल कामकाजात नुसते पुस्तकी ज्ञान असून उपयोग नव्हता, तर प्रत्यक्ष कामाचा अनुभव महत्त्वाचा होता. मी शिक्षणासोबत इलेक्ट्रिकलची घरगुती कामे करू लागलो. त्यातून मला पैसे मिळू लागले. ते पैसे जमवून मी भाडेतत्वावर एका पत्र्याच्या स्टॉलमध्ये इलेक्ट्रिकल वस्तू विकू लागलो.

### पुस्तक भेट

एक दिवस मी अचानक डॉ. उमेश कणकवलीकर सरांना भेटलो, त्या काळात सर तळेगाव-दाभाडे येथील विशाल-विहार सोसायटीमध्ये रहात होते. 'मी विजेता होणारच!' या कार्यक्रमाचा उगम याच ठिकाणी झाला. सर कधी मुंबईला, तर कधी तळेगाव-दाभाडे येथे रहायचे. मी सरांचा पहिला कार्यक्रम रामकृष्ण मोरे सभागृह, चिंचवड येथे पाहिला. तो माझ्या जीवनातील टर्निंग पॉइंट ठरला. स्वप्नं पहायची असतात, लिहायची असतात, टप्प्या-टप्प्यात ती साकार करायची असतात, संकटांवर मात करून ती पूर्ण करायची असतात, हे सर्व मी सरांच्या कार्यक्रमातून आणि पुस्तकातून सातत्याने शिकत राहिलो. मी मोठी स्वप्नं पहायला लागलो. मला सरांचे मार्गदर्शन मिळू लागले. त्यामुळे मी एक मोठे पाऊल उचलले, ते म्हणजे तळेगाव-दाभाडे स्टेशनच्या बाहेर मी इलेक्ट्रीकलचे मोठे दुकान उभारले. त्या दुकानाचे उद्घाटन मी सरांच्या शुभ हस्ते करून घेतले. त्या प्रसंगी दै. सकाळचे संपादक, श्री. उद्धव भडसाळकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी माझी ही यशोगाथा वृत्तपत्रामध्ये प्रकाशित केली. त्यामुळे माझे मन प्रज्ज्वलित झाले.

मी झपाटल्यासारखा काम करू लागलो. दरम्यानच्या काळात सरांनी मला एक मोठे आव्हान स्वीकारण्यास प्रोत्साहित केले. सरांनी माझ्यावर त्यांच्या मुंबईच्या मोठ्या घराचे इलेक्ट्रीकचे संपूर्ण काम करण्याची जबाबदारी सोपवली. मी गावपातळीवर काम केलेला एक ग्रामीण तरुण होतो. मला शहरात काम करण्याचा काहीच अनुभव नव्हता; पण सरांनी अक्षरशः जोखीम पत्करून माझ्यावर विश्वास दर्शवला. मीही त्यांचे काम उत्तमरीत्या पार पाडले. यातून सरांनी मला शिकवण दिली की, मी गावाबाहेर पडून शहरातील कामेही स्वीकारली पाहिजेत, जेणेकरून मला भरघोस उत्पन्न कमवता येईल. मीही ठरवलं की, मी शहरात जाऊन काम करणारच! मी विजेता होणारच!

त्याच काळात कृष्णनगरी सोसायटीमध्ये मी आणि माझे वडील वॉचमनचे काम करायचो. तिथले रहिवासी श्री. माधव उकिरवे यांनी मला त्यांचे बदलापूर शहरातील घर विकत घेण्यासाठी प्रोत्साहित केले. या नामी संधीचा मी फायदा घेतला. श्री. बबनराव भेगडे यांच्या सहकार्यामुळे मला गृहकर्ज मंजूर झाले होते. मी बँकेतून गृहकर्ज घेतले आणि माझ्या मालकीचे शहरातील पहिले घर घेतले. तिथेच मी 'सोनल इलेक्ट्रीकल एंटरप्रायझेस'

नावाचे एक दुकान उभारले. बदलापूर गावाचे रुपांतर शहरामध्ये होत होते. मला एमआयडीसी बदलापूर येथील कामे मिळू लागली. प्रामाणिकपणे काम केल्यामुळे माझा उद्योग प्रगतीपथावर आगेकूच करू लागला. मी माझ्या पत्नीसोबत बदलापूर येथे रहायला गेलो. पाहता पाहता ज्या इमारतीत मी राहत होतो, तिथे मी आणखी एक घर घेतले. दुसरे घर मी भाडे तत्वावर दिले. त्यातून मला उत्पन्न येऊ लागले. मी कर्जमुक्त झालो. एका घराच्या माध्यमातून दुसरे घर झाले. इतकेच नाही, तर एका दुकानाच्या माध्यमातून मी दुसरे दुकानही उभारले. माझ्या दुसऱ्या दुकानाचे नाव 'मुग्धा एंटरप्रायझेस' आहे. पूर्वी माझ्याकडे मोटरसायकलसुद्धा नव्हती; पण आज माझ्याकडे दोन कार आहेत. आमच्या घरामध्ये आमचे छोटेखानी ग्रंथालय उभारले आहे. आता लवकरच आमची बिल्डिंग रीडेव्हलपमेंटला जात आहे. त्यामुळे आम्हाला दोन्ही घरांमध्ये एक्स्ट्रा रुम मिळणार आहे.

माझ्या यशात सरांचा सिंहाचा वाटा आहे. मी आणि माझी पत्नी सरांच्या सोबत 'मी विजेता होणारच!' कार्यक्रमाच्या दहा दिवसांच्या दौऱ्यावर गेलो होतो. त्या काळात सर स्वतःच ड्रायव्हिंग करायचे, एकपात्री कार्यक्रम करायचे, दुकानांमध्ये स्वतःच्या प्रकाशनाच्या पुस्तकांचे वितरण करायचे, जनसंपर्क वाढवायचे, इतकेच नव्हे, तर व्यायाम करायचे, गाडी धुवायचे. हे सर्व पाहून आम्ही उभयता खूप प्रेरित झालो. सर माझे प्रेरणास्थान आहेत. या दौऱ्यादरम्यान समोरून येणाऱ्या वाहनाने आमच्या गाडीला धडक दिली. गाडीचे मोठे नुकसान झाले नाही; पण सरांच्या उजव्या बाजूची काच फूटली. गाडीत काचांचा खच जमा झाला. सरांच्या संपूर्ण शरीरावर काचा उडाल्या होत्या. सरांच्या उजव्या बाजूच्या चेहऱ्यामध्ये काचा रुतल्या होत्या. चेहऱ्यातून रक्त वाहात होते. तशाच अवस्थेत सर कार्यक्रमाला उपस्थित राहिले. कार्यक्रम वेळेवर सादर झाला पाहिजे म्हणून सरांनी डॉक्टरकडे जाण्याचेही टाळले. कार्यक्रम संपल्यानंतर स्वतःवर उपचार केला आणि गाडीची दुरुस्ती केली. या प्रसंगाचा माझ्या जीवनावर कायमचा ठसा उमटला. आजही संकटसमयी तो प्रसंग आठवला की प्रेरणा मिळते.

कोणतीही सबब न देता, जबाबदारी स्वीकारून, हाती घेतलेले कार्य कोणत्याही परिस्थितीत तडीस नेले पाहिजे याची जाणीव होते. सरांना दिवस-रात्र कष्ट करताना मी पाहिले आहे. म्हणतात ना, यशस्वी व्यक्तींचे यश दिसते; पण त्यांचा संघर्ष दिसत नसतो.

माझ्या वडिलांकडे पाच एकर शेती होती; पण घरगुती जबाबदाऱ्यांमुळे त्यांना तीन एकर जमीन विकावी लागली. तेव्हा मला खूप दुःख झाले. आता उर्वरित दोन एकर जागा आहे. त्याच वेळेस मी संकल्प केला की, एक दिवस मी चांगल्या ठिकाणी मोठी जागा विकत घेणारच! अलीकडेच मी भीमाशंकर डोंगराच्या पायथ्याशी, खांडी धरणाच्या जवळ एक एकर जमीन पंचवीस लाखाला विकत घेतली. या किमतीत एक छोटेसे घर घेण्यापेक्षा मी मोठी जागा विकत घेतली. एका मोठ्या जागेचा मी मालक झालो याचा मला आनंद होत आहे. मी ठरवले होते की, माझ्या आईवडिलांच्या हयातीत आमच्या गावच्या घराचा जीर्णोद्धार करायचा. तेही काम आता सुरू झाले आहे. त्यामुळे माझे आई-वडील माझ्या प्रगतीवर आनंदी आहेत. आता माझे आई-वडील वृद्धापकाळाचा आनंद घेत आहेत.

मी 'स्वधर्म फाउंडेशन'च्या माध्यमातून समाजकार्य करत असतो. श्री. तन्मय चव्हाण हे या संस्थेचे अध्यक्ष आहेत आणि मी सचिव म्हणून काम संभाळतो. या माध्यमातून आम्ही वृक्षारोपण, लहान मुलांना स्वसंरक्षणाचे धडे देणे इत्यादी समाजसेवेची कामे करतो. मला ट्रेकिंगचा छंद आहे. मी आजवर ११६ गड-किल्ल्यांवर गिर्यारोहण केले आहे. माझ्या जीवनात मी ३५० गड सर करण्याचा संकल्प केला आहे. ज्यांनी ज्यांनी मला जीवनामध्ये मदत केली, त्या सर्वांच्या मी आजही संपर्कात आहे. मला मानवी स्नेहसंबंध जोपासायला आवडतात. माझ्या पत्नीचे नाव सौ. कृतिका आहे. तिने मला माझ्या जीवनात सुख-दुःखात पदोपदी साथ दिली. कृतिका माझे दुसरे दुकान संभाळते. तसेच ती ब्युटीपार्लरही चालवते. ती एक पदवीधर स्वयं- उद्योजिका आहे. आम्हाला दोन मुले आहेत. माझ्या मोठ्या मुलीचे नाव राजेश्वरी आहे; पण तिला लाडाने आम्ही मुग्धा म्हणतो. ती दहावीला आहे. माझा मुलगा रुद्र सातवीत शिकत आहे. माझी दोन्ही मुले इंग्रजी माध्यमात शिकतात.

मातीच्या गोळ्याला आकार देऊन त्यातून यशस्वी माणूस घडवण्याचे कार्य सरांच्या हातून अखंडित होत आहे, याचा मला सार्थ अभिमान आहे. मला विजेता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यामुळे मला एक प्रेरणा मिळाली आहे. 'मी विजेता होणारच!' हा गुरुमंत्र एखाद्या तारकमंत्राप्रमाणे जीवनात पदोपदी उपयुक्त ठरतो. जेव्हा संकटं येतात, तेव्हा 'मी विजेता होणारच!' हे तीन शब्द आपल्यात नवचैतन्य जागृत करतात, जगण्याची आणि जिंकण्याची ऊर्जा देतात. मी शपथ घेतो की, संकटं कितीही आली तरी मी थांबणार नाही. त्या संकटांच्या ढिगाऱ्यावर उभा राहीन आणि मी माझ्या ध्येयसिद्धीची वाटचाल करतच राहीन. मी विजेता होणारच! जय महाराष्ट्र! जय भारत.

*(या मुलाखतीचे शब्दांकन करणाऱ्या लेखकाची २५ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. तसेच त्यांनी आजवर मी विजेता होणारच! या कार्यक्रमाचे ३५०० हून अधिक प्रयोग सादर केले आहेत. आर्ट ऑफ विनिंग नावाने ते प्रशिक्षण देतात. ते नामांकित कंपन्यांचे प्रशिक्षक आहेत. त्यांनी सामाजिक बांधीलकीतून पुणे येथे शिष्यकुल या संस्थेची उभारणी केली आहे. त्यांचा e-mail : nishamissionvijeta@yahoo.com असून त्यांचे भ्रमणध्वनी ९८२०२९२०७२ / ९०२९३७३१११ आहेत.)*



*नाशिक एमसीईडी विभागाची आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मा. उद्योग सहसंचालक श्री. सतीश शेळके व व्यवस्थापक श्री. दिलीप पाटील उपस्थित होते. शासकीय योजनांचा प्रचार प्रसार पंधरवड्यात एमसीईडी नाशिक विभागातील सर्वांनी उत्कृष्ट कामगिरी केली व CMEGP लोन केसेसमध्ये नाशिक विभागाने चांगले काम केल्याबद्दल श्री. शेळके सरांनी सर्वांचे धन्यवाद व्यक्त केले. यावेळी विभागातील सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.*

पहिल्या टप्प्यात १९३ स्थानकांचे सौंदर्यीकरण, ६०० कोटींचा करार

# एमआयडीसी करणार एसटी स्टँडचा कायापालट



**राज्यातील दळणवळण व्यवस्थेची जीवनवाहिनी म्हणून ओळख असलेली लालपरी म्हणजेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसस्थानकांचा लवकरच कायापालट होणार आहे. विशेष म्हणजे याची जबाबदारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) घेणार असून यासाठी दोन्ही महामंडळात नुकताच ६०० कोटींचा सामंजस्य करार करण्यात आला. पहिल्या टप्प्यात १९३ बसस्थानकांची दुरुस्ती व सौंदर्यीकरण केले जाईल.** **- प्रतिनिधी**

रस्ते प्रवासी वाहतूक या व्यवसायाचे नागरिक जीवनमानाशी असलेले अतूट नाते लक्षात घेवून केंद्र शासनाने रस्ते परिवहन महामंडळ कायदा १९५० पारीत केला. या अंतर्गत प्रत्येक राज्यात एक स्वतंत्र रस्ते प्रवासी वाहतूक महामंडळ कार्यान्वित करण्याची तरतूद केली. त्यास अनुसरून राज्यातील नागरिकांकरीता सूसुत्र, किफायतशीर, गतीमान व कार्यक्षम रस्ते प्रवासी वाहतूक सेवेचे जाळे निर्माण व्हावे याकरीता महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची निर्मिती केली. एसटीचे मध्यवर्ती कार्यालय, ३१ विभागीय कार्यालये, ३ मध्यवर्ती कार्यशाळा, २५० आगारे, ३ प्राशिक्षण केंद्र, ९ टायर पुनःस्तरीकरण केंद्र, ५६८ बसस्थानके, ३६३९ प्रवाशी निवारे व सुमारे १,०४००० कर्मचारी वर्ग अशी अवाढव्य यंत्रणा निर्माण आहे. महाराष्ट्र शासनाने राज्यातील नागरिकांना कार्यक्षम दळणवळण सुविधा निर्माण व्हावी याकरीता, गाव तेथे रस्ता व रस्ते तेथे एसटी, असे धोरण महामंडळाने अंगिकारलेले आहे. 'बहुजन हिताय व बहुजन सुखाय' हे ब्रीदवाक्य घेत एसटी राज्याच्या विकासात मौलिक वाटा आहे.

**मुख्यमंत्र्यांचे आवाहन, एमआयडीसीचा प्रतिसाद :** राज्यातील सर्वसामान्यांची जीवनवाहिनी असणाऱ्या एसटी बस सेवेतील महत्त्वाचा घटक असलेल्या बसस्थानकांचा कायापालट करण्यात एमआयडीसीने योगदान द्यावे, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले होते. त्यास प्रतिसाद देत एसटी महामंडळ व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बस स्थानक अभियानांतर्गत राज्यातील १९३ बसस्थानकांचे सौंदर्यीकरण व सुशोभिकरणासाठी ६०० कोटी रुपयांचा सामंजस्य करार करण्यात आला. विधानभवन येथे झालेल्या या कराराप्रसंगी उद्योगमंत्री तथा एमआयडीसीचे अध्यक्ष उदय सामंत, परिवहन विभागाचे प्रधान सचिव पराग जैन-नैनोटीया, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विवेक भीमनवार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे व एसटीचे वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित होते.

**६०० कोटींचा खर्च :** राज्यभरात एसटीची ६०९ बसस्थानके आहेत. त्यापैकी सध्या ५६३ बसस्थानके कार्यरत आहेत. बसस्थानक परिसरातील खड्डे, पावसाळ्यात पाणी साचून होणारा चिखल यामुळे प्रवाशांना अडचणीचा सामना करावा लागतो. एसटी बसेसचे देखील नुकसान होते. यावर कायमचा उपाय म्हणून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने आर्थिक मदत करावी, असे आवाहन शिंदे यांनी एसटीच्या अमृतमहोत्सवी समारंभात केले होते. त्याला प्रतिसाद म्हणून हा सामंजस्य करार करण्यात आला आहे. यानुसार पहिल्या टप्प्यात एमआयडीसी १९३ एसटी बसस्थानकांच्या कॉंक्रिटीकरणासाठी ५०० कोटी रुपये व रंगरंगोटी, किरकोळ दुरुस्ती करण्याची १०० कोटी रुपये खर्चाची निविदा प्रक्रिया राबविणार आहे. यातून लवकरच या सर्व बसस्थानकांचा कायापालट होणार आहे. एमआयडीसीच्या या प्रतिसाद आणि पुढाकाराने मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी कौतुक केले. राज्यातील लोकाभिमुख सुविधा आणि अग्रेसर अशा उद्योग विभागाचे नवे सहकार्य पर्व सुरु होणार आहे. यातून एक वेगळे उदाहरण पुढे आल्याचेही, त्यांनी नमूद केले.

**बीओटी तत्वावर गाळे बांधणार :** एसटीच्या उत्पनात वाढ व्हावी, यासाठी पहिल्या टप्प्यात राज्यातील प्रमुख ३० बसस्थानकांवर व्यावसायिक गाळे बांधून ते 'बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा' (बीओटी) तत्त्वावर देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महामंडळाने घेतला आहे. यासाठी सल्लागार समितीची नियुक्ती करण्यात येणार असून त्यानंतर टेंडर प्रक्रिया सुरु केली जाणार आहे. भविष्यात आणखीही काही बसस्थानके 'बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा' या तत्त्वावर देण्याची महामंडळाची योजना आहे. 'बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा' या तत्त्वावर जी बसस्थानके देण्यात येणार आहेत, त्या बसस्थानकांची प्रथम सल्लागार समितीकडून पाहणी करण्यात येणार आहे. यामध्ये बसस्थानकांवर गाळे बांधण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध आहे का, याची प्रामुख्याने पाहणी केली जाणार आहे. या पाहणीनंतर सल्लागार समिती महामंडळाला अहवाल सादर करेल.

**अमृत, महिला सन्मान योजनेमुळे नवसंजीवनी :** ७५ वर्षावरील नागरिकांना एसटीमध्ये मोफत प्रवास घडविण्याऱ्या 'अमृत मोफत प्रवास' योजना आणि महिलांना प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत देणाऱ्या 'महिला सन्मान' योजनांना राज्यात उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या योजनांमुळे राज्य परिवहन महामंडळाला जणू नवसंजीवनीच मिळाली आहे. या योजनांना मिळणाऱ्या प्रतिसादामुळे महामंडळाच्या तिजोरीत भरमसाठ वाढ होताना दिसून येत आहे.

## शासनाच्या उपक्रमांचा भक्कम पाठिंबा

# युवकांनो उद्योजक बना...

**नोकरीच्या चौकटीत अडकायचे नाही. स्वतःचा व्यवसाय सुरू करून वेगळा मार्ग निवडायचा, असे स्वप्न अनेक युवकांचे असते. मात्र व्यवसाय सुरू करायचा तर मदतीचा हाथ हवा असतो. मार्गदर्शन हवे असते, भांडवलाची व्यवस्था करायची असते. अशा वेळी युवकांनी स्वयंनिर्भरतेच्या मार्गावर चालण्यासाठी अनेक दीपस्तंभ मार्ग दाखविण्यासाठी तयार आहेत, याची माहिती या लेखातून देण्याचा प्रयत्न केला आहे.**

**- प्रतिनिधी**

### मैत्री

उद्योजकांना त्यांचे उद्योग-व्यवसाय प्रकल्प सुलभतेने साकारण्यासाठी राज्य शासनाने विशेष उद्योग-व्यवसाय सुलभता कक्ष मैत्री नावाने स्थापित केला आहे. हा कक्ष विकास आयुक्त (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली हा कक्ष कार्यरत आहे. या कक्षाच्या माध्यमातून १०५ सेवा उद्योजकांना ऑनलाइन आणि सिंगल विंडो पद्धतीने उपलब्ध केल्या आहेत. आता उद्योग सुरू करताना लागणाऱ्या विविध परवानग्या एकाच चत्रा खाली उपलब्ध झाल्या आहेत. तंत्रस्नेही नव उद्योजकांना तर सर्व प्रक्रीय ऑनलाइन करणे अधिक सुलभ झाले आहे. Maharashtra Investment and Trade Agency म्हणजेच मैत्री यांचे उद्देश स्पष्ट आहेत. राज्यात येणाऱ्या गुंतवणुकीला चालना देणे याच बरोबर उद्योग वाढीला चालना देणे. या पोर्टलच्या माध्यमातून वेळेत परवानग्या मिळणे सुकर झाले आहे. नव उद्योजक आणि गुंतवणूकदारांचे हॅण्ड होल्डिंग केले जाते. इज ऑफ डुईंग बिझिनेस अंतर्गत कमी झालेल्या परवानग्या एकत्रीतपणे इथे मिळतात. उद्योग सुरू करण्यासाठी लागणारी एकत्रीत माहिती मिळण्याचे ठिकाण म्हणजे मैत्री आहे.

मैत्री कक्षाद्वारे १ लाख ४६ हजार ५७८ इतक्या घटकांनी विविध परवाने व दाखले यासाठी प्रस्ताव सादर केले असून त्यापैकी १ लाख ४० हजार ६०२ म्हणजेच सुमारे ९६ टक्के परवाने ऑनलाइन पद्धतीने देऊन त्यांची गुंतवणूक सुलभतेने झाली आहे.

### कुठे संपर्क करावा?

संकेतस्थळः https://maitri.mahaonline.gov.in
टोल फ्रीः १८०० १२० ८०४० (Toll Free)
हेल्पलाइन क्रः १८६० २३३ २०२८

### महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळ

महाराष्ट्रामध्ये उद्योगांची शीघ्र व सुव्यवस्थित प्रस्थापना तसेच वाढ व्हावी, या हेतूंनी महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र औद्योगिक विकास विधी, १९६१ नुसार १ ऑगस्ट १९६२ रोजी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ उभारले आहे. राज्याच्या सर्व भागांचे सारख्या प्रमाणात औद्योगिकीकरण व्हावे व मुंबई-पुणे या औद्योगिक पट्ट्यामधील उद्योगसमूहांपासून उद्योगांचे विकेंद्रीकरण व्हावे, असे या महामंडळाच्या स्थापनेमागील दोन प्रमुख हेतू आहेत. यासाठी महामंडळ राज्यामध्ये शासनाने संपादन केलेल्या जागेवर सुनियोजित औद्योगिक क्षेत्रे स्थापणे व त्यांचा विकास करणे हे कार्य करते. खते, औषधे, ट्रक, स्कूटर, सायकली, घड्याळे, दूध शीतकरणाची इलेक्ट्रॉनिकीय उत्पादने, अन्नपदार्थ, शीतपेये, पशुखाद्ये, ओतशाळा इ. लहानमोठ्या उद्योगधंद्यांची या महामंडळाद्वारे उभारणी केली जाते. कारखान्यांसाठी निरनिराळ्या आकारांचे भूमिखंड पाडणे व छपऱ्या बांधणे, रस्ते, पाणीपुरवठा, वीज, निःसृत पाण्याची विल्हेवाट इ. अधःसंरचना उपलब्ध करणे व बँका, डाकघरे, दूरध्वनी इ. सामाईक सोयींची तरतूद करणे या प्रकारे औद्योगिक क्षेत्रांचा विकास केला जातो. तंत्रज्ञांना व

लघुउद्योजकांना तयार छपऱ्या वा गाळे पुरविणे व त्यांचे उपक्रम प्रस्थापण्यात मदत करणे या प्रकारे महामंडळ उत्तेजन देते. तसेच औद्योगिक कर्मचाऱ्यांसाठी घरे बांधणे, औद्योगिक व नागरी वृद्धीसाठी मोठ्या पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करणे आणि सरकारी व निमसरकारी अभिकरणांसाठी ठेव अभिदान तत्त्वावर प्रकल्प बांधणे इ. कामेही महामंडळ करते. औद्योगिक क्षेत्रातील भूमिखंड साधारणपणे ९९ वर्षांच्या पट्ट्याने दिले जातात. एका वर्षात कारखान्याच्या उभारणीला सुरुवात व दोन वर्षांत ती पुरी व्हावी, असा सर्वसाधारण नियम आहे. स्वयं-सेवायोजनेला उत्तेजन मिळावे या दृष्टीने तंत्रज्ञ, अभियंते वगैरेंना भाडे-खरेदी पद्धतीवर छपऱ्या/गाळे दिले जातात.

**कुठे संपर्क करावा :** https://www.midcindia.org

### महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी)

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी) ही संस्था राज्याच्या उद्योजकता विकासासाठी महाराष्ट्र शासनाने पुरस्कृत केलेली, उद्योग संचालनालयाच्या अंतर्गत स्वायत्त संस्था आहे. १९८८ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेचा हेतू शास्त्रोक्त प्रशिक्षणाच्या माध्यमातून उद्योजकीय संस्कृती रुजविणे व संवर्धन करणे; कौशल्य व प्रशिक्षणाच्या माध्यमातून मनुष्यबळ विकास, उद्योजकतेविषयक माहिती संकलन आणि या क्षेत्रात संशोधन करणे हा आहे.

संस्थेचे मुख्यालय छत्रपती संभाजीनगर येथे असून ९ विभागीय कार्यालये व ३६ जिल्हा कार्यालये आहेत. स्थापनेपासून आजतागायत संस्थेने अनेक उपलब्धी मिळविल्या आहेत. संस्थेला नावीन्यपूर्ण प्रशिक्षणासाठी २०२० चा स्कॉच पुरस्कार मिळाला असून २०१४ मध्ये मॅक्सेल अवॉर्डने गौरविण्यात आले आहे. संस्थेच्या अनेक वरिष्ठ प्रेरक प्रशिक्षकांना (प्रकल्प अधिका-याना) उद्योजकता प्रशिक्षण क्षेत्रातील शिखर संस्था ईडीआयआय, अहमदाबाद; विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, भारत सरकार यांच्यातर्फे उत्कृष्ट प्रेरक प्रशिक्षक' म्हणून गौरविण्यात आले आहे.

'उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम' प्रशिक्षण वर्गामध्ये प्रत्येक प्रशिक्षणार्थीच्या आशा, अपेक्षा त्यांचा प्रशिक्षणात प्रवेश घेण्यामागील हेतू समजाऊन घेतला जातो. त्यानंतर उद्योजकतेचा पर्याय का व कशासाठी यावर विचारमंथन, मार्गदर्शन केल्यावर उद्योग निवडीपासून उद्योग-व्यवसाय सुरू करण्यापर्यंतचे विविध टप्प्यांसंबंधी मार्गदर्शन केले जाते. याटप्प्यांमध्ये ज्यामध्ये उद्योगाची निवड, बाजारपेठ पाहणी, व्यवस्थापन, कर्मचारी, कच्चा माल, जागा, इमारत, तंत्रज्ञान, प्रकल्प अहवाल, विविध योजना, अर्थसाह्य, उद्योगाची अस्थायी नोंदणी यापासून उद्योग कसा सुरू करावा येथपर्यंत आणि सुरू झालेला उद्योग यशस्वीपणे कसा चालवावा येथपर्यंतचे मार्गदर्शन विविध तज्ज्ञ व्याख्याते, प्रकल्प अधिकारी, विविध संस्थांचे प्रतिनिधी यांच्या माध्यमातून करण्यात येते.

'उद्योजक' मासिक हे महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकाशन आहे. समाजाचे उद्योजकीकरण झाल्याशिवाय समाजाचे समृद्धीकरण होणे अवघड असते. समृद्ध समाजाचा, कुटुंबाचा, व्यक्तीचा सामाजिक आणि सांस्कृतिक विकास वेगाने होतो. या धारणेतून बहुविध मजकूर रंजक स्वरूपात वाचकांसमोर ठेवला जातो. या माहितीच्या आधारे वाचकांची मानसिकता उद्योजकतेकडे वळविण्यास मदत होते. मागील वर्षीच्या दिवाळी विशेष अंकाला मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मुंबई यांचा 'जगन्नाथ शंकरशेठ स्मृती सर्वोत्कृष्ट अंक' म्हणून 'उद्योजक' मासिकाला मिळाला असुन खासदार राहुल शेवाळे, मुंबई; मा.ज्ञानेश महाराव, संपादक, चित्रलेखा; रवींद्र मालुसरे, अध्यक्ष, मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मुंबई; श्रीमती शीला दिनकर साईल, आयपीएस, सहाय्यक पोलीस महानिरिक्षक, मुंबई तथा सर संपादक, दक्षता मासिक, मुंबई; श्रीमती शुभा कामथे, (प्र.कार्यवाह); ॲड. देवदत्त लाड, मराठी विचारधारा प्रतिष्ठान, मुंबई यांच्या शुभहस्ते संतोष बोर्डे, व्यवस्थापकीय संपादक 'उद्योजक' मासिक यांनी स्वीकारला.

**कुठे संपर्क करावा :** https://mced.co.in

### इतर अनेक खासगी संस्थाही देतात मदतीचा हात

अनेक चेंबर ऑफ कॉमर्स सारख्या खासगी संस्था या नवउद्योजकांना मदतीचा हाथ देत असतात. आपल्या जिल्ह्यातील अशा स्वयंसेवी संस्थांच्या संपर्कात येऊन व्यवसाय मार्गदर्शन घेता येऊ शकेल. उदाहरणादाखल काही संस्थांचा उल्लेख करता येईल. यात अनुसूचित जाती जमातीच्या उद्योजकांना मार्गदर्शन करणारे मिलिंद कांबळे यांची डिक्की (Dalit Indian Chamber of Commerce Industry), सुनील झोडे यांची इक्का (Indian Chamber of Commerce for Affirmative Action) या संस्थांचा उल्लेख करावा लागेल. महिला उद्योजकांना मार्गदर्शन करणारी मीनल मोहाडीकर यांची 'आम्ही उद्योगिनी' ही संस्था प्रशिक्षणासह महिला उद्योजिकांना एकत्रीत करण्याचे उत्तम कार्य करीत आहे. या प्रमाणे आपल्या जिल्ह्यातील यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन घेऊनही पुढे जाता येईल. इच्छा तर बाळगा. मार्ग नक्कीच सापडत जाईल.

### बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज तर्फे इन्क्युबेशन

शासनाच्या पुढाकाराने बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजच्या माध्यमातून आता लघु मध्यम उद्योजकांना भांडवल जमा करता येते. केवळ मोठ्या आणि नामवंत कंपन्याच नव्हे तर आता लघु मध्यम उद्योजकांना बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज मध्ये लिस्टिंग करता येते. ज्या व्यवसायाचे भविष्य चांगले आहे असे लक्षात आल्यानंअतर अनेक गुंतवणूकदार बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजच्या माध्यमातून या लघु आणि मध्यम उद्योगात गुंतवणूक करीत आहेत. इथे कसे लिस्टिंग करावे? यात भांडवल कसे मिळवावे याचे मार्गदर्शन करण्यात येते. बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजच्या बिलिंडगमध्येच इन्क्युबेशन केंद्र तयार करण्यात आले आहे.

बीएसईचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) आशिष कुमार चौहान यांनी दिलेल्या माहिती नुसार, आज देशातील शेतकऱ्यांच्या संखे एवढी संख्या ही शेअर बाजारात गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांची आहे. पुर्वी केवळ परिचीतांच्या माध्यमातून उद्योजकांना मुद्दल जमा करावे लागत असे, आता संपुर्ण देशभरातून नवउद्योगातही गुंतवणूक येऊ लागली आहे. लघु व मध्यम ३५० कंपन्या आतापर्यंत लिस्टिंग झाल्या आहेत यापैकी बारा प्रकल्प हे स्टार्टअप आहेत. बीएसई केवळ नियामक मंडळ म्हणून काम करणारी संस्था न राहता बीएसईमार्फत उद्योजकांसाठी इन्क्युबेशन केंद्र चालविले जाते. गरज आहे ती त्यांच्यापर्यंत पोहोचण्याची. ■■

# नमुना प्रकल्प अहवाल

## आर.टी.ई.स्नॅक्स उत्पादने तयार करणे

**ओळख :** सदरील प्रकल्प हा आर.टी.ई.स्नॅक्स उत्पादित करण्याचा आहे. आजकाल वाढत्या शहरीकरणाबरोबर लोकांच्या खाण्याच्या सवयी पण बदललेल्या आहेत व त्याचबरोबर ग्राहकांचा कल हा बाजारपेठेमध्ये न्युट्रीशियस स्नॅक्सकडे वळायला लागलेला आहे व या आरटीई स्नॅक्सला बाजारपेठेत चांगल्या प्रकारची मागणी आहे व ती वाढतच जाणार आहे.

**जागा व इमारतीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | भाड्याची |
| इमारत | भाड्याची |

**लागणारा कच्चा माल :** --

**मनुष्यबळाची आवश्यकता :** कुशल-३, अर्धकुशल-२, अकुशल-३

**लागणारी यंत्रसामग्री :** व्हायब्रेटींग ग्रेन सेपरेटर, होमोजिनाईझर, ट्रे डायर, इत्यादी

**प्रकल्पाला लागणाऱ्या जागेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | स्वतःची |

**जागा विकासाला लागणारा खर्च :**

| | |
|---|---|
| लेव्हलिंग, फेन्सिंग व इतर | -- |

**इमारतीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| इमारत | भाड्याची |

**यंत्रसामग्रीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्री | ३५,००,००० |

**इतर स्थिर संपत्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| कार्यालयीन फर्निचर | २,००,००० |
| वर्कशॉप फर्निचर | ३,५०,००० |
| इतर | ५०,००० |
| **एकूण :** | **६,००,०००** |

**प्राथमिक व पूर्व उत्पादनांच्या खर्चांची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| प्रकल्प अहवाल तयार करण्याचा खर्च, मार्केट सर्व्हे, कायदा खर्च | ७५,००० |

**खेळत्या भांडवलाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | ६,५०,००० |
| पक्का माल | ३,२५,००० |
| प्रत्यक्ष | २,१०,००० |
| **एकूण :** | **११,८५,०००** |

**वार्षिक कच्च्या मालाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | ७८,००,००० |

**उपयुक्तितेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| वीज | ६,३०,००० |
| पाणी | १,००,००० |
| **एकूण :** | **७,३०,०००** |

**मनुष्यबळाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कुशल-३ | ८,१०,००० |
| अर्धकुशल-२ | ४,२०,००० |
| अकुशल-३ | ४,५०,००० |
| **एकूण :** | **१६,८०,०००** |

**देखभाल व दुरुस्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | १,०५,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ३०,००० |
| **एकूण :** | **१,३५,०००** |

**घसाऱ्याचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | ३,५०,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ६०,००० |
| **एकूण :** | **४,१०,०००** |

**प्रशासकीय खर्च :**

| | |
|---|---|
| पर्यवेक्षक-२ | ८,५०,००० |
| वॉचमन-१ | २,२५,००० |
| **एकूण :** | **१०,७५,०००** |

**वाहतूक खर्च :**

| | |
|---|---|
| वाहतूक खर्च | ६,६०,००० |
| प्रवास खर्च | २,३०,००० |
| **एकूण :** | **८,९०,०००** |
| **एकूण :** | **१९,६५,०००** |

**विक्री खर्च :**

| | |
|---|---|
| विक्रेते | ३,२५,००० |
| इतर | २,००,००० |
| **एकूण :** | **५,२५,०००** |

**प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च :**

| | |
|---|---|
| जागा | भाड्याची |
| इमारत | भाड्याची |
| यंत्रसामग्री | ३५,००,००० |
| इतर स्थिर संपत्ती | ६,००,००० |
| प्राथमिक व पूर्व उत्पादन खर्च | ७५,००० |
| **एकूण :** | **४१,७५,०००** |
| खेळते भांडवल | ११,८५,००० |
| **एकूण :** | **५३,६०,०००** |

**मीन्स ऑफ फायनान्स :**

| | |
|---|---|
| स्वतःचे ३० टक्के | १६,०८,००० |
| बँकेचे कर्ज ७० टक्के | ३७,५२,००० |

**प्रकल्पाचा वार्षिक उत्पादन खर्च व वार्षिक विक्री :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | ७८,००,००० |
| उपयुक्तिके | ७,३०,००० |
| वेतन व भत्ते | १६,८०,००० |
| देखभाल व दुरुस्ती | १,३५,००० |
| घसारा | ४,१०,००० |
| प्रशासकीय खर्च | १९,६५,००० |
| विक्री खर्च | ५,२५,००० |
| व्याज | ४,५०,२२० |
| **एकूण :** | **१,३६,९७,४००** |
| **वार्षिक विक्री :** | **१,६१,६२,३२०** |
| **वार्षिक नफा :** | **२४,६५,५३२** |

# कंपोझिट मॅनहोल कव्हर उत्पादित करणे

**ओळख :** सदरील प्रकल्प हा लाईटवेट कंपोझिट मॅनहोल कव्हर उत्पादित करण्याचा आहे. आपल्याकडे शहरीकरण वाढते आहे. शहरीकरणोबराबर लोकांना व शासनाला सोयीचे व सोपे जावे अशा तंत्रज्ञानाची आवश्यकता असते. आजकाल मॅनहोल कव्हर हे खूप जड असते व ते टिकाऊ पण नसते, त्याऐवजी लाईटवेट कंपोझिट मॅनहोल कव्हर्सचे उत्पादन करणे हा एक येणाऱ्या काळातला चांगला लघुउद्योग असू शकेल.

**जागा व इमारतीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | स्वतःची |
| इमारत | भाड्याची |

**लागणारा कच्चा माल :** ॲल्युमिनिअम, सिलिका इत्यादी.

**मनुष्यबळाची आवश्यकता :** कुशल-५, अर्धकुशल-३, अकुशल-३

**लागणारी यंत्रसामग्री :** कास्टींग इक्विपमेंट

**प्रकल्पाला लागणाऱ्या जागेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | स्वतःची |

**जागा विकासाला लागणारा खर्च :**

| | |
|---|---|
| लेव्हलिंग, फेन्सिंग व इतर | -- |

**इमारतीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| इमारत | भाड्याची |

**यंत्रसामग्रीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्री | ५५,००,००० |

**इतर स्थिर संपत्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| कार्यालयीन फर्निचर | ३,००,००० |
| वर्कशॉप फर्निचर | ६,००,००० |
| इतर | १,००,००० |
| **एकूण :** | **१०,००,०००** |

**प्राथमिक व पूर्व उत्पादनांच्या खर्चांची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| प्रकल्प अहवाल तयार करण्याचा खर्च, मार्केट सर्व्हे, कायदा खर्च | ३,५०,००० |

**खेळत्या भांडवलाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | १०,००,००० |
| पक्का माल | ५,००,००० |
| प्रत्यक्ष | ३,००,००० |
| **एकूण :** | **१८,००,०००** |

**वार्षिक कच्च्या मालाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | १,२०,००,००० |

**उपयुक्तिकेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| वीज | १२,००,००० |
| पाणी | ३,००,००० |
| **एकूण :** | **१५,००,०००** |

**मनुष्यबळाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कुशल-५ | १३,५०,००० |
| अर्धकुशल-३ | ६,३०,००० |
| अकुशल-३ | ४,५०,००० |
| **एकूण :** | **२४,३०,०००** |

**देखभाल व दुरुस्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | १,६५,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ३०,००० |
| **एकूण :** | **१,९५,०००** |

**घसाऱ्याचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | ५,५०,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | १,००,००० |
| **एकूण :** | **६,५०,०००** |

**प्रशासकीय खर्च :**

| | |
|---|---|
| पर्यवेक्षक-२ | ९,००,००० |
| वॉचमन-१ | २,२५,००० |
| **एकूण :** | **११,२५,०००** |

**वाहतूक खर्च :**

| | |
|---|---|
| वाहतूक खर्च | ६,००,००० |
| प्रवास खर्च | ३,००,००० |
| **एकूण :** | **९,००,०००** |
| **एकूण :** | **२०,२५,०००** |

**विक्री खर्च :**

| | |
|---|---|
| विक्रेते | -- |
| इतर | -- |
| **एकूण :** | **--** |

**प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च :**

| | |
|---|---|
| जागा | भाड्याची |
| इमारत | भाड्याची |
| यंत्रसामग्री | ५५,००,००० |
| इतर स्थिर संपत्ती | १०,००,००० |
| प्राथमिक व पूर्व उत्पादन खर्च | ३,५०,००० |
| **एकूण :** | **६८,५०,०००** |
| खेळते भांडवल | १८,००,००० |
| **एकूण :** | **८६,५०,०००** |

**मीन्स ऑफ फायनान्स :**

| | |
|---|---|
| स्वतःचे ३० टक्के | २५,९५,००० |
| बँकेचे कर्ज ७० टक्के | ६०,५५,००० |

**प्रकल्पाचा वार्षिक उत्पादन खर्च व वार्षिक विक्री :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | १,२०,००,००० |
| उपयुक्तिके | १५,००,००० |
| वेतन व भत्ते | २४,३०,००० |
| देखभाल व दुरुस्ती | १,९५,००० |
| घसारा | ६,३०,००० |
| प्रशासकीय खर्च | ११,२५,००० |
| विक्री खर्च | -- |
| व्याज | ७,२६,६०० |
| **एकूण :** | **१,८६,२६,६००** |
| **वार्षिक विक्री :** | **२,२५,३८,१८६** |
| **वार्षिक नफा :** | **३९,११,५८६** |

# हेअर शॅम्पू उत्पादित करणे

**ओळख :** सदरील प्रकल्प हा हेअर शॅम्पू उत्पादित करण्याचा असून सदरील उत्पादने ही जिरॅनियम ऑईलवर आधारित शॅम्पू उत्पादित करण्याचा आहे. सध्या बाजारपेठेत भरपूर केमिकल्सबेस्ड शॅम्पू बाजारपेठेत उपलब्ध आहेत, पण त्याचे केसांवर व बाकी पण दुष्परिणाम (साईड इफेक्ट्स) होतात. त्यामुळे ऑर्गेनिक शॅम्पूची बाजारपेठ पण खूप वाढते आहे. त्यामुळे या उत्पादनाला खूप मोठी बाजारपेठ आहे.

**जागा व इमारतीची आवश्यकता :**
जागा -- चौरस फूट
इमारत -- चौरस फूट

**लागणारा कच्चा माल :** जिरॅनियम ऑईल व इतर

**मनुष्यबळाची आवश्यकता :** कुशल-२, अर्धकुशल-१, अकुशल-२

**लागणारी यंत्रसामग्री :** सेटलींग टॅंक, मिक्सर, पॅकेजिंग मशीन इत्यादी

| | |
|---|---|
| **प्रकल्पाला लागणाऱ्या जागेची आवश्यकता :** | |
| जागा | स्वतःची |
| **जागा विकासाला लागणारा खर्च :** | |
| लेव्हलिंग, फेन्सिंग व इतर | -- |
| **इमारतीची आवश्यकता :** | |
| इमारत | भाड्याची |
| **यंत्रसामग्रीची आवश्यकता :** | |
| यंत्रसामग्री | २६,५०,००० |
| **इतर स्थिर संपत्तीचा खर्च :** | |
| कार्यालयीन फर्निचर | २,००,००० |
| वर्कशॉप फर्निचर | १,००,००० |
| इतर | ५०,००० |
| **एकूण :** | **३,५०,०००** |
| **प्राथमिक व पूर्व उत्पादनांच्या खर्चांची आवश्यकता :** | |
| प्रकल्प अहवाल तयार करण्याचा खर्च, मार्केट सर्व्हे, कायदा खर्च | ५०,००० |
| **खेळत्या भांडवलाची आवश्यकता :** | |
| कच्चा माल | ५,५०,००० |
| पक्का माल | ३,००,००० |
| प्रत्यक्ष | १,७५,००० |
| **एकूण :** | **१०,२५,०००** |
| **वार्षिक कच्च्या मालाची आवश्यकता :** | |
| कच्चा माल | ६६,००,००० |
| **उपयुक्तिकेची आवश्यकता :** | |
| वीज | ६,००,००० |
| पाणी | ७०,००० |
| **एकूण :** | **६,७०,०००** |
| **मनुष्यबळाची आवश्यकता :** | |
| कुशल-२ | ५,४०,००० |
| अर्धकुशल-१ | २,१०,००० |
| अकुशल-१ | ३,००,००० |
| **एकूण :** | **१०,५०,०००** |
| **देखभाल व दुरुस्तीचा खर्च :** | |
| यंत्रसामग्रीवर | ८०,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ११,००० |
| **एकूण :** | **९१,०००** |
| **घसाऱ्याचा खर्च :** | |
| यंत्रसामग्रीवर | २,६५,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ३५,००० |
| **एकूण :** | **३,००,०००** |
| **प्रशासकीय खर्च :** | |
| पर्यवेक्षक-१ | ३,२५,००० |
| इतर-१ | ८४,००० |
| **एकूण :** | **४,०९,०००** |
| **वाहतूक खर्च :** | |
| वाहतूक खर्च | २,२५,००० |
| प्रवास खर्च | ७०,००० |
| **एकूण :** | **२,९५,०००** |
| **एकूण :** | **७,०४,०००** |
| **विक्री खर्च :** | |
| विक्रेते | २,००,००० |
| इतर | ७५,००० |
| **एकूण :** | **२,७५,०००** |
| **प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च :** | |
| जागा | भाड्याची |
| इमारत | भाड्याची |
| यंत्रसामग्री | २६,५०,००० |
| इतर स्थिर संपत्ती | ३,५०,००० |
| प्राथमिक व पूर्व उत्पादन खर्च | ५०,००० |
| **एकूण :** | **३०,५०,०००** |
| खेळते भांडवल | १०,२५,००० |
| **एकूण :** | **४०,७५,०००** |
| **मीन्स ऑफ फायनान्स :** | |
| स्वतःचे ३० टक्के | १२,२२,५०० |
| बॅंकेचे कर्ज ७० टक्के | २८,५२,५०० |
| **प्रकल्पाचा वार्षिक उत्पादन खर्च व वार्षिक विक्री :** | |
| कच्चा माल | ६६,००,००० |
| उपयुक्तिके | ६,७०,००० |
| वेतन व भत्ते | १०,५०,००० |
| देखभाल व दुरुस्ती | ९१,००० |
| घसारा | ३,००,००० |
| प्रशासकीय खर्च | ४,०९,००० |
| विक्री खर्च | २,७५,००० |
| व्याज | ३,४२,३०० |
| **एकूण :** | **९७,३७,३००** |
| **वार्षिक विक्री :** | **१,११,००,५२२** |
| **वार्षिक नफा :** | **१३,६३,२२२** |

(या प्रकल्प अहवालाचे लेखक हे स्वतः व्यवस्थापन सल्लागार असून गेली २३ वर्षे या क्षेत्रामध्ये प्रशिक्षण व सल्ला देण्याचे कार्य करत आहेत. ते स्वतः एक उद्योजक आहेत. त्यांचा भ्रमणध्वनी ९४०४५५०७९९ असून ई-मेल shidhayesanjay7@gmail.com आहे. प्रकल्प अहवालामधील किमती त्या-त्या जागेप्रमाणे व स्वतःच्या गुंतवणुकीप्रमाणे बदलू शकतात.)

**प्रश्न : वेस्ट प्लास्टिकपासून ब्युटीमिन प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**

**विशाल नाईक, पूसद, जिल्हा यवतमाळ**

**उत्तर :** वेस्ट प्लास्टिकपासून ब्युटीमिन प्रकल्पाविषयी माहिती खालीलप्रमाणे आहे.
जागा ७,००० चौरस फूट
इमारत ३,००० चौरस फूट
उपयुक्ततेची आवश्यकता :
वीज ३० अश्वशक्ती
पाणी ७ के.एल.
मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-६, अर्धकुशल-२, अकुशल-३
या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : फुल्ली ऑटोमॅटिक ब्युटिमिन फ्रॉम वेस्ट प्लास्टिक मेकिंग प्लँट
लागणारा कच्चा माल : वेगवेगळ्या प्रकारचे व गुणवत्तेचे वेस्ट प्लास्टिक
या प्रकल्पासाठी एकूण भांडवल १२५ ते १५० लाख रुपये लागू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता ९० ते १०० लाख व खेळत्या भांडवलाची आवश्यकता ३५ ते ४० लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू १९ ते २३ टक्क्यांपर्यंत असू शकतो व एकूण गुंतवणुकीवर परतावा १६ ते १८ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

**प्रश्न : कॉफी कॉन्सेंट्रेटच्या प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**

**किरण देसाई, सिंधुदूर्ग**

**उत्तर :** कॉफी कॉन्सेंट्रेटच्या प्रकल्पाविषयी माहिती पुढीलप्रमाणे आहे.
जागा १०,००० चौरस फूट
इमारत ५,००० चौरस फूट
मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-३, अर्धकुशल-४, अकुशल-३
या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : सेमी ऑटोमॅटिक कॉफी कॉन्सेंट्रेट मेकिंग प्लँट
लागणारा कच्चा माल : वेगवेगळ्या प्रकारच्या गुणवत्तेचे व दर्जाचे कॉफी बिन्स
या प्रकल्पासाठी लागणारे एकूण भांडवल ७० ते ९० लाख रुपये असू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता ५० ते १०० लाखांपर्यंत व खेळत्या भांडवलाची आवश्यकता ५० लाख ते १०० लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू २५ ते २७ टक्क्यांपर्यंत असू शकतो व एकूण गुंतवणुकीवर परतावा १५ ते १७ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

**प्रश्न : इसेंशियल ऑईल बेस्ड मिस इन्सेक्टर प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**

**विरेंद्र कापडिया, नागपूर**

**उत्तर :** इसेंशियल ऑईलबेस्ड मिस इन्सेक्टर प्रकल्पाविषयी माहिती खालीलप्रमाणे आहे.
मूलभूत सुविधांची गरज :
जागा ७,००० चौरस फूट
इमारत ३,००० चौरस फूट
उपयुक्तितेची आवश्यकता :



# प्रश्नपेटी

वीज १५ अश्वशक्ती
मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-२, अर्धकुशल-२, अकुशल-१
या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : सेमी ऑटोमॅटिक प्रोसेसिंग प्लँट
लागणारा कच्चा माल : वेगवेगळ्या गुणवत्तेचे व दर्जाचे इसेंसियल ऑईल
या प्रकल्पासाठी लागणारे एकूण भांडवल ४० ते ५० लाखांपर्यंत असू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता ३० ते ४० लाखांपर्यंत व खेळत्या भांडवलाची आवश्यकता १० ते २० लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू ३१ ते ३३ टक्क्यांपर्यंत असू शकतो. एकूण गुंतवणुकीवर परतावा १२ ते १५ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

**प्रश्न : ॲरोमॅटिक ऑईल बेस्ड हेअर शॅम्पू प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**

**अतुल देशपांडे, नाशिक**

**उत्तर :** ॲरोमॅटिक ऑईलबेस्ड हेअर शॅम्पू प्रकल्पाविषयी माहिती खालीलप्रमाणे आहे.
मूलभूत सुविधांची गरज :
जागा ५,००० चौरस फूट
इमारत ३,००० चौरस फूट
उपयुक्तितेची आवश्यकता :
वीज १२ अश्वशक्ती
मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-२, अर्धकुशल-१, अकुशल-३
या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : फुल्ली ॲटोमॅटिक शॅम्पू मेकिंग प्लँट
लागणारा कच्चा माल : वेगवेगळ्या गुणवत्तेचे ऑईल्स
या प्रकल्पासाठी लागणारे एकूण भांडवल २५ ते ३० लाखांपर्यंत असू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता १० ते १५ लाखांपर्यंत व खेळत्या भांडवलाची आवश्यकता ५ ते १० लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू २२ ते २७ टक्क्यांपर्यंत असू शकतो. एकूण गुंतवणुकीवर परतावा १२ ते १५ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

*(टीप : प्रश्नपेटीसाठी प्रश्न विचारणाऱ्या वाचकांनी आपला प्रश्न मोजक्या शब्दांत मांडावा. प्रश्न एकच विचारावा, एकच प्रश्न विचारणाऱ्या वाचकांना प्राधान्याने थोडक्यात उत्तर देण्यात यईल.)*

## उद्योग,
## व्यापार,
## व्यवसायाद्वारा
## स्वयंरोजगार
## मिळविण्यासाठी
## सर्व काही...

**प्रस्थापित व होतकरू उद्योजकांच्या यशोगाथा, बाजारपेठ, व्यवस्थापन, दर्जा, गुणवत्ता, ग्राहकांचे मानसशास्त्र, नवीन उद्योगांच्या संधी, शोध, तंत्रज्ञान, निर्यात, उद्योजकतेच्या वाटेवर साह्य करणाऱ्या संस्था, नमुना प्रकल्प अहवाल, आपल्यातील उद्योजकतेला दिशा देणारे, राज्य शासनाच्या उद्योगासंबंधीच्या योजना इत्यादीसंदर्भात माहिती.**

**उद्योजकीय मन घडविणारा तत्त्वज्ञ मित्र**

# उद्योजक


अ-३८, एम.आय.डी.सी., रेल्वे स्टेशन,
औरंगाबाद-४३१ ००५.

**E-mail :**
**Editorial** : udyojakmagazine2@gmail.com
**Subscription** : udyojaksubscription@gmail.com
**Advertisement** : udyojakadvt@gmail.com
To know more about MCED please visit our
**Portal**
www.mced.co.in


## वर्गणीदारांसाठी सूचना

*('उद्योजक' मासिकाच्या ज्या वर्गणीदारांना अंक मिळत नाहीत अथवा अनियमितता आहे अशा वर्गणीदारांनी कृपया आपल्या तक्रारी एक महिन्याच्या आत खालील भ्रमणध्वनीवर एसएमएसद्वारे नोंदवाव्यात. एक महिन्यानंतर केलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. तक्रार नोंदवताना वर्गणी भरल्याचा पावती क्रमांक, दिनांक, रक्कम तसेच जो अंक मिळाला नाही त्याचा तपशील थोडक्यात कळवावा, जेणेकरून उद्योजक वितरण विभागाला आपल्या तक्रारीवर तातडीने कार्यवाही करता येईल. भ्रमणध्वनी क्र. ९४०३६८३१९६).*

प्रति,
मा. व्यवस्थापकीय संपादक,
'उद्योजक' मासिक,
अ-३८, एमआयडीसी रेल्वे स्टेशन,
औरंगाबाद-४३१ ००५.

विषय : 'उद्योजक' मासिकाचे वर्गणीदार होण्याबाबत...

महोदय,
'उद्योजक' मासिकाचा वार्षिक/द्वैवार्षिक/त्रैवार्षिक सभासद होऊ इच्छितो. सोबत वर्गणीची रक्कम डिमांड ड्राफ्ट/मनिऑर्डर रु......... 'एमसीईडी औरंगाबाद'चे नावे पाठवत आहोत. कृपया आम्हाला 'उद्योजक' मासिक पुढील पत्त्यावर नियमितपणे पाठवावे.

पूर्ण नाव (आडनाव प्रथम) ____________________
पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता ____________________
____________________
पिन कोड ____________________
कळावे,

आपला विश्वासू,

स्वाक्षरी/-

नाव ____________________

| वर्गणीचे दर | | | | |
|---|---|---|---|---|
| वर्गणी | अर्ध वार्षिक | वार्षिक | द्वैवार्षिक | त्रैवार्षिक |
| रुपये | ५००/- | ९००/- | १७००/- | २५००/- |

| जाहिरातींचे दर | |
|---|---|
| जाहिरातीचा आकार | नियमित अंकांसाठी |
| मलपृष्ठ (चार रंगी) | ५०,००० |
| कव्हर क्र. २ व ३ (चार रंगी) | ३०,००० |
| आतील पाने (चार रंगी) | २५,००० |
| अर्धे पान (चार रंगी) | १५,००० |
| पाव पृष्ठ (चार रंगी) | ८,००० |

- ५% जी.एस.टी. अतिरिक्त लागेल.
- जाहिरातीचे आर्टवर्क तयार करुन पाठविणे.
- जाहिरातीचे आर्टवर्क PDF / CDR / JPEG मध्ये आवश्यक.
- संस्थेच्या प्रशिक्षित उद्योजकांना जाहिरात दरात १०% सवलत.
- जाहिराती udyojakadvt@gmail.com वर पाठवाव्यात.

**उद्योजक मासिकाचे वर्गणीदार होण्यासाठी पुढील बारकोड स्कॅन करून वर्गदार व्हा..!**

**ऑफिसर कोड 46 टाका. वर्गणीची नोंदणी करताना काही अडचण आल्यास 9403078779 वर संपर्क साधा.**

**वर्गणी/जाहिरातीचे पेमेंट https://mced.co.in/Subscription/ या लिंकवर करावे**

कृपया पेमेंट 'एमसीईडी औरंगाबाद' (महाराष्ट्र) च्या नावे डिमांड ड्राफ्टने/मनिऑर्डरद्वारे पाठवावे अथवा 'उद्योजक' मासिकाच्या स्टेट बँक ऑफ इंडिया, रेल्वे स्टेशन शाखा, औरंगाबादच्या खाते क्र. ५२०६५८८३५९६ IFSC Code : SBIN 0020302 वर भरून त्याची सूचना तात्काळ एसएमएसद्वारे यूटीआर नंबर व उद्योजक मासिक पोस्टाद्वारे पाठविण्यासाठी सविस्तर पत्ता भ्रमणध्वनी ९४०३६८३१९६ वर कळवावा.

**उद्योजक**

## उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम, 'उद्योजक' मासिक वर्गणी/जाहिरात

### संपर्काचे पत्ते

MCED

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकल्प अधिकारी गेल्या दीड दशकभरापासून प्रत्येक जिल्ह्यात समाजाच्या उद्योजकीकरणाची मोहीम स्वयंसेवकाच्या निष्ठेने राबवीत आहेत. केंद्राच्या शास्त्रशुद्ध उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमामुळे महाराष्ट्रात हजारो पहिल्या पिढीचे उद्योजक तयार झाले आहेत. हे लोण तळागाळापर्यंत पोहोचेल असा आम्हाला विश्वास आहे. समृद्धीकरणाचा हा विचार जनसामान्यांपर्यंत सर्वदूर पोहोचविण्यासाठी 'उद्योजक' मासिकही यशस्वीरीत्या उद्योजकतेविषयीचे ज्ञान प्रसार करीत आहे. केंद्राच्या कार्यक्रमाविषयी आणि उद्योजकच्या वर्गणी/जाहिरातींविषयी खालील प्रकल्प अधिकारी मित्र चर्चेसाठी सदैव उपलब्ध आहेत. महाराष्ट्रातील तरुणांनी, महिलांनी याचा फायदा जरूर घ्यावा. दहा हजार अधिक वर्गणीदार असलेले 'उद्योजक' कधी कधी परिस्थितीजन्य कारणांमुळे वेळेवर पोहोचत नसल्यास, वर्गणीदाराचा पत्ता बदलला असल्यास, नवीन वर्गणीदार व्हायचे असल्यास किंवा जाहिरात द्यायची असल्यास कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधून समाजाच्या उद्योजकीकरणाच्या मोहिमेला हातभार लावावा.

# महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे (एमसीईडी) राज्यातील कार्यालयांचे पत्ते

**मुंबई विभाग :** श्री.राजेश कांदळगांवकर, विभागीय अधिकारी, कोकण विभाग, श्री.आनंद विद्यागर, प्रकल्प अधिकारी, श्री.प्रदीप सावंत, क.प्र.अ. (से.पू.), मुंबई-उपनगर (एमएमआर) व मुख्य समन्वयक (सीएमईजीपी), कोकण भवन, ५वा मजला, रूम क्र.५१२ सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४. ☎२७५६३८९६, २७५६४०२५, ९४२३९३६००१, ७९७२८१५२२२, ९४०३६८३१८९. श्री.धम्मपाल थोरात, जि.प्र.समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय, प्रशासकीय इमारत-अ, पहिला मजला, कक्ष क्र.१०३, कोळगाव, ता.जि.पालघर, ☎८६६९०५४०७८ श्री.प्रदीप सावंत, चारुशिला धर्माधिकारी, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा विकास आयुक्त (उद्योग) उद्योग संचालनालय, दुसरा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२. ☎७९७७२४२१६७, ८८५०२९२८४८. श्री.एस.के.बायस, प्रकल्प अधिकारी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, सी. एफ.सी.बिल्डिंग, पहिला माळा, मॉडेल वुलन मिलसमोर, मुलुंड चेक नाका, ठाणे-४०० ६०२.☎ २५८२५३४८, ७७७४०५३०१४. वर्षा मेश्राम, जिल्हा प्रकल्प समन्वयक (सेपू), पटेल मोटर्स, नगरपालिकेजवळ, शेतकरी भवनाजवळ, अलिबाग, जि.रायगड-४०२ २०१. ☎९८३४२२१९६०. **पुणे विभाग :** श्री.एस.के.थोटे, विभागीय अधिकारी, श्री. एम.डी.शेळके, प्रकल्प अधिकारी, कृषी महाविद्यालय आवार, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५. ☎ ९४०३०७८७५३, २५५३७७२४/२५५२०३५९. श्री.मिलिंद लोंढे, क.प्र.अ. (से.पू.), एमसीईडी, सी-१८१, एच ब्लॉक, इंजिनिअरिंग ऑटो क्लस्टर परिसर, एमआयडीसी, पिंपरी चिंचवड, पुणे-४११ ०१९. ☎७३८७०२०२३५. श्री.राजशेखर शिंदे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, होटगी नाका, किनारा हॉटेलसमोर, सोलापूर-४१३००३. ☎२६०५०३३, २३२२५२६, ९४०३६८३२१. सौ.शितल पाटील, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्लॉट क्र.ए-१३,औद्योगिक वसाहत, सातारा-४१५ ००४. ☎२४६५५५, २४४६५५, ८७८८१९०१८९. **कोल्हापूर विभाग :** श्री.एस.के.थोटे, विभागीय अधिकारी, श्री.प्रवीण कायंदे, क.प्र.अ. सौ.वनिता पाटील, क.प्र.अ. (से.पू.), दत्ताजी चेंबर्स, ३१५/ई, न्यू शाहूपुरी, मेरा हॉटेलसमोर, एस.टी.स्टँडजवळ, कोल्हापूर-४१६ ००२. ☎(०२३१) २६६६७४८, २६६२०७१,९४०३०७८७५३, ९४०३०७८७७४, ९४२२८१०८६३. श्री.दत्तात्रय क्षीरसागर, क.प्र.अ. (से.पू.), एमसीईडी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, विश्रामबाग, सांगली-४१६ ४१६. ☎२६७११६९, ७०५७९९४३०८. श्री.रमेश जाधव, क.प्र.अ. (से.पू.) एमसीईडी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, बीडीओ स्टाफ क्वार्टरमागे, जेल मार्ग, रत्नागिरी. ☎२२१९८८, ९४०४९५०००४. श्री.आर.ए.गावडे, क.प्र.अ., द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, दुसरा मजला, ए ब्लॉक, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, सिंधुदुर्गनगरी, ओरोस, ता.कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग, ☎२२१३६२, २२८७०५, ९४०३०७८७६७. **नाशिक विभाग :** श्री.आलोक मिश्रा, विभागीय अधिकारी, श्री.एस.ए.भामरे, प्रकल्प अधिकारी, श्री.मंगेश बनकर, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), ११, तळमजला, उद्योग भवन, त्र्यंबक मार्ग, सातपूर, नाशिक, ☎२३५२१५१, २३६३४१४, ९४०३०७८७६३, ७७२००७५९०१, ८२०८०५५०१९. आरती शेलोरकर, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जमनागिरी मार्ग, धुळे-४२४००१, ८७८८५५७५३०. श्री.टी.पी.जिवडे, क.प्र.अ. (से.पू.) द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, स्टेशन मार्ग, अहमदनगर महाविद्यालयाजवळ, अहमदनगर. ☎२३२०४८५,९५६१७३७७४७. श्री.दिनेश गवळे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, रिंग रोड, राष्ट्रीय महामार्ग, जळगाव-४२५ ००१. ☎२२५२८३२, ७७२००७५९०१. श्री.डी.एस.ढाकणे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, खोली क्र.२८ नंदुरबार. ☎०२५६४-२१०५१०, ८८८८५१०४९९. **नागपूर विभाग :** श्री.प्रदीप इंगळे, विभागीय अधिकारी, श्री.एस.एस.कुलकर्णी, प्रकल्प अधिकारी, शिवानी गायकवाड, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), उद्योग भवन, सिव्हिल लाइन्स, उच्च न्यायालयामागे, विक्री कर कार्यालयाजवळ, नागपूर. ☎२५३७०९७, ९४०३०७८७६९ ९४०३०७८७६०. श्री.एच.आर.वाघमारे, प्र.अ., केंद्र प्रमुख, एमसीईडी उपकेंद्र, श्री.पंकज ठाकरे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), हिंगणा औद्योगिक परिसर, नागपूर, मो. ९४२२२७६७०१, ७७७४०३६२३२, ८९७५५०६६३०. श्री.रोशन तायवडे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, वर्धा-४४२ ००१. ☎२४३४६३, ९८३४३५२२९५. श्री. संदीप जाने, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा उद्योग भवन, ब्लॉक क्र.८, दुसरा मजला, बस स्टँडसमोर, रेल्वे स्टेशन मार्ग, चंद्रपूर, ☎ २७४४१६, ९४०३०७८७७३. कु.काजोल राठोड, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, सिव्हिल लाइन्स, भंडारा. ☎२५८८६७, २५२३४७१, ७६६६१३६३८९. श्री.जितेंद्र चौरे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), डोरलीकर भवन, नगर परिषदेजवळ, धानोरा मार्ग, गडचिरोली. ☎२२३३६५. संगीता ढोणे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), बोपचे भवन, हॉटेल सागरसमोर, बालाघाट मार्ग, गोंदिया-४४१ ६१४, ☎२५०२७४, ८७८८६४८९६५. **छत्रपती संभाजीनगर विभाग :** श्री.डी.यु.थावरे, विभागीय अधिकारी, सौ.भारती सोसे, क.प्र.अ. (से.पू.) सौ.प्रतिभा निमकर, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), एमसीईडी, अ-३८, रेल्वे स्टेशन परिसर, छत्रपती संभाजीनगर-४३१ ००१. ☎२३६१२२३. ९४०३०७८७६६, ९४०३६८३१७३, ९८८१३०४९३०. श्री.विनोद तुपे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्लॉट क्र. पी-७, अतिरिक्त औद्योगिक वसाहत, जालना. ☎२२०२०३०६२८, ९०४९२२८८८८. श्री.खुशाल रोकडे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, बशीर गंज, बीड-४३१ १२२. ☎२२२२८५, ७०५७९६८१३१. श्री.पांडुरंग कांबळे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीसमोर, उस्मानाबाद-४३१ ५०१. ☎२२१५०५, ८२७५०९३२२८. **नांदेड विभाग :** श्री.किशोर अंभोरे, विभागीय अधिकारी, श्री.शंकर पवार, क.प्र.अ. (से.पू.), उद्योग भवन, तळ मजला, शिवाजीनगर, नांदेड. मो. ९४०३०७८७८३, ९४०३६८३१९७. श्री.के.व्ही.राठोड, प्रकल्प अधिकारी, हॉल क्र.७४, सर्व्हे नं. ६२२, वार्ड क्र.२०, चिद्रावार नगर, शासकीय कृषी कार्यलयाजवळ, जुना पेडगाव रोड, परभणी-४३१ ४०१. ☎२३३२७५, ९४०३०७८७७३. श्री.दिपक गायकवाड, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्लॉट क्र. पी-१, एमआयडीसी परिसर, लातूर-४१३ ५३७. ☎२२११००, ९४०४९५०००४. श्री. सुधीर आठवले, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, एस-१२, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, हिंगोली. ☎२२२२१८, ९७६५२९१७८५. **अमरावती विभाग :** श्री.पी.व्ही.इंगळे, विभागीय अधिकारी, श्री.पी.व्ही.इंगळे, प्रकल्प अधिकारी, श्री. राजेश सुने, क.प्र.अ. (से.पू.), श्री.नेत्रदीप चौधरी, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), टांक चेंबर्स, गाडगेनगर, व्ही.एम.व्ही.मार्ग, अमरावती-४४४ ६०२. ☎२६६०३१६, २६६५४७२. ९४०३०७८७६९, ८८५७८६९८८३, ९८२२४४१२०९. श्री.प्रसन्ना रत्नपारखी, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जुने कॉटन मार्केट, अकोला-४४४ ६०२. ☎२४३५६८,० ९४०५३१५९४६. श्री.गणेश गुप्ता, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जतकर भवन, टिळकवाडी, बस स्टँड मार्ग, बुलढाणा, ☎२४२३६७/२४२६०४, ९८६००००६८१. श्री.रूपेश हिरुलकर, क.प्रकल्प अधिकारी (से.पू.), उद्योग भवन, अमरावती मार्ग, यवतमाळ. ☎२५५४१३, ८२७५०९३२३०. श्री.गौरव इंगळे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), (एमसीईडी), जिल्हा उद्योग केंद्रासमोर, काटा मार्ग, शासकीय दूध डेअरीजवळ, वाशिम, मो. ९४०५५४८३२९ ■■

Rgd.No.RNI-66017/96 Udyojak February 2024
Date of Publication : 25th January 2024

For Posting under the Registration No. ABD/66/2022-2024 & Without Pre Payment of Postage of Posting WPP
License No.AR/Tech/WPP/Udyojak/AGD Dn/2021-22 Dated 08.03.2022 for the calendar year 2022 to 2024


# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP)

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातून उद्योजक बनण्याची संधी

## धोरण रोजगार निर्मितीचे, उद्दिष्ट प्रगत महाराष्ट्राचे

* ''नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे व्हा''
* मार्गदर्शन व गुंतवणूकीसाठी पैशांचा अभाव आहे का?
* उद्योजक होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरत नाही का?
* तर उद्योजक होण्याचे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम म्हणजेच सीएमईजीपीचा लाभ घ्या.

* या योजनेअंतर्गत निर्मिती व उत्पादन क्षेत्रासाठी ५० लाख तर
* सेवा व कृषि पूरक प्रकल्पांसाठी २० लाख रूपयांपर्यंतचे कर्ज पुरवठा.
* मोठ्या प्रमाणात अनुदानही उपलब्ध आहे.
* तर वाट कशाची बघता... आपले स्वप्न साकारण्यासाठी, स्वतःचा स्वंयरोजगार उभारण्यासाठी आजच सीएमईजीपीचा लाभ घ्या.



: अधिक माहिती व संपर्कासाठी :

राज्यस्तरीय संनियंत्रण : विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, २रा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.
हेल्पलाईन नंबर : २२ २२०२ ३९१२.
महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र (संबंधित जिल्हा) जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी (संबंधित जिल्हा)
संकेतस्थळ : www.di.maharashtra.gov.in, www.maha-cmegp.gov.in, www.mced.co.in

Scan Me

Visit us @ https://www.maha-cmegp.gov.in


**If undelivered please return to**

Chief Editor,
Udyojak Magazine,

उद्योजक

MCED, A-38, MIDC Railway Station Area,
**Chhatrapati Sambhajinagar-431005.**
Portal : www.mced.co.in

**To,**

Published & Printed by Santosh Borde on behalf of Maharashtra Centre for Entrepreneurship Development (MCED), Printed at M/s.Printwell International Pvt.Ltd., G-12, MIDC Chikalthana, Chhatrapati Sambhajinagar-431 006. Published from MCED, A-38, MIDC Railway Station Area, Chhatrapati Sambhajinagar-431 005. **Chief Editor : B.T. Yeshwante**